# माणूस

१२ जुलै १९६९

किंमत
चाळीस पैसे

घरातली एखादी जड वस्तूसुद्धा बाजूला सारताना हात थरथरतो. आता तर जिवंत 'माणूस'च वेगळा होतोय—अशा वेळी काय आणि किती वाटते हे कसे सांगावे ? भूतकाळातल्या सहकार्याच्या गोष्टी सांगाव्यात की त्यावेळी रचलेले मनसुबे सांगावेत ? भविष्यकाळची गुंफलेली स्वप्ने सांगावीत की मागच्या स्वप्नासारख्या वाटणाऱ्या हकीकती सांगाव्यात ?......मासिकाचे रूपांतर पाक्षिकात आणि पाक्षिकाचे साप्ताहिकात झाले......साप्ताहिकाच्या वेगवेगळ्या वाढत्या आणि लोकप्रिय आवृत्त्या निघाल्या......मुखपृष्ठ, सदरे, उपक्रम, पुरवणी, परिसंवाद याबद्दलचे अभिनव आणि अभिजात पायंडे पाडताना ह्या 'माणसा'च्या कार्यात कधी कधी आम्ही लुडबुडही केली. (मित्रवर्याला एवढा गुन्हा माफ असावा.) ह्या सर्व गडबडीत घरातला 'माणूस' केवढा मोठा झाला हे लक्षातच आले नाही. पण आज जेव्हा तो नव्या घरात जायला निघाला तेव्हा त्या माणसाचे विस्मयकारी दर्शन झाले. प्रसन्न माणूस, कष्टाळू माणूस, धाडसी माणूस, निग्रही माणूस, उपक्रमशील माणूस, विवेकी माणूस, रंजक माणूस, अध्यात्मशील माणूस, विज्ञाननिष्ठ माणूस,—थोडक्यात म्हणजे मानवनिष्ठ माणूस नव्या जोमात स्वतःचे स्वयंपूर्ण घरटे बांधून त्यात नवा संसार करायला जात असताना वियोगजन्य नैसर्गिक हुरहुरीबरोबरच त्याच्या पराक्रमासाठी अनेक शुभेच्छा दाटून आल्या आहेत. (त्यातली एक विशेष म्हणजे आता साप्ताहिकाचे रूपांतर माणूस दैनिकात व्हावे ही.) माणूसच्या असंख्य वाचकांप्रमाणे त्याच्या एका सहकाऱ्याच्या—संगम प्रेसच्या खूप खूप शुभेच्छा. शुभास्ते पंथानः

१२ जुलै १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष नववे : अंक : सहावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव पुणे २ : दूरध्वनी : ५७३५९

किमत : ४० पसे वार्षिक वर्गणी : वीस रुपये परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

स.नं.

'माणूस' २१ जूनचा अंक आज उत्सुकतेने उघडला आणि कै. आचार्य अत्रे यांचेबद्दल एक ओळही न आलेली पाहून सखेद आश्चर्य वाटले. 'मार्मिक' व 'ब्लीटझ' सारख्या साप्ताहिकांनी कै. आचार्य अत्रे यांना योग्य स्थान दिले आणि आपणांकडून ही चूक ( ! ) भूल व्हावी याचा नम्र खुलासा व्हावा ही विनंती.

जून १९ श. कृ. लिमये ठाणे

'माणूस' हे साप्ताहिक भारदस्त आणि दर्जेदार म्हणून असल्याचे सुज्ञ वाचकांचे आणि त्यांच्या तज्ज्ञ संपादकाचे मत असल्याचे ऐकतो. म्हणून 'माणूस' सुज्ञ आणि भारदस्त आहे असे आम्हीही म्हणतो. पण त्यात 'माणूसपणा' अभावाने केव्हा केव्हा जाणवतो. त्याचे प्रत्यंतर म्हणजे 'माणूस'च्या चालू अंकात नुकतेच दिवंगत झालेले श्रेष्ठ युगान्तकार साहित्यिक आचार्य अत्रे आणि महाराष्ट्राचे उद्योग महर्षि ल. का.

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

कि. यांची उचित वेळात प्रासंगिकपणे बूझ राखण्याचे औचित्य संपादकांनी दाखविलेले दिसत नाही. 'माणसांना' विसरणारा माणूस अजब आहे. सुज्ञास अधिक काय सांगावे ?

जून २२ **राजा जिनगरे, पुणे**

## 'माणसांना' विसरणारा माणूस खरोखर अजब आहे !

२१ जूनचा अंक आताच हातात पडला. संपूर्ण चाळला. आश्चर्य व खेद वाटला. गेल्या तेरा तारखेस मुंबईत महाराष्ट्राचा एक खरोखर महापुरुष निधन पावला हे आपणांस विदित झाले आहे ना ? मा. बाबासाहेब पुरंदरे. त्यांचे शव नेणाऱ्या गाडीवर होते. त्यांच्याकडूनतरी ही वार्ता आपणास कळली असावी असा अंदाज आहे.

आजच्या अंकात त्याबद्दल एक आवाक्षर नाही ! कदाचित पुढच्या अंकात लिहाल. हा उशीर Compensate होईल इतके चांगले लिहाल. पण हा उशीरच अक्षम्य आहे. या अंकातील काही मजकूर Postpone करूनही आचार्यांवरचे लिखाण यायला हवे होते.

जून २० **बाळ बरवे मुंबई**

आपला दि. २१ जूनचा अंक पाहिला आणि धक्काच बसला.

मराठी वाङमयातला एक ज्येष्ठ नाटककार, श्रेष्ठ पत्रकार, महान कवी, विनोदी लेखक व वक्ता आणि या मराठीसाठी ज्याने आपला देह झिजविला त्या आचार्य अत्रे यांच्या निधनाबद्दल आपल्या साप्ताहिकात एक लेखही असू नये ! निदान चार ओळींची बातमी तरी !

## यापुढे 'माणूस' न घेण्याचे मी ठरवले आहे !

आपले व आचार्य अत्र्यांचे काहीही मतभेद असोत. अत्र्यांच्या प्रचंड कर्तृत्वापुढे आज हयात असलेल्या प्रत्येक मराठी माणसाने एकदा तरी वाकलेच पाहिजे, अशी त्यांची थोरवी होती. पण आचार्य या जगातून निघून गल्यानंतरही आपण मतभेद विसरण्याची साधी माणुसकी दाखवली नाहीत. काय म्हणावे ?

आपण म्हणाल, ह्या अंकाचा मजकूर तयार होता. परंतु कोणाचाही मजकूर बाजूला सारता आला नसता का ?

मी आपला एक फार जुना वाचक होतो. परंतु आपल्या या कृतीमुळे आपले

साप्ताहिक यापुढे न घेण्याचे मी ठरवले आहे. यामुळे आपले आर्थिक नुकसान होणार नाही. परंतु माझे मानसिक समाधान निश्चित होईल.

जून २१ **भालचंद्र रेडे**, कल्याण.

या अंकाचे मुखपृष्ठ पाहिले; शीर्षक वाचले आणि समाधान वाटले. आतल्या लेखाबद्दल कल्पना आली. श्री. विजय तेंडुलकरांची आदरांजली 'आगळी' वाटली, लवकर संपली म्हणून चुटपूट लागली.

आचार्य अत्र्यांबद्दल अंकात काही नाही याबद्दल वाईट वाटले, म्हणून मी पत्र पाठवले त्यात जरा घाईच झाली असे आता वाटते. पण आपण आपल्या माणसाकडूनच जास्त अपेक्षा करीत नसतो काय ?

अपेक्षा पूर्ण झाल्याने पत्र पाठवणे मी कर्तव्य समजतो.

जून २८ **परशुराम मालशे**, मुंबई

आपल्या २८ जूनच्या अंकातील श्री. विजय तेंडुलकरांचा 'प्रचंड' लेख वाचला. त्यानंतर अनेकांना तो 'वाचाच' असे सांगितल्याशिवाय राहवले नाही.

यापूर्वी आचार्यांवर आलेले अनेक लेख व श्रद्धांजल्या वाचल्या होत्या, त्यात अनेक ख्यातनामही होते. परंतु तेंडुलकरांच्या लेखाची सहजता आणि पारदर्शकता

## प्रचंड वाचला व अनेकांना वाचाच असे सांगितले !

एकातही आढळली नाही. त्यांचे शब्द हे केवळ बौद्धिक कसरती नसून त्या मागच्या भावना ते व्यक्त करीत होते. आचार्यांवरचे अनेक लेख तर 'गजराज आणि चार आंधळे' या प्रकारातले किंवा कर्तव्य म्हणून लिहिलेले. एक लेख तर 'मध्यरात्री अचानक टेलिफोन खणाणला' अशा शालेय निबंधाच्या सुरुवातीसारखा होता. याउलट तेंडुलकरांनी अत्रे यांच्या विविध पैलूंचे दर्शन, त्या पैलूंचा प्रत्यक्ष उल्लेख न करता आणि आदराला जरासुद्धा तडा जाऊ न देता अत्यंत सहजतेने घडवून आचार्यांचा 'सोपे लिहा' हा संदेश प्रत्यक्षात अंमलात आणला.

असा लेख अचार्यांना वाचावयास मिळाला असता तर त्यांनी तेंडुलकरांची पाठ थोपटली असती.

'माणूस' ने लेखकाची निवड करण्यात जे औचित्य दाखविले आहे ते माणूसच्या किर्तीत भर घालणारे आहे.

जून २९ **शशिकांत शेजवलकर**, मुंबई

ता. २८ जूनच्या आपल्या 'माणूस' मध्ये आ. अत्र्यांवरचे लेख वाचले. श्री. विजय

तेंडुलकर व श्री. ज. जोशी यांचे लेख आपापल्या परीने उत्तम उतरले आहेत. मात्र श्री. तेंडुलकरांचा लेख अफलातून आहे. विलक्षण सुन्नपणा आणणारा आहे.

सध्या आमच्या डॉक्टर लोकांच्या संपकाळात असे काही वाचायला मिळाल्यावर फार आनंद होतो.

जून २८ शंतनु चिन्धडे, पुणे

आजच 'उद्याचा' माणूस हातात पडला. उत्कृष्ट कव्हर हे खास माणूसचेच वैशिष्टच. ते याही अंकात आढळले. विजय तेंडुलकरांचा 'प्रचंड' खरोखरच प्रचंड वाटला! कलकत्ता दिनांक येवढे खास वाटले नाही. 'झुंडीतला' झुंडपणा गेलेला वाटतो. ती आता 'बोअर' होऊ लागली आहे. आधुनिक विज्ञानेश्वरी उत्कृष्ट.

जून २७ स. वि. गोरे मोडनिब

आपला माणूसचा अंक मी नेहमीच आवडीने वाचते. श्री. विजय तेंडुलकर ह्यांचा 'प्रचंड हा लेख अतिशय आवडला.

अत्रे ह्यांच्याविषयीचे अनेकांचे लेख वाचूनही अत्रे समजले नाहीत. त्यांच्याविषयी झालेली निंदा वा मृत झाल्यावर स्तुती झालीच पाहिजे म्हणून आवेशाने केलेली स्तुती, दोहोतही आवेश दिसला पण अत्रे समजलेच नाहीत.

## अनेकांचे लेख वाचून अत्रे समजले नाहीत पण...

श्री. तेंडुलकर स्वतःच लेखात लिहितात की, 'हा माणूस होता तरी कसा? पण खरं तर त्यांचा लेख वाचूनच 'अत्रे' समजावयास खूपशी मदत होते.

जून ३० सौ. मंदा गोयटें सायन

दि. २८ जूनच्या अंकाचे मुखपृष्ठ "ते साम्राज्य आता लयाला गेले" हे फारच बोलके असून उत्कृष्ट आहे. तसेच श्री. विजय तेंडुलकर यांचे 'प्रचंड' पण फारच हृदयंगम वाटले. शिवाय रविंद्र सरोवराच्या माहितीवरून कपोलकल्पित कथा वा बातम्या वर्तमानपत्रात कशा येतात याचा बोध होतो.

जून २९ प्रभाकर रत्नाकर डोंबिवली

अभिनंदन! दि. २८ जुलैच्या 'माणूस'मध्ये 'रविंद्र सरोवर प्रकरणी चंद्रशेखर यांचा परखड लेख छापल्याबद्दल त्रिवार अभिनंदन. कारण या प्रकरणावरून आपल्या महाराष्ट्रात गढूळ व गलिच्छ वातावरण निर्माण झाले होते. मी तर म्हणतो केले गेले होते. परंतु सरोवराकाठी खरंच घडले ते कितपत भयंकर होते याचा विवेक सोडून प्रचार झाला, एवढे खरे.

जून २८ प्रकाशराव पुणे



# मुंबई समाचार

सु. ल. सोमण

## रेड्डींचा राजिनामा–शोध, बोध !

तेलंगण चळवळीने शेवटी मुख्य मंत्री श्री. ब्रह्मानंद रेड्डींचा बळी घेतला. अर्थात ह्या राजिनाम्यानेही चळवळ शमणार आहे असे मुळीच नाही. आणि ह्याचे मुख्य कारण हे की, चळवळ आता कुणाच्याही कह्यात राहिलेली नाही. 'चळवळ' आता 'चळवळयांच्याही कक्षेत राहिलेलीच नाही. चालू आहे तो विध्वंस राजकीय चळवळीच्या नावाखालचा ! तो रोखता येत नाही. म्हणून मुख्य मंत्री राजिनामा देऊन बाजूला झाले. विध्वंसकांना आवरता येत नाही म्हणून स्वतंत्र तेलंगण झाल्याशिवाय आंदोलन मागे घेतले जाणार नाही अशा घोषणा देऊन चळवळीचे नेतृत्व स्वतः-कडे आहे असा आभास निर्माण करणे विरोधकांनाही आवश्यक झाले. ह्या सर्व प्रकारात सामान्य जनता मात्र हवालदिल झाली आहे. गेले काही महिने तेलंगणा-तल्या शैक्षणिक संस्था बंदच आहेत. औद्योगिक क्षेत्रे थंडावलेली आहेत. प्रशासन साफ कोलमडले आहे. साधे रस्त्यावरून हिंडणेदेखील सुरक्षित राहिलेले नाही. विद्यार्थीचळवळीतून हे सारे रामायण आज उभे राहिले आहे. स्वतःवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठविताना त्या आंदोलनाच्या विद्यार्थीप्रवर्तकांना त्यातून एवढे रण माजेल ह्याची कल्पनाही नसेल. आज ते विद्यार्थीही निराश आहेत, कारण ज्या कारणासाठी त्यांनी आंदोलन उभारले, त्यांची आज कुठे वाच्यताही होत नाही. उलट त्यांचे नुकसान होऊन त्यांच्यावरील अन्याय मात्र वाढत आहे. चळवळीला संपूर्ण राजकीय–तेही वरिष्ठांच्या वैयक्तिक प्रतिष्ठेचे–स्वरूप प्राप्त झाले आहे. विध्वंस शिगेला पोचला आहे. त्यात ब्रह्मानंदांचा बळी तर पडलाच आहे, पण इतरही अनेक प्रतिष्ठितांची प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे. हे घडतय,

ते एक परीने अपरिहार्यही होतं नि आवश्यकही ! वाईट वाटते ते इतकेच की, त्यासाठी, कुठलाही दोष नसतानाही सामान्य जनता मात्र उगीच होरपळून निघत आहे. विद्यार्थ्यांना कुठलाही न्याय मिळण्याऐवजी, त्यांचं मात्र उगीच शिरकाण होत आहे ! आणि ह्याची जबाबदारी आंध्रसरकारवर, तशीच केंद्रसरकारवरही आहेच.

विद्यार्थ्यांची चळवळ सुरू झाली तेव्हाच रेड्डीसरकारने योग्य ती पावले उचलली असती तर ? ब्रह्मानंदांच्या सांगण्यावर अती विश्वास न टाकता केंद्राने परिस्थितीचा अंदाज घेऊन दोन महिन्यांपूर्वीच त्यांना राजिनामा द्यायला भाग पाडले असते तर ? अगदी अलीकडे ही परिस्थिती राज्यसरकारच्या काबूबाहेर जात आहेसे दिसताच आंध्रमंत्रिमंडळ बरखास्त करून राष्ट्रपतिराजवट पुकारली असती व शांतता प्रस्थापित करून सर्वांशी बोलणी केली असती तर ? असे काही घडले असते तर आजचे हे रामायण घडले नसते. आज प्रकरण अशा अवस्थेला पोचले आहे की, राष्ट्रपतिराजवट तरी तेलंगणाला शांत करू शकेल का, अशी शंका यावी. आणि तरीही केंद्राला ह्या बाबतीत अद्यापही प्रयोगच करून पाहावेसे वाटतात ही खरोखरच चिंताजनक बाब आहे. शिल्लक असलेली काँग्रेस-सरकारे तरी टिकवावीत असला तर हा डाव नाही ना ?

ह्या सर्वांचा शेवट कशात होणार ह्याचे स्पष्ट चित्र आज तरी दिसणार नाही. परंतु ह्यातून संकुचित वृत्ती प्रभावी होणार आणि 'राष्ट्रीय एकात्मता' केवळ ठरावातच घोटाळणार हे मात्र निश्चित ! आंदोलन सुरू झालेले आहे, तेलंगण पेटले आहे जनक्षोभ आहेच. तेव्हा वाहत्या गंगेत हात धुवून घ्यावेत. ह्या पद्धतीने विरोधी पक्षियांनी स्वतंत्र तेलंगणाची मागणी उचलून धरली आहे. अगदी संपूर्ण महाराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांनीदेखील. पण त्याचे संभाव्य परिणाम मात्र विचारांत घ्यायच्या मनस्थितीत कुणीच दिसत नाहीत. ह्या परिणामांची त्यांना जाणीव नाही असे नाही, परंतु काँग्रेस व केंद्र ह्यांविरुद्ध रान उठवायला मिळत असलेली संधी दवडायचे त्यांच्या जीवावर येत आहे. पंजाब विभागला गेला आहेच, आता आंध्र विभागला गेला की महाराष्ट्र, गुजरात, म्हैसूर, मध्यप्रदेश, बिहार वगैरे आहेतच. ही छोटी छोटी राज्य, राष्ट्रभावना प्रखर होत नाही तोवर राजकीय दृष्ट्यातर परवडणारी नाहीतच पण आर्थिक दृष्ट्याही ती यशस्वी व्हायची शक्यता फारच कमी. शिवाय शासनाचा वाढता खर्च छोट्या राज्यातले खालच्या पातळीवरचे मतलबी राजकारण ह्या सार्‍यांमध्ये विकास मात्र अडखळत राहिल. राजकीय पुढार्‍यांनी विशेषतः विरोधी, छोट्या राज्याच्या पुरस्कर्त्यांनी ह्या प्रश्नांची उत्तरे आधी शोधली पाहिजेत.

विरोधी पक्षियांवर सगळयाच बंडाळयांचे खापर फोडण्यातही अर्थ नाही. वास्तविक

( पान ५९ वर चालू )



# मुक्ताफळे

## ' रस्ता ' होऊनि पसर जगावर !

यंदा राजस्थानमध्ये भयंकर दुष्काळ पडलेला आहे, २२,८०० खेडयांत अवर्षणांमुळे पाण्याचा थेंब नाही. विहिरी कोरडया आहेत. आधीच राजस्थान म्हणजे निम्मेअधिक वाळवंट. उरलेल्या भागात हिरवे पान नाही अशी परिस्थिती. दुष्काळ पडला की त्या भागात जे शेतकरी असतात ते कामधंदा शोधण्यासाठी गुरे-ढोरे, मुले, माणसे घेऊन बाहेर पडतात. शेजारच्या एखाद्या गावात, जिल्ह्यात वा प्रांतात जाऊन रोजगार धरतात. परंतु गोऱ्या साहेबाने भारतात एक नवा पायंडा पाडला. ज्या भागात दुष्काळ पडला असेल तिथे दुष्काळी कामे सुरू करायची. दुष्काळी कामे म्हणजे मुख्यत: रस्ते बांधणे. अर्थात दुष्काळग्रस्तांचे पीडानिवारण हे काम मुख्यत: पी. डब्ल्यू. डी. खात्यामार्फत होण्याची ही व्यवस्था होती.

खरे पहाता वर्षानुवर्षे दुष्काळ पडल्यामुळे गेल्या दीड शतकांत जवळजवळ आवश्यक ते रस्ते त्या भागात बांधून झाले आहेत. या रस्त्यांचा मुख्य उपयोग पुन: दुष्काळ पडला की या रस्त्यांवरून माणसे पटापट चालू शकतात व दूर जाऊ शकतात. जिथे आवश्यकता आहे तिथे रस्ते झालेच, नाही तिथेही बांधून झाले आहेत. या पद्धतीने कोटयावधी रुपये आतापर्यंत खर्च झाले आहेत. साहेबाने ही जी दुष्काळग्रस्तांना दारातच रोजगार देण्याची पद्धत सुरू केली ती साहेब गेल्यावर आपण जशीच्या तशी चालू ठेवली आहे. यापेक्षा नवीन आपल्याला काही सुचत नाही त्याला काय बरे करावे ?

गेल्या आठ महिन्यात राजस्थानांत रस्ताबांधणीकरिता असे ३० कोटी रुपये मुख्य मंत्री सुखाडियांनी वाटले. पाऊस पडेपर्यंत आणखी २० कोटी वाटायचे आहेत. १३,००० किलोमीटर रस्ते बांधून झाले आहेत. आणखी १०,००० किलोमीटर

बांघणार आहोत, असा कॉंग्रेसी मंत्र्यांनी कामाचा दणका उडवला! राजस्थान-मधील हे रस्ते पाहण्यासाठी मध्यवर्ती सरकारने मग एक अभियंत्यांची तुकडी रवाना केली. अभियंता म्हणजे एंजीनिअर. या मंडळींनी अहवाल तयार केला त्यांत त्यांनी कळवले :

१. जे रस्ते बांधले आहेत त्यांचा उपयोग होण्याची शक्यता फारच कमी आहे.

२. पुष्कळसे रस्ते म्हणजे फक्त मैलोमैली वाळू पसरलेली आहे. हे सर्व पहिल्या पावसात धुपून जातील यात शंका नाही.

३. काही ठिकाणी तर आधी असलेल्या रस्त्याशेजारीच समांतर असे दुसरे रस्ते तयार करण्यात आलेले आहेत! याचे कारण मंत्रीमहाशयांनी दौरा केला, की ठिकठिकाणी माणसे जमून आग्रह घरीत "आमच्या इथे दुष्काळी काम सुरू करा! त्या भागातला आमदार तर उपोषण करण्याची धमकी द्यायचा म्हणजे दुष्काळ आहे, खायला नाही म्हणून रस्ते आणि रस्ते केले नाहीत तरी उपोषण.

४. दुष्काळी कामे म्हणून रस्त्यावर खर्च करू नका असे गेली कित्येक वर्षे पुनः पुनः सांगूनही राजस्थान सरकार ही कामे करते याला काय म्हणावे? या कामा-मुळे फायदा होतो तो फक्त पी. डब्ल्यू. डी. खात्यातील काही पैसे खाणाऱ्या मंडळींचा व गावातील खादीधारी पुढाऱ्यांचा! ही दोन्ही मंडळी संगनमताने खोटी हजेरीपत्रके तयार करण्यात निष्णात झालेली आहेत. असे पैसे हडप करण्याचे अनेक गैर प्रकार उघडकीस आले आहेत. परंतु शिक्षा कुणालाच झालेली नाही!

५. सरकारने राजस्थान कालव्यावर या दुष्काळग्रस्त लोकांना लावले असले तर टिकाऊ व दुष्काळनिवारण असे खरेखुरे काम झाले असते. दुष्काळग्रस्त कामकरी हे मोठमोठ्या धरणांच्या योजनांवर रोजावर लावावेत अशी मध्यवर्ती सरकारने केलेली सूचना दप्तरी पडून आहे.

यांतील प्रत्येक आक्षेप हा फोल आहे असे आम्हांस वाटते. बांधलेल्या सर्व रस्त्यांचा उपयोग सतत झाला पाहिजे असा आग्रह का? तसे पाहिले तर बरेच रस्ते हे रात्री रिकामेच असतात. चिटपाखरूदेखील जात नाही. स्मशानात एका वेळी दहा-बारा प्रेते दहनाची सोय असते. परंतु नेहमी बहुधा एकच चिता जळत असते. तेव्हा अशी टीका करण्यात काय वो अर्थ? दिवसादेखील ज्यावर चिटपाखरू नाही असे रस्ते बांधले तरी फारसे बिघडले नाही! आणि मुख्य म्हणजे पाखरू रस्त्यावर मुळी नसतेच! ते कशाला रस्त्यावर जाईल, ते उडत जाते!

दुसरा मुद्दा रस्ते पावसात धुपून जाणारे आहेत. आता दुष्काळ जर सतत प्रत्येक वर्षी पडणार तर रस्ते धुपून गेल्याशिवाय प्रत्येक वर्षी निराळे रस्ते कसे बांधले जातील? काही धुपून गेले तर पुढल्या वर्षी पुनः तिथे दुष्काळी काम तरी सुरू करता येईल. असलेल्या रस्त्याला लागून समांतर रस्ते बांधले आहेत म्हणे! यात काय बिघडले बुवा? शहरात जर तुम्हांला — फक्त जाण्याचे आणि फक्त येण्याचे

असे रस्ते लागतात तर खेड्यापाड्यातल्या लोकांना नको तसे रस्ते? अशा रस्त्यांच्या विरुद्ध बाजूंना 'नो एन्ट्री' अशा पाट्या लावल्या की झाले! अशा पाट्या न लावल्यामुळे या रस्त्याचे प्रयोजन तपासणी करणाऱ्यांच्या लक्षात आलेले नाही त्याला काय करावे? आमदार आग्रह धरणारच. अहो दुष्काळ पडण्यासारखी सुसंधी आली आणि त्या भागांतील जनतेची जर आमदारांनी सेवा केली नाही तर १९७२ साली काय होईल? इतर ठिकाणी आमदारांना जनसेवेची कामे शोधून काढावी लागतात.

खोटी हजेरीपत्रके काय फक्त राजस्थानातील पी. डब्ल्यू. डी. खाते करते की काय? अखिल भारतात खात्यात पैसे निर्माण करण्याचा हा एकमेव खात्रीशीर मार्ग आहे. आणि आम्ही विचारतो हे पैसे काय सगळेच्या सगळे सरकारी सेवक खातात? अहो दुष्काळ पडला की मुख्य मंत्री, खातेमंत्री, उपमंत्री, राज्यमंत्री, मुख्य अभियंता, उपमुख्य अभियंता, नीच चिटणीस, अधम चिटणीस अशी मोठमोठी पगारदार—वजनदार मंडळी सारखी या भागात येतात. मंडळी यायची की प्रत्येक वेळी पंचवीस-तीस लोकांचे चहापाणी, सात-आठ लोकांचे मुर्गी वगैरेचे जेवण, या मंडळींच्या जीपांतून पेट्रोल भरणे या सर्व गोष्टींना काय पैसा लागत नाही? हा पैसा कुठून हो आणायचा सामान्य सेवकांनी? तेव्हा ही टीका करणे गैर आहे, शिवाय ते धोकादायक आहे — अनेकांना दुखवणारे आहे!

दुष्काळी कामगार, शेजारच्या प्रांतात कामावर गेले की ते तिथे उपरे ठरतात! प्रांताची म्हणून जी अस्मिता आहे ती आता प्रांतोप्रांती फारच जागृत झाली आहे. (यासाठी ठिकठिकाणी सेना आहेत,) महाराष्ट्रात ठिकठिकाणी धरणांच्या कामावर दगडकामे, मातकामे व रस्त्यावर दगडाची पाथरवटी कामे हे वडार लोक करताना दिसतात. कारण मराठी मजूर अशी हलकी कामे करीत नाही म्हणून! नाहीतर त्यांनादेखील तेथून हकलले असते. शिवाय धरणे ही गावापासून लांब असतात. लोकांना दारात काम देऊन त्यांच्यातील स्वतःच्या हिंमतीवर हालचाल करण्याची शक्ती संपलेली आहे!

शक्तिपात झालेल्या लोकांची सेवा करून निवडणुकीत अधिक यश मिळते असा अनुभव आहे.

असो. दर वर्षी राजस्थानात दुष्काळ पडलाच तर असेच रस्ते बांधले जावोत. यासाठी खर्च होणाऱ्या पैशाला आमचे सांगणे आहे—

'रस्ता' होऊनी पसर जगावर
हिरमुसली जनसेवा फुलू दे।
थव्यास मुकले फूलपाखरू
चुकलेपण आपुले भुलू दे॥

१२ जुलै १९६९

## ताडी चिंतनिका :

महाराष्ट्रसरकारने राज्यात ताडी लोकप्रिय करण्यास सुरुवात केली त्याला आता ७ महिने पुरे झालेत. ताडीचे दुकान, लायसेन्स नंबर अशा स्मृतिशेष झालेल्या पाट्या शहरांतून व खेड्यापाड्यांतून आता लोकांना पुन: दिसू लागल्या. या ताडी-वरील बंधने उठवल्यावरोबर हातभट्टी तयार करणाऱ्या धंद्यावर मंदी आल्याची धुंद करणारी बातमी दारूबंदी मंत्री याज्ञिक यांनी सर्वांना नुकतीच दिली. श्री. याज्ञिक यांनी सांगितले, ' हातभट्टी म्हणून सर्वत्र मिळणारी दारू आता फक्त पूर्वीच्या चार पंचमांश खपते. '

ताडीचा हा विजय पाहून कुणालाही हर्षच होईल ! श्री. याज्ञिक यांचे मुख्य काम निरनिराळी मद्ये लोकांना खुली करण्याचे असताना, त्यांना फार काळ ' दारूबंदी ' मंत्री म्हणणे हा त्यांचा अपमान नव्हे काय ? त्यांनी या पुढे दारुमंत्री किंवा मद्यमंत्री म्हटले पाहिजे. पण आता आम्हांला काळजी वाटते ती ताडीची नाही नीरेची !

नीरा ही आरोग्यवर्धक व शरीराला आवश्यक ते पोषण पुरवणारे पेय आहे. यामुळेच गांधीभक्तांनी कायदे करून दारूला हुसकले, तरी नीरेची थोरवी सतत सांगितली. नीरा असली तर दूधदेखील लागत नाही. गोमातांचा जंजाळ नको. नीरा घ्यावी मग कसलेही गहू खाल्ले तरी गॅस्ट्रोचा त्रास होत नाही. यामुळे ताडी–माडी हातभट्टीत गेली तरी नीरा लोक दुधासारखी उघडपणे पिऊ लागले.

परंतु ताडीची दुकाने उघडी झाल्यापासून आता पुढारी आणि सरकारचे इमानी सेवक म्हणतात–' ताडी ही आरोग्यवर्धक व निरुपद्रवी पेय आहे. ते उत्तेजित करते पण अपाय करीत नाही ! ' मुंबईच्या इंग्रजी टाईम्सनेदेखील परवा स्फुटात म्हटले आहे–" Toddy after all is a harmless and in some ways a healthy drink " आता हे वाक्य Toddy is a harmless and healthy drink असे तर्खडकर छाप सिंपल सेन्टेन्स चालले नसते का ? हातचे राखून लिहायची बाकी सवय असली की बरे असते हो ! ताडी ही जर आफ्टर ऑल अशी आरोग्यवर्धक ठरली तर नीरेची प्रतिष्ठा कमी होईल ही भिती आम्हांस वाटते. नीरा पिणारे आता ताडी पिऊ लागतील. नीरेच्या धंद्यावर याचा विपरीत परिणाम होईल की काय यामुळे आम्ही व्याकुळ आहोत. माडी मिळू लागेपर्यंत आता ताडी ही आरोग्यवर्धक राहीलच राहील !. माडी ही आधी उत्तेजित करते आणि चढल्यावर अपाय करते परंतु ताडी ही उत्तेजित करून शिवाय अपाय करीत नाही ही किती चांगली गोष्ट आहे !

या सगळ्या प्रकरणी श्री. याज्ञिकांना पेचात टाकणारा प्रश्न एकच आहे,

" मावापहो, ताडी तर अशी आरोग्यवर्धक होती तर इतकी वर्षे ती प्यायची सोय न करतां महाराष्ट्र राज्यांतील गरीब जनतेची आरोग्यहानी तुम्ही का बरे केलीत ?"

आमच्या मते सर्वच दारू आरोग्यवर्धक आहे. राज्याला चांगले उत्पन्न येते. शिक्षण संस्थांना नाटके वगैरे न करता शाळा नीट चालवता येतात. एल्फिन्स्टन साहेब महाराष्ट्राचा पहिला गव्हर्नर होता. त्याने लिहून ठेवले आहे: "पेशव्यांच्या राज्यात दारूचे उत्पन्न होत नसे !" याचा अर्थ पेशवाईत 'का मजसी अबोला धरूनि ! जासि वाकडा घरावरूनी ?' अशी खुणावणारी 'माडी' होती, परंतु उत्तेजित करून शिवाय अपाय न करणारी 'ताडी' नव्हती !

याचमुळे पेशवाई बुडाली ! उत्तेजित होण्याची सोय असल्याखेरीज राज्य करता येते होय ? गोऱ्यांचे राज्य बुडाले नाही, साहेब आपण होऊन गेला. या दृष्टीने ताडीसारख्या सुंदर पेयावर इतकी वर्षे अकारण निर्बंध ठेवून जनतेच्या आरोग्याची हानि झाली असली तरी यापुढे महाराष्ट्रात एकाहून एक तेजस्वी पिढया निर्माण होण्याची सोय केल्याबद्दल दारूमंत्री श्री. याज्ञिक यांचे आम्हीतरी अभिनंदनच करू !

सर्व सुख जोडी
सर्व शास्त्र निवडी
बाजारी वावडी
'ताडी' आहे !

---

## उमेदवार सापडला !

---

पंजाबचे औट घटकेचे माजी मुख्य मंत्री लछमनसिंग गिल हे निधन पावल्यामुळे जागा रिकामी झाली ! जनसंघ-अकाली दल सरकार सध्या गादीवर आहे. या सरकारचे शिक्षणमंत्री, अकालीदळाचे सोहनसिंग बशी हे या जागेसाठी निवडणूक लढवीत आहेत. या 'बशी' विरुद्ध कुणाला उभे करावे असा पेच पंजाब काँग्रेसला पडलेला असताना अकाली दलाचे एक नेते हजारासिंग गिल हे निवडणुकीचा अर्ज भरण्यापूर्वी दोनच दिवस, काँग्रेसमध्ये दाखल झाले. लगेच त्यांना काँग्रेसने तिकीट दिले आहे.

ही निवडणूक प्रतिष्ठेची आहे असे म्हणतात. दोन संपूर्ण दिवस काँग्रेससेवा केलेल्या हजारासिगांसारख्या उमेदवारामुळे काँग्रेसची प्रतिष्ठा आधीच वाढलेली आहे. या निवडणुकीत हजारासिगांचे काय होणार हे काय सांगायला पाहिजे ?

—ग्यानबा



# हेमेंद्रनाथ बॅनर्जी,

दीड वर्षामागे कुठल्यातरी दैनिकात एक लहानशी बातमी वाचली. ' विद्यापीठ अनुदान मंडळाने राजस्थान विद्यापीठातील पॅरासायकॉलॉजी विभागाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीने आपला अहवाल तयार केला असून त्या अन्वये ' या विभागाचे कार्य अशास्त्रीय, निरुपयोगी स्वरूपाचे आहे. त्यात खोटेपणाची (फ्रॉड) शक्यता असून हा अभ्यास विद्यापीठ विभाग बनण्याच्या लायकीचा नाही. सबब तो बंद करण्यात यावा.' त्यानंतर दोन-तीन महिन्यांपूर्वी ' ग्यानबा 'नी या विभागाचे प्रमुख प्रा. हेमेंद्रनाथ बॅनर्जी यांच्यावर टिपण लिहिले. या सगळ्यामुळे हा विषय, हा माणूस यांच्याबद्दल एक कुतूहल वाटत होते. म्हणून जयपूरला महिनाभर राहण्याची संधी मिळाल्याबरोबर या सर्वांबद्दल समक्ष माहिती मिळवून ' माणूस 'च्या वाचकांपुढे मांडण्याचं ठरवलं. मग प्रा. बॅनर्जींची गाठ घेतली. त्यांना मनातली कल्पना सांगितली. बॅनर्जींना महाराष्ट्राबद्दल विशेष ओढ. त्यांना मराठी येते. ' केसरी 'बद्दल आदर आहे. इंदूरला तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र शिकवायला त्यांना प्रा. रानडे नावाचे शिक्षक होते. यांनीच आपला एक आवडता विद्यार्थी म्हणून बॅनर्जींची या मुलखावेगळ्या विषयाची तोंडओळख करून दिली. इत्यादी. त्यामुळे आधीच मोकळे, गप्पिष्ट असलेले प्राध्यापकमहाशय मला सर्वतोपरी मदत करायला लगेच तयार झाले. अनेक लेख, टिपणे, पुस्तके देऊन झाली. तीन-चार बैठकींमध्ये चर्चा, प्रश्नोत्तरे झाली. संशोधनसहाय्यक सक्सेनांकरवी संशोधनप्रकल्पांची माहिती झाली. इतरही अनेक गोष्टी कळल्या. या सगळ्या मदतीतून लेखाने आकार घेतला.

अनिल गोरे

# अतिमानसशास्त्र इत्यादी . . .

पॅरासायकॉलॉजी (याला आपण अतिमानसशास्त्र म्हणू.) वैज्ञानिक संशोधनाचा विषय म्हणून अगदी अलीकडेच पुढे आला. अतिमानसशास्त्राचा विषय मनुष्याच्या अगम्य अशारीरिक शक्ती हा आहे. मध्यरात्री अचानक जाग येऊन आईला धक्का बसतो आणि कळते की, तिचा मुलगा मेला आहे. दुसऱ्या दिवशी बातमी येते की, हजारो मैल दूर तो खरेच त्याच क्षणी ठार झाला होता. एक चार वर्षांचा पोरगा एकाएकी मागल्या आयुष्याच्या हकीकती सांगू लागतो. त्यामधल्या जागांवर नेले तर तेथील बारीकसारीक गोष्टी तो अचूक ओळखू शकतो. बॅनर्जीच्या अभ्यास-विभागातल्या अनेक केसेसपैकी मासल्यादाखल ही दोन उदाहरणे. आधुनिक विज्ञाना-जवळ या प्रकारांचे स्पष्टीकरण नाही. ते पुन्हा पुन्हा घडलेले पाहिले की वाटू लागते, खरेच काही लोकांना इतरांचे विचार जाणता येत असावेत. (टेलिपथी) भविष्यातल्या घटना कळण्याचे सामर्थ्य (प्रिकॉग्निशन) असावे. एकूण काहीतरी पंचेंद्रियबाह्य संवेदना शक्ती असावी (एक्स्ट्रा सेन्सरी परसेप्शन). काहींना मनो-बलाने काही गोष्टी घडवून आणता येत असाव्यात (सायको कायनेसिस). हे आणि असले प्रकार अतिमानसशास्त्रांत मोडतात. आज योगशास्त्राला शरीरसंवर्धन आणि काही रोगांवर उपाय यापलीकडे स्थान नाही. या नवीन संशोधनातून असे ठरले की, योगाने खरेच काही अतिमानसशक्ती प्राप्त होतात तर एक फार जुना दावा सिद्ध होईल. कदाचित तो खोटाही ठरेल. 'पुनर्जन्मा'च्या अस्तित्वाचा प्रश्न या सर्वांमध्ये खास ज्वलंत. त्याचे उत्तर काहीही असो. पण तो तज्ज्ञांमध्ये आणि इतरां-मध्ये खूप चर्चेचा विषय बनला आहे. बॅनर्जी पूर्वग्रहाशिवाय त्याचे संशोधन करू

पाहत आहेत. या संज्ञेमध्ये इतर धार्मिक, तात्त्विक अर्थ अभिप्रेत असल्याने शास्त्रीय संशोधनाकरिता ती अयोग्य वाटून बॅनर्जींनी 'मज्जासंस्थातीत स्मरणशक्ती' (एक्स्ट्रासेरेबल मेमरी) हा शब्द रूढ केला असून तो जगभर वापरला जातो.

पण या क्षेत्रामधील संशोधनाचा उपयोग काय? यांतून निष्पन्न होणारे ज्ञान मनुष्याच्या भविष्यावर खोल परिणाम करणारे आहे. उद्याच्या संस्कृतीत इहवादाचे स्थान कोणते राहाणार? मनुष्य हा केवळ वस्तुमात्र आहे काय? विश्वास स्थल-कालकारणाशिवाय अन्य काही आहे की नाही? या प्रश्नांची उत्तरे येथे मिळ-ण्याची शक्यता आहे. एकूण सामाजिक संबंधांचे नवे डोळस निकष यांतून निर्माण होण्याजोगे आहेत. निव्वळ मर्यादित अर्थानेदेखील यांतून एक तंत्रज्ञान निर्माण होण्यासारखे आहे. इतर मार्गांनी न कळू शकणाऱ्या घटनांचे ज्ञान वा लष्करी गुपि-तांची फोड शक्य होईल. रोग होण्याआधीच त्याची लक्षणें दिसून प्रतिबंधक औष-धांना नवे क्षितिज प्राप्त होईल. भूमिगत पाणी, धातू शोधणे सुलभ होईल. हरव-लेल्या गोष्टी सहज सापडू शकतील. प्राचीन कालापासून हिंदूना पुनर्जन्माच्या कल्पनेबद्दल विशेष आपुलकी आहे. अर्थात नेहमीप्रमाणे प्रत्यक्षानुभवाने सिद्धता देण्याचा शास्त्रशुद्ध प्रयत्न आजपर्यंत झालेला नाही. समजा बॅनर्जींच्या वा अन्य कोणाच्या संशोधनानंतर पुनर्जन्म सिद्ध झाला तर त्यांतून कर्मविपाक, जन्मसिद्ध जातिव्यवस्था अस्पृश्यता यांना शास्त्रीय आधार मिळेल का काय? 'माझ्या संशोधनाचा असा उपयोग होत असल्याचे मी ऐकतो. परंतु परंपरानुगामी कोण-त्याही आचार वा पद्धतीचा हे संशोधन आधार होऊं दिले जाणार नाही. मी त्या सर्वांविरूद्ध आहे'. असे बॅनर्जीनी मुद्दाम सडेतोडपणे सांगितले. आणि शेवटी बॅन-र्जींचे ध्येय पुनर्जन्माचा खरेखोटेपणा ठरवणे हे नाही. त्यांना मानवी व्यक्तित्वाचे तलम पापुद्रे वेगळे करून पाहायचे आहेत. **मानवाचे अंतरंग शोधायाचे आहे.** वस्तु-मात्रापेक्षां मानवी मनाची पातळी वरची आहे. त्याची ताकद प्रचंड, गुरू अरविंद यांचा अतिमानसी मानव (सुपरमेन्टल मॅन) हा प्रत्यक्षात शक्य आहे. फक्त तो शोधला पाहिजे, घडवला पाहिजे या दृढ श्रद्धेतून बॅनर्जींनी स्वतःला अतिमानस-शास्त्राला वाहून घेतले आहे.

परंतु वैज्ञानिक जगतामधील या संशोधनाबद्दल एकंदर मत अत्यंत प्रतिकूल आहे. विज्ञानाची ही सर्वांत बदनाम शाखा आहे. किंबहुना विज्ञानाची शाखा म्हणून या विषयाला पुरेशी मान्यताही नाही. लंडन सायकिकल सोसायटी, ड्यूक विद्यापीठ अमेरिका, ही या विषयांतील प्रसिद्ध पीठे. त्यांच्याबद्दलही पाश्चिमात्य देशांत खूप वादळ माजले. ते अजूनही शमलेले नाही. हे शत्रुत्व का? त्याला काही कारणे आहेत. एक महत्त्वाचे कारण म्हणजे १९ व्या शतकाच्या अंतापर्यंत (म्हणजे उपरोक्त संस्थांच्या स्थापनेपर्यंत) या क्षेत्रात शास्त्रीय संशोधन झालेच नाही. लफंगे, जादूगार, चेटकी या मंडळींचा हा प्रांत. दुसरी गोष्ट म्हणजे स्थलकाल कारणाच्या मर्यादेत,

पंचेंद्रियाच्या संवेदनेद्वारा विश्वाला गवसणी घालू पाहणाऱ्या विज्ञानाला ही ज्ञानशाखा मुळातच परकी वाटते. त्याचा पाया उखडून टाकू पाहणारी वाटते. तिसरी आणि सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे या प्रांतातील अनुभव पुष्कळ अंशी व्यक्तिनिष्ठ, पुनः पुनः सहज न घेता येण्याजोगे असे आहेत. आणि साक्षात्कार वगैरे प्रकाराचे शास्त्राला वावडे. व्यक्तिनिरक्षेप नियम हा शास्त्राचा प्रांत. पद्धत प्रयोगांची. उलट अति मानसशास्त्रात प्रयोगांच्या उपयुक्ततेला फार मर्यादा पडतात. त्यामुळे ज्यांच्यामध्ये विशेष शक्ती आहे असे वाटते त्या मंडळींचा प्रत्यक्ष अभ्यास करावा लागतो. म्हणून सगळीकडे ' केस स्टडीज 'ची गडबड ऐकू येते.

बॅनर्जींनी आजपर्यंत निरनिराळ्या विषयांत सुमारे ६०० केस स्टडीज केले आहेत. उदा. १९५८ साली ' माइंड सायन्स फाउंडेशन सॅन डिआगो टेक्सास 'च्या मदतीने केलेला सापाचे वीष उतरवणाऱ्या मांत्रिकांचा अभ्यास. अनेकांच्या भेटी घेतल्या. साप चावलेल्या प्राण्यांवर त्यांना उपचार करायला लावले. सगळ्या खटाटोपातून निष्कर्ष असा निघाला की वीष उतरवतो म्हणणारापैकी कोणाजवळही खरी विशेष शक्ती नव्हती. त्यातली गोम अशी की भयंकर विषारी साप चावलेले लोक तडकाफडकी मृत्युमुखी पडतात. खेडेगावात वाहनाशिवाय दूरच्या मांत्रिकाजवळ जाईपर्यंत जिवंत राहिलेल्यांचा सर्पदंश जेमतेमच असतो म्हणून मांत्रिकांचा परिणाम झाल्याचे भासते. तथाकथिक अद्‌भुत शक्तींना शास्त्रीय निकशावर घासून पाहण्याची पद्धत येथे स्पष्ट होते.

अर्थात बॅनर्जींचा मुख्य विषय पुनर्जन्म हा आहे. त्यातल्या केस स्टडीज बद्दल कितीतरी आश्चर्यकारक गोष्टी त्यांनी सांगितल्या. सुमारे ६०% लोकांना पूर्वजन्मी अपघाती मृत्यू आल्याचे स्मरते. पूर्वजन्माची आठवण येणाऱ्यांत सुमारे ७५% मुले असतात. पूर्वजन्म आणि सध्याचा जन्म यातील परिस्थितीत जितके जास्त अंतर तितकी ती केस जास्त स्ट्रॉंग, म्हणजे दोन जन्मांतील धर्म वेगळे, वा प्रांत वेगळे, भाषा वेगळ्या, देश वेगळे वगैरे. कारण एरवी अशीच माहिती मिळण्याची शक्यता कमी होते. सिमल्याची एक मुलगी पाचव्या वर्षीच फ्रेंच बोलू लागली याचा अन्वय कसा लावायचा ? या केसेस तपासण्याची पद्धत मोठी जिकिरीची असते. आजूबाजूच्या २५–३० लोकांच्या सविस्तर पुनः पुनः मुलाखती घ्याव्या लागतात, मानसशास्त्रीय चाचण्या घ्याव्या लागतात, बनवाबनवीची शक्यता तपासून पाहवी लागते. एक ना दोन. एक एक केस काही वेळा वर्षभरही कटकट देत असते. कित्येकदा कुठेतरी वाचलेली माहिती आठवते आणि मूळ न सापडल्याने मनापासून गेल्या जन्मीची वाटू लागते. किंवा टेलिपथीसारख्या मार्गानेही माहिती मिळवण्याची शक्यता असते. बहुतांश पुनर्जन्मी मंडळी दक्षिण आशिया व अलास्कामध्ये मिळाली आहेत. इसाई व इस्लामदेशात पुनर्जन्म प्रचलित कल्पनात बसत नसल्यामुळे अशा मंडळींची आजवर चेष्टा व दडवणूक होत असे. हळूहळू वातावरण बदलत

चालले आहे. कोणाचीही सहानुभूतीपूर्वक चौकशी करण्याची बॅनर्जींची तयारी असते. त्यांना एका कार्डानें कळवण्याचाच अवकाश आपल्या अभ्यासाच्या मर्यादांबाबत बॅनर्जी अत्यंत परखड आहेत. फारसे काम झालेले नाही असे ते फिरून फिरून आवर्जून सांगतात. मानसशास्त्राच्या दोनतीन अभ्यासू विद्यार्थ्यांनी जर त्यांच्याकडे संशोधनाचे काम करण्याकरिता तयारी दाखवली तर वेग खूप वाढू शकेल असे ते म्हणतात. (शिष्यवृत्त्यांचीही व्यवस्था होऊ शकेल.) पण आतापर्यंतच्या अनुभवावरून तरी पुनर्जन्मकल्पनेला पुष्टीच मिळते हे कबूल करावे लागेल असे ते म्हणतात. एका जन्मातील भावना-जाणिवा-अनुभव दुसऱ्या जन्मानंतरही जीवाला चिकटून राहू शकत असतील तर ही शक्ती त्यांना कोठून मिळते हा प्रश्न उभा राहतो. याला सोपे उत्तर अजून मिळाले नाही. पण एक शक्यता म्हणजे मृत्यूनंतरही उतरणाऱ्या आत्मिक शरीराची (ॲस्ट्रल सब्स्टन्स) कल्पना बरोबर असणे. त्याशिवाय एक व्यापक उपपत्ती बॅनर्जी स्वतः मांडू पाहत आहेत. तिला साइक इन्डक्शन असे नाव ते देतात. अतिमानसी शक्ती मानवाकडे निसर्गानेच चालून येतात. पण त्यांचे पूर्ण आकलन झाल्यास मानवी जीवनाचा अज्ञानावर आधारित समतोल ढळेल म्हणून की काय, त्या विकृत स्वरूपात बाह्य मनापर्यंत पोचतात. सोपेच उदाहरण द्यावयाचें झाले तर एखाद्या प्रसंगी शक्य असलेल्या घटनांपैकी एखादीबद्दल आपल्याला उगाचच जास्त शक्यता वाटते. पण बहुधा आपला अंदाज खोटा ठरतो. वस्तुतः भविष्यांतील घटना जाणणारी शक्ती आपणांमध्ये काम करीत असते पण एका नैसर्गिक प्रतिबंधक अडचणीमुळे निष्पत्ती मात्र खोटी ठरते. पण अशा अकरणात्मक घटनांतून अतिमानसी शक्तीचे अस्तित्व शक्य वाटू लागते. अर्थात या सबंध उपपत्तीचे किंवा संपूर्ण संशोधनाचेच स्वरूप खूपसे प्राथमिक आहे. पण हे थोडेसे विषयांतर झाले. सांगण्याचा मुद्दा असा की औपपत्तिक बाबीत फारशी प्रगती न केलेल्या विषयाचा निव्वळ केस स्टडीजमधून अभ्यास करणे ही मोठी सायासाची गोष्ट आहे. अशा अडचणीची कल्पना येण्यासाठी एका केसची माहिती थोडक्यात देतो.

जयपूरच्या एका सुसंस्कृत सुशिक्षित कुटुंबातील एक लहान मुलगी बोलायला शिकल्याबरोबर आईला सांगू लागली की 'मी अमक्या कॉलेजात शिकत होते. तिथे छपरावरून पडून मेले' इ. आई सरकारी शिक्षणाधिकारी आहे. तिने सक्तीनें मुलीला हा खुळेपणा बंद करायला लावला. त्यानंतर ७–८ वर्षांनी बॅनर्जींच्या संशोधनाची सविस्तर माहिती तिच्या कानांवर आली आणि तिने आपल्या मुलीची केस पाहण्याची त्यांना विनंती केली. त्यानंतर त्या कॉलेजात जुनी कागदपत्रे, दुखवटयाच्या सभांचे उल्लेख वगैरे धुंडाळल्यावर १९५३ साली एम्. ए. राज्यशास्त्राची एक विद्यार्थिनी खरेच छपरावरून पडून मेल्याचे सापडले. तिच्या घरचा तिच्या मैत्रिणींचा मागोवा काढण्यात आला. बॅनर्जींच्या संशोधन सहाय्यक श्रीमती

सक्सेनांनी आता १३ वर्षांच्या झालेल्या 'सबजेक्ट' शी मैत्री करून घेतली. नंतर या मृत विद्यार्थिनीचा फोटो तिच्या समवयस्क वाटणाऱ्या १०–१२ फोटोंबरोबर 'सबजेक्ट' ला दिला आणि तितकी नावे यादी करून दिली. त्यात एक नाव त्या विशिष्ट मुलीचे वास्तवांतले होते. मनाप्रमाणे नावे आणि फोटोंची जुळणी करण्याचा 'खेळ' सबजेक्टला दिला. ८०% वेळा तिने मृत मुलीच्या फोटोला बरोबर नाव दिले व शेवटी तर 'मला खात्री आहे. हिचे नाव शकुंतलाच आहे' अशी कबुली दिली. त्यावर तोच खेळ खेळत असलेल्या तिच्या भावाने 'ही खोटे बोलत आहे. आमची शकुंतलेशी मुळीच ओळख नाही. हिने तिला कधीच पाहिलेले नाही.' अशी तक्रार केली. नंतर 'चल जाऊ फिरायला' असे म्हणून तिला शकुंतलेच्या मैत्रिणींच्या घरी घेऊन जाण्यात आले. बुद्धिपुरःसर तिला एकटे सोडून इतर राजकारण, हवापाणी यांवर बोलत राहिले. थोडया वेळात 'तू कंटाळली नाहीस ना? असे विचारल्यावर 'छे : मी इथं आधी बऱ्याचदा आले आहे.' असं तिने सांगितलं. नंतर समोर दिसणारा एक फोटो पाहून ती म्हणाली 'ही बिमलेश कुठं आहे ?' बिमलेश शकुंतलेच्या मैत्रिणीची धाकटी बहीण. शकुंतलेच्या घरी गेल्यावर 'सबजेक्ट' परिचिताप्रमाणे सर्वत्र फिरली. पण तिची मैत्रीण एका विशिष्ट जागी गेल्यावर घाबरून तिने सांगितले 'तिथे जाऊ नकोस. पडशील बिडशील.' शकुंतलेच्या पडण्याची जागा तिने ओळखली होती. शेजारी एका खोलीमध्ये सहज डोकावून पाहिल्यावर ती म्हणाली 'इथली टेबल खुर्ची कॉट कपाट पुष्पपात्र यांची रचना अशी केली तर किती सुंदर दिसेल नाही ?' हे गूढ चटकन उकलेना. दरम्यान सर्व संबंधियांच्या वारंवार मुलाखती होत असत. एकीत तिच्या आईने सांगितले की ही विचारते की आई ब्राह्मण-कायस्थांची लग्न होतात का ग ? दुसऱ्या कोणी आणखी एक धागा दिला की वर उल्लेखलेल्या खोलीत राहणाऱ्या कायस्थ जातीच्या डॉक्टरीच्या विद्यार्थ्याबरोबर प्रेमविवाह करण्याचा शकुंतलेचा निश्चय होता. बॅनर्जी आता त्या डॉक्टरच्या शोधात आहेत. आणि या सगळया उचापती करताना वातावरण निरुत्साही. पन्नास वेळा उद्देश समजावून सांगितल्याशिवाय कोणी सहकार्य द्यायला तयार व्हायचे नाही. प्रयोगासाठी कॉलेज विद्यार्थिनीचे फोटो गोळा करू लागावं तर 'तुमचा खरा धंदा काय ?' हा प्रश्न. कॉलेजची रेकॉर्डस् काढून द्यायची तर क्लार्क्स महत उपकाराच्या भावनेत काय करणार. इतर अनेक 'मेल्या गेल्याबद्दल कशाला काय बोला' म्हणून माहितीच न सांगत. पण न कंटाळता समजावून सांगितल्यावर अनेकांना या उपक्रमात रस वाटून मदतही करीत.

या आणि इतर सर्व केसेसचे संबंधित कागदपत्र, फोटोग्राफ, सर्टिफिकिटे, वृत्तपत्रकात्रणे बॅनर्जींच्या कार्यालयात कोणाही जिज्ञासूला पाहायला मिळतात. ही सगळी माहिती १९५७ पासून गोळा करीत आणलेली आहे. त्या वर्षी गंगानगर (राजस्थान) इथे एका देणगीदाराच्या मदतीने अतिमानसशास्त्र संस्था स्थापन

झाली. बॅनर्जी तिचे संचालक. या संस्थेच्या कार्याबद्दल रस वाटून राजस्थान शिक्षण मंत्रालयाने शिक्षक-विद्यार्थी यांमधील संभाव्य टेलिपथिक संबंधांचे संशोधन करण्यास अनुदान दिले. त्यानंतर उत्तरप्रदेश शिक्षण खात्यानेही पंचेंद्रियातीत संवेदना आणि बुद्धिमत्ता यांच्या संबंधाचे संशोधन करण्याचा प्रकल्प संस्थेला सुपूर्द केला. १९५९ पासून 'इंडियन जर्नल ऑफ पॅरासायकॉलॉजी' हे त्रैमासिक संस्थेतर्फे चालवण्यात येऊ लागले. आज त्याचे २००० वर्गणीदार असून त्यांपैकी १२०० विद्यापीठे, वाचनालये व संशोधनसंस्था आहेत. १९६३ साली त्या वेळचे राजस्थानचे राज्यपाल संपूर्णानंद यांच्या प्रोत्साहनाने व कुलगुरूंच्या पुढाकाराने राजस्थान विद्यापीठाने ही संस्था जयपुरला बोलावून घेऊन तिचे विद्यापीठ विभागात रूपांतर करून घेतले.

यानंतर लगेच विद्यापीठीय राजकारणाच्या चरकात सापडून बॅनर्जींच्या कारकीर्दीचे दुष्ट पर्व सुरू झाले. प्रथम म्हणजे हा विभाग तत्त्वज्ञान विभागाच्या कक्षेत असावा असे प्रयत्न सुरू झाले. गंगानगरपासूनच संस्थेला परदेशांतून वगैरे पुष्कळ अनुदाने मिळत असत. ती आता सर्वांच्या डोळ्यात सलू लागली. केस स्टडीज करता व्याख्यान दौऱ्यांच्या निमित्ताने बॅनर्जींच्या अनेक विलायत वाऱ्या होत. त्यामुळे काहींना वाईट वाटू लागले. मग हळूहळू प्रचाराला सुरुवात झाली. 'राजस्थान पत्रिका' नावाच्या एका स्थानिक वृत्तपत्रालाही त्यात सामील करून घेण्यात आले. उदा. परवा ५ जूनला शिक्षणमंत्र्याच्या वार्ताहर–परिषदेत असे सांगण्यात आले की बॅनर्जींच्या संशोधनाची प्रशंसा करणारी अनेक पत्रे आमच्याकडे येतात. पण त्या विभागाला आम्ही अनुदान देत नाही. ही बातमी 'राजस्थान सरकारने बॅनर्जींचे अनुदान बंद केले.' अशा मथळ्याखाली छापण्यात आली. एकदा तर कहर झाला. अमेरिकेतील एका धनाढ्य गृहस्थाने मृत्युपत्रांत अतिमानसशास्त्र संस्थेला बॅनर्जींच्या संशोधनकार्यासाठी २ लाख डॉलर्सची देणगी दिली. त्यानंतर बॅनर्जी मृत्यू पावल्याचे 'न्यूयॉर्क टाइम्स'ला कळवण्यात आले. त्या दैनिकात या पत्रावर विसंबून एक मृत्युलेखही लिहिला गेला. कारण हे पत्र विद्यापीठामार्फत गेले होते! ही दीड वर्षामागची गोष्ट. गेले तीन वर्षे विद्यापीठाचे कार्यालय (म्हणज मुख्यतः कुलसचिव श्री. सिंगाल) अतिमानसशास्त्र विभागाची कोणतीही बिले देत नाहीत. येवढेच नव्हे तर कर्मचाऱ्यांपैकी कोणाचाही पगारदेखील देत नाहीत. विभागाला मिळणाऱ्या देणग्यांतून बॅनर्जी हा खर्च (वार्षिक १ लाख रु.) चालवितात आणि कार्यालयाशी न्यायाचे भांडणही. विद्यापीठ शिक्षक संघाने या सर्व भानगडीची चौकशी करण्यासाठी एक विशेष समिती नेमली. तिला काहीही सांगण्याचे कुलसचिवांनी साफ नाकारले. बॅनर्जींजवळचा कुलसचिवांबरोबरील पत्रव्यवहार, हिशेब व इतर कागदपत्र पाहून त्या समितीने नाइलाजाने एकतर्फी अहवाल प्रसिद्ध केला, त्या अन्वये विद्यापीठाने बॅनर्जींना अत्यंत गर्हणीय वागणूक दिली आहे. त्यांना

बोलावून आणताना मान्य केलेल्या गोष्टी टाळल्या जात आहेत. विद्यापीठाच्याच कित्येक समित्यांनी शिफारशी करूनदेखील हा विभाग अजून कायमही करण्यांत आलेला नाही.

त्याशिवाय त्यांच्या विद्याशाखेतील काही हितशत्रूंनी खटपटी केलेल्या आहेतच. उदा. श्री. आयन स्टिव्हन्सन् नावाच्या अमेरिकन अतिमानसशास्त्रज्ञाने मुद्दाम दिलेल्या पत्रावरून विद्यापीठ अनुदान मंडळाने बॅनर्जींच्या अभ्यास विभागाची चौकशी करणारी समिती नेमली. पण हे शास्त्रज्ञ गंगानगरला बॅनर्जींच्या संशोधनाचा उपयोग करून स्वतःच्या नावावर लेख प्रसिद्ध केल्याचे उघडकीला आले आहे. त्यात वर उल्लेख आलेल्या उत्तर प्रदेशातील पाहणीचे चौर्य समाविष्ट आहे. चौकशी समितीवरील नेमणुकांत राजस्थान विद्यापीठ कार्यालयाचा मोठा हात असून सर्व माणसे बॅनर्जींना उघड शत्रू समजणारी होती असे त्याचे म्हणणे आहे. आणि एक आश्चर्यकारक सत्य असे की अनुदानमंडळाने हा अहवाल मागे घेतला असून या विभागाला परत मदत करण्याची तयारी दाखवली आहे. पण त्यांच्या पद्धतीप्रमाणे तशी मागणी मांडण्यास विद्यापीठ तयार नाही. असा हा पेच.
या सर्वांतून बॅनर्जी क्वचित वैतागतात. अमेरिका कॅनडा इकडून प्राध्यापकाच्या जागेची येणारी बोलावणी मान्य करावी असे वाटू लागते. पण ते ठरवतात, नाही. शक्यतो देश सोडून जायचे नाहीच. त्यातूनही पाळी आलीच तरी आधी आपला खरेपणा जगाला पटवून मग राजस्थान विद्यापीठ सोडावयाचे !

या कथनाला दुसरी बाजू असणे अशक्य नाही. पण ती उजळ माथ्याने मांडण्याचे धाडस संबंधितांना होत नाही ही गोष्ट बोलकी आहे.

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या समितीनंतर म्हणजे फेब्रुवारी १९६८ मध्ये कानपूर विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या वतीने अतिमानसशास्त्राचा अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दृष्टीने, या विभागाची पाहणी करणारी समिती नेमण्यात आली. तिच्यात दिल्ली व अलीगड विद्यापीठांचे मानसशास्त्रप्रमुख होते. या समितीच्या मतानुसार बॅनर्जींची प्रत्यक्षानुभवावर आधारित अभ्यासपद्धती स्वागतार्ह आहे. परंतु प्रयोगात्मक अभ्यास मात्र पुरेसा होत नाही. या विभागाचे ग्रंथालय नियतकालिके, पुस्तके यांनी समृद्ध आहे. प्रयोगशाळाही पुरेशी उपयुक्त आहे. विद्यापीठामध्ये असे विभाग काढण्यास उत्तेजन द्यावे. संशोधनाचे हे नवे क्षेत्र असून ज्ञानाची क्षितिजे रुंदावण्यास त्याची मदत होणे शक्य आहे. लखनौ, म्हैसूरमध्ये असे अभ्यासक्रम सुरू आहेतही काही ठिकाणी या विषयावर पी. एच्. डी दिली जाते. पण अजून सर्वत्र अभ्यासक्रम सुरू करण्याइतका या विषयाचा विकास झालेला नाही.

स्टॅन्फर्ड, हार्वर्ड, बोस्टन, ड्यूक, पिटस्बर्ग, टेक्सास, फिलाडेल्फिया, केंब्रिज (इंग्लंड), उट्रेक्ट (हॉलंड), इत्यादी विद्यापीठांत हे अभ्यासक्रम आहेत; शिष्यवृत्या मिळतात. रशियामध्येही सुमारे २०० शास्त्रज्ञ या क्षेत्रात ८ केंद्रांमध्य काम

करित आहेत. त्यांच्याबरोबरचा पत्रव्यवहार बॅनर्जींच्या कार्यालयांत पाहावयाला मिळतो. भारतात या क्षेत्रात काही केले गेले तरी तो साहसवाद खचित ठरणार नाही.

मी बॅनर्जींशी बोलून, कागदपत्रे पाहून, लेख, टिपणे वाचून मिळवलेल्या माहितीचा सारांश हा असा आहे. त्यावर अनुकूल प्रतिकूल मत व्यक्त करणे, टीका करणे फार कठीण आहे. व्यक्तिशः माझी मनोभूमिका पंचेंद्रियातीत विश्वाच्या कल्पनेला झटकून टाकू पाहणारी आहे. परंतु शास्त्रीय संशोधनातून नवीन पुरावे बाहेर येत असतील तर त्यांच्याकडे पूर्वग्रहरहित दृष्टीने पाहिले पाहिजे. अजून कोणतीही ठाम भूमिका घेण्याची निकड दिसत नाही. मर्यादित वेळामध्ये येथील सर्व गोष्टी पाहिल्यानंतर एक मात्र वाटते की बॅनर्जींच्या कामात फ्रॉडची शक्यता फार थोडी आहे. सर्व गोष्टी तपासणीला उघड्या आहेत. त्या पुनः पुनः काळजीपूर्वक पाहण्यालाही हरकत नाही. परंतु बॅनर्जींना ज्या प्रकारे आज वागवले जात आहे ती पद्धत कमालीची आक्षेपार्ह आहे, असेच कोणाही अभ्यासकाला वाटेल. बॅनर्जींना न्याय्य वागणूक मिळाली पाहिजे, कोणत्याही संशोधकाला मिळाली पाहिजे असे लोकमत बनण्याला या माहितीने थोडी मदत झाली तर लेखाचे उद्दिष्ट पूर्ण झाले असे म्हणता येईल. ■■

### शास्त्रज्ञ आणि उपजत प्रेरणा.....

शास्त्रज्ञसुद्धा अनेक वेळा शास्त्रीय नियम आणि निकष बाजूला ठेवतात. स्वःतच्या उपजत प्रेरणांवर विश्वास ठेवतात. आईनस्टाइन आणि बोहर यांचा झालेला वाद या दृष्टीने पाहण्यासारखा आहे. अनेक दिवस हा वाद सुरू होता. बोहरने सांगितलेल्या अणुरचनेतला कमकुवतपणा आईनस्टाइन दाखवून देई. बोहर थोडा गोंधळून जाई. पण दुसऱ्या दिवशी आईनस्टाइनच्या शंकेचे निरसन करील असे उत्तर बोहरला सापडलेले असे. आईनस्टाइन पुन्हा एखादी नवी शंका पुढे मांडी. बोहर पुन्हा गोंधळून जाई. पण दुसऱ्या दिवशी याही प्रश्नाचे उत्तर बोहरला सापडलेले असे.

अखेर शेवटी आईनस्टाइन म्हणाला, "बोहरचे म्हणणे पूर्णपणे बरोबर आहे. पण तरीही माझ्या उपजत शास्त्रीय प्रेरणांच्या ते एवढे विरुद्ध आहे की पूर्णत्वासाठी चाललेली माझी धडपड मी थांबवू शकत नाही. काळाच्या विशाल संदर्भात शेवटी मी बरोबर ठरेन असा माझा विश्वास आहे. माझा आतला आवाज मला तसे सांगतो आहे!"


प्रस्थापित निर्यातदार किंवा परदेशांशीं व्यापार करूं इच्छिणारे उदयोन्मुख कारखानदार आमच्या 'छोटा खोका योजने' चा फायदा घेऊं शकतात. ते आपल्या मालाचे नमुने किंवा थोड्या प्रमाणांत माल, साध्या किंवा रजिस्टर्ड पोस्टानें विमानानें किंवा आगबोटीनें पाठवूं शकतात.

हें 'छोटें खोकें' आमच्या ठराविक आकाराचें असावें.

## छोटें खोकें योजने द्वारा

# निर्यात व्यापाऱ्यांचा

## परदेशांशीं परिचय




टपाल हंशील :
प्रत्येक ग्रॅमला ३० पैसे,
किमान १ रुपया.
अधिक तपशील कोणत्याहि
टपाल कचेरीत मिळेल.

भारतीय टपाल आणि तार खातें

# सागर

चंद्रशेखर

सकाळचे सात वाजले आहेत. हाजरामोडवरच्या एका कॉफी हौसात मी स्वस्थ बसलो आहे– सिगारेटचे झुरके घेत. आज कलकत्त्यातील शेवटचा दिवस. रस्त्यावर कोणी एक अनामिक उभा राहून मला बंगालीत काहीतरी विचारतो आहे.

आफतच आली. मी गल्लेवाल्याला विचारतो. तो सांगतो, अनामिक चहाची किंमत विचारीत आहे. मी हसतो– त्याला एक चहा दे म्हणून सांगतो. आणि नुकतेच विकत घेतलेले एक महाअफलातून पॅंफ्लेट वाचीत राहतो.



# ३

माझ्या शेजारी दोन बंगाली तरुण बसले आहेत. एक लहानखुरा, कुरळ्या केसांचा, चष्मेवाला, कोरीव मिशांचा आणि कुरता-पाजाम्यातला. दुसरा खादीच्या बुशर्ट व पँटमध्ये. उलटे वळवलेले आखूड केस, गुळगुळीत दाढी, कोणावर तरी गुरकावीत असल्यासारखे ओठ, नजरेत भरण्याइतके विस्फारलेले डोळे. एकूण शरीरयष्टी तुंदिल पण अस्ताव्यस्त नव्हे ! ते दोघे आपसात काही बोलत आहेत.

मी लक्ष देत नाही. गेले सात दिवस बंगाली तरुणांशी अशी सहज ओळख काढण्याचा माझा अनुभव चांगला नाही. मी थोडा स्लाईटेड झालो आहे.

माझ्या शेजारच्या खुर्चीवर 'वेस्ट बेंगॉल' हे राज्यसरकारचे प्रकाशन आहे. मीच विकत घेतलेले. त्याच्यावरचे चित्र फार आकर्षक आहे म्हणून.

बोलता बोलता तुंदिल बाबू तो अंक हाती घेतात आणि माझ्याकडे पाहत आपल्या दोस्ताला म्हणतात–' इज देअर एनी सच 'पब्लिकेशन ऑफ गव्हर्मेंट ? फनी ! आय डिड नॉट कम अॅक्रॉस इट सो फार.'

मी चान्स घेतो आणि म्हणतो, 'मीदेखील महाराष्ट्रसरकारची प्रकाशने विकत घेत नाही. येथे नवखा आहे म्हणून घेतली एवढेच !'

तेवढ्या आत्मनिंदेने ते दोघे बंगाली माझ्याशी गप्पा मारू लागतात. पहिला प्रश्न 'मुंबईत कलकत्त्याबद्दल काय रिॲक्शन आहे. ?'

'धक्कातंत्र अवलंबिणे सहज वाढे बोलणे' हा आमचा मंत्र. समोरच्याला धक्का द्या– म्हणजे तो त्याच्या गुहेतून बाहेर येतो. आपल्याला त्याच्याकडे जावे लागत नाही.

मी दणकून सांगतो ' कलकत्त्याला नवीन बँकेची शाखा काढावयाची नाही असा बँक-संघटनेने निर्णय केला आहे. महाराष्ट्र बँकेची शाखा काढण्याची सर्व तयारी पूर्ण झाली असतानाही ती शाखा काढण्याचा विचार बँकेने (जवळ जवळ) रद्द केला आहे.

एवढे बोलून मी नवी सिगारेट पेटवतो. समोरचा प्राणी काडीवाचून पेटतो. गुहा त्याचे नाव. टेक्नॉलॉजीमधला एम्. एस्सी. कलकत्ता युनिव्हर्सिटीत प्राध्यापक. बोलण्याचा ढंग ठाशीव. हातवारे अत्यंत उतावीळ. त्याचा सोबती– रॉय त्याचे नाव. चेहऱ्यावरचा गोंधळल्याचा भाव एवढेच त्याचे व्यक्तिमत्त्व.

गुहा तडातडा बोलू लागतो. 'लुक हियर चंद्रशेखर. बाहेरच्या लोकांनी बँका काढल्या नाहीत तर बंगालचे काही बिघडणार नाही. बंगाल हॅज ए फोर्स ऑफ्

हर ओन.'

तो फोर्स तुम्ही जर समजून घेतला नाहीत– आज बंगाली तरुणाच्या मनात जे एक वैचारिक वादळ घोंघावते आहे त्याचा अंदाज घेतला नाहीत तर तुमच्या साऱ्या बँका बंद कराव्या लागतील– बंगालबाहेरच्यासुद्धा! '

गुहाचे बोलणे तोडण्याचा मी एकदोनदा क्षीण प्रयत्न करतो. फार वेळ दुसऱ्या कोणाचा आवाज माझ्या कानांना सहन होत नाही. पण त्याचा सोबती मला खाजगी टीप देतो–' नुसते ऐकत राहा– बोलू नका.' मी आज्ञाधारकपणे नोटबुक काढतो आणि गुहाचे सर्व नाव–पत्ता विचारू लागतो. गुहाचे डोळे गरागरा फिरतात–. पंजाची एक तुच्छतादर्शक हालचाल करून तो खेकसतो ' व्यक्तीला काही किंमत नाही– इट इज द थिंकिंग दॅट कौंट्स '

माझी मते विचारण्यासाठी माझी ओळख करून घेणारा गुहा मग तासभर बोलत राहतो.. त्याची मते खणाखण माझ्या अंगावर फेकतो– बेफिकिरपणे– मी ती स्वीकारलीच पाहिजेत या एका ठाम विश्वासाने !

गुहाचे म्हणणे थोडक्यात असे–

' बंगाली तरुण अशांत आहे. वंचित आहे. भ्रांतचित्त आहे. वीस वर्षांच्या काँग्रेस राजवटीने वैतागून लोकांनी यू. एफ. ला सत्ता दिली. ते लोकही नालायक आहेत. बंगाली तरुणांची एकही समस्या आजवर सुटलेली नाही.

कोणते राजकीय तत्त्वज्ञान स्वीकारावयाचे याचा निर्णय होत नाही. तोवर कोणतीही समस्या सुटणार नाही. अनेक राजकीय तत्त्वज्ञाने आज बंगाली तरुणांच्या मनाचा कबजा घेण्यासाठी धडपडत आहेत. ती निवड करण्याच्या प्रोसेसमध्ये आहे.

कलकत्त्यामधील तरुणांचे क्रीम आज नक्षलवादाच्या आहारी गेले आहे. सर्व रस्ते बंद झाल्याने सुधारण्याची कसलीही अशा नसल्याने बंगाली तरुण आज एंडिझम-कडे झुकत आहे. बेटर एंड इफ यू कॅनाट मेंड !

सर्वोत्कृष्ट गुणवत्ता असलेल्या बंगाली तरुणास आज नोकरीसाठी वणवण फिरावे लागत आहे. भ्रष्ट राजकारणाचा दुष्ट हात बंगाली यौवनाच्या गळ्याभोवती आवळला जात आहे. तरीही विश्वास ठेवा बंगाली तरुण प्रांतीयवादी नाही. अलिकडे असा प्रचार निष्कारण केला जात आहे.'

ही संधी घेऊन मी आणखी एक वळसा देतो ' बंगाली हा प्रांतीयवादी नाही याचे कारण त्याचे दुसऱ्या राज्यांशी आजवर कॉन्फ्रॉन्टेशन झालेले नाही.'

गुहा एक मिनीट डोळे मिटून स्वस्थ बसतो. दूर खोल कोठेतरी त्याच्या मनाच्या ' एक्झिक्यूशन ' रूममध्ये तो माझ्या मुद्याचा खिमा करीत असावा.

' चंद्रशेखर, मला तुझी कीव वाटते. तुला वाटते तू पत्रकार. शहाणा. सर्व गोष्टींचा अर्थ समजणारा–तुझी ही गैरसमजूत आहे. बंगालचे कॉन्फ्रॉन्टेशन होईल ते इतर राज्यांशी नव्हे. दुसऱ्याच एखाद्या शक्तीशी. त्या सामन्याची बंगाल मानसिक तयारी

करत आहे. आयडिऑलॉजी इज एव्हरी थिंग. आपल्या सोकॉल्ड इंडिया दॅट इज भारतला आयडिऑलॉजी नाही. आपला व्यावहारिक बळी देऊन बंगाल ही देणगी देशाला देईल. अंडरस्टॅंड ?

आम्हांला वेळ द्या. काही विचार करू द्या. झूमधल्या प्राण्यासारखे आमच्याकडे बघू नका. टोचू नका.'

मी हळूच घड्याळाकडे पाहिले. गुहा हसला. त्याच्या तात्त्विक मुद्रेवरची असहाय्यता अंतर्धान पावली आणि सर्व गोष्टींचा नीट अभ्यास करून आपली मते बनव असा सल्ला देऊन त्याने माझा निरोप घेतला.

त्याने माझा निरोप घेतला पण मी त्याचा घेऊ शकलो नाही. नंतर दोन तासांनी त्याचा सोबती मला रस्त्यावर भेटला. हातात थर्मास होता. मी हसून म्हटले.

'सो वी मीट अगेन. गुहा कुठं आहे ?'

'आहे !' रॉय हसत बोलला. 'काल रात्री आमचे काका वारले. त्यांच्या अंत्ययात्रेची तयारी करण्यासाठी आम्ही येथे जमलो आहोत. गुहा येथे आहे ! गुहाचे ते काकाच !'

माय गॉड ! मी नखशिखांत शहारलो आणि हादरलो ! घरी पडून असलेल्या मृत्यूच्या छायेत हा गुहा नव्या तत्त्वज्ञानाच्या जन्माची स्वप्ने मला सांगत होता. त्याच्या चर्येवर उतावीळ आत्मविश्वासाखेरीज दुसरा कसलाही भाव केव्हाही नव्हता. गॉड ब्लेस हिम !

रॉयची औपचारिक माफी मागून मी सटकलो ! गुहाचे शब्द माझा कितीतरी वेळ पाठलाग करीत होते.

--इंडिया कॉफी हौस-सकाळी दहा वाजले आहेत. मी दाराकडे बघतो आहे। ठरलेल्या वेळी असीमकुमार येतो. सौम्यपणे गुड मॉर्निंग म्हणत माझ्या शेजारच्या खुर्चीवर बसतो. वय वर्षे २६. मूळचा पूर्व बंगालमधला. शरीरयष्टी लहानखुरी. चेहऱ्यावर संघाचा अदृश्य पण जाणवणारा छाप. हा मुलगा गेली वीस वर्षे कलकत्यात संघाचे काम करतो.

असीमच्या कामाला सीमाच नाही. एका बंगाली साप्ताहिकाचा तो संपादक आहे. युगांतर या दैनिकात तो डेस्क एडिटर आहे. शिवाय तरूण भारताला वार्तापत्रे पाठवतो. दिवसभर आणि रात्री सुद्धां त्याचे काम चालूच असते. पण चेहऱ्यावर कसलाहि ताण दिसत नाही !

कॉफीची ऑर्डर दिल्यावर असीम हातावर हात चोळतो आणि शांत आवाजात विचारतो, 'बोला ! मी तुम्हालां काय मदत करू शकतो ?

त्याची भेट ठरविताना त्याने स्पष्टच सांगितलेले असते-'माझा सगळा वेळ वृत्तपत्रीय कामात जातो. मी तुम्हाला फार काही सांगू शकणार नाही.' म्हणून मी मोघम विचारतो.

'सध्या कलकत्त्याचा ' मूड ' कोणता आहे ?.'

'अँटिसिपेशन ' असीम क्षणाचाही विचार न करता बोलतो.

'ऑफ् व्हॉट ?.' मी सिगारेट पेटवीत. असीम डजन्ट स्मोक !

ते सांगणे फार कठीण आहे. परिस्थिती एवढी वाईट आणि गुंतागुंतीची आहे की आपले नेतृत्व काही करू शकेल याचा विश्वास बंगालला राहिलेला दिसत नाही. मग काही तरी बदलाची व्हेग अँटिसिपेशन तेवढी शिल्लक राहते.

'संघाचा, जनसंघाचा आणि राष्ट्रवादाचा कलकत्त्यात कितपत प्रभाव ?'

'खरे सांगू –काही नाही. वीस वर्षापूर्वी आम्ही जेथे होतो तेथेच आहोत. या मंडळींना बाळबोध राष्ट्रवाद पुरत नाही. त्यांची भूक फार तेज आहे. मेंदूला डसणारे एखादे पार्तिव तत्त्वज्ञान त्यांना हवे आहे.'

'असे तत्त्वज्ञान कोठे दिसत आहे ?'

'नक्षलवादी '! पण बंगालची ही एक चूक आहे. बंगालला हिंसेचे आकर्षण आहे पण कुवत नाही. नक्षलवाद हे एक ज्युवेनाईल रोमँटिसिझमचे अपत्य आहे. बंगालचे मन जसजसे प्रौढ होईल तसे नक्षलवादी मागे पडतील. पण बंगालचे मन आधिकाधिक बालिश व हट्टी होत आहे. त्याला कारण परिस्थितीचा हिंस्र काच ! तुम्हाला वाटते कलकत्ता म्हणजे गडबडगोंधळ ! पण परिस्थिती एवढी वाईट आहे की याहून अधिक काही कसें होत नाही याचेच आश्चर्य वाटते.'

'परींची स्थिती पण वाईटच आहे ना ? ' मी एक जोक मारण्याचा कोविलवाणा प्रयत्न करतो.

असीम हसत नाही. तो गंभीरपणे मान हलवीत बोलू लागतो–'कलकत्त्यात सुमारे पाच लाख लोक एकटे राहतात–फूटपाथवर वा एकेका खोलीत वीसवीस जण. त्यांना वर्षांनुवर्षे स्त्रीत्व ही चीज दुर्मीळ असते. सिंगलमेल पॉप्युलेशनचा हा प्रश्न सर्वच मोठ्या शहरी आहे'

'पण रविंद्र सरोवर सगळीकडे होत नाही–असीम ? '

'चंद्रशेखर–या बंगाली बायकांच्या फॅशन्स एवढ्या फॉरवर्ड आहेत की सरोवर इन्सिडंट सारखे प्रकार अधिक घडण्यास त्या मदतच करीत राहतील. पण रविंद्र प्रकरणी तसे काही विशेष घडले नाही म्हणा. तुम्ही माहिती काढलीच असेल.'

'तुमच्या संघाच्या लोकांची एक स्त्रीसंघटना आहे ना? तिची या प्रकरणी काय भूमिका ?.'

भूमिका कसली ? हा एक्सेसिव्ह अर्बनायझेशनचा एक अपरिहार्य परिस्फोट आहे.'

'नाही. पण काही प्रतिकार वगैरे ? '

'आम्हांला फॉलोइंग नाही.'

विशिष्ट विषयावर संगतवार चर्चा करण्याएवढा वेळ आम्हांला दोघांनाही

नव्हता. असीमचे आभार मानून मी निघालो. असीम युगांन्तरच्या कचेरीकडे पळाला.

रायटर्स बिल्डिंग (सचिवालय)–दुसरा मजला–प्रतिभा मुखर्जींच्या चेंबरच्या बाहेर मी बसलो आहे–रीतसर आत चिठी पाठवून. सुमारे पंधरा मिनिटांनी एक वेताच्या छडीसारखा ताणबाज तरुण हातात एक चिठी घेऊन माझ्या दिशेने येतो.

'मि. चंद्रशेखर ?' मी मान हलवतो.

'प्लीज फॉलो मी.'

आम्ही जवळच्या एका चेंबरमध्ये जातो.

'प्लीज टेक युवर सीट' चारमिनार शिलगावीत तो वेत्रकुमार बोलतो. एवढे बोलून तो पुन्हा झुलत्या दारातून आत जातो. टेलिफोनवर बोलतो. बाहेर जातो. व्हिजिटर्सची कामे भराभर करतो. चारमिनार चालूच !

सुमारे दहा मिनिटांनी तो खुर्चीवर येऊन बसल्यासारखे करीत मला विचारतो,

'सो-जर्नलिझम इज युवर प्रोफेशन !'

'नो–इट इज माय कमिटमेंट.'

चारमिनारच्या धुरातून मला न्याहाळीत तो बोलतो–

'व्हॉट इज द् डिफरन्स ?'

'प्रोफेशनमध्ये कॉंप्रॉमाईज असते. कमिटमेंटमध्ये नसते.'

'माय गॉड–लेट्स गेट इंट्रोडयुस्ड्.'

त्या तरुणाचे नाव सलील चक्रबर्ती. वय २४–२५, केस उलटे वळवलेले, जाड चष्मा, विलक्षण सफेद दात, भगव्या खादीचा झब्बा आणि धोतर–सदैव कोठेतरी निरखून पाहत असल्याचा चेहऱ्यावर भाव !

सलील हा सुबोध बॅनर्जी आणि प्रतिभा मुकर्जी यांचा कॉन्फिडेन्शियल असिस्टंट. ओळख झाल्यावर, त्याच्या धावपळीच्या ठेक्यावर आमचे काही राजकीय सवाल-जवाब होतात. आम्ही खळखळून हसतो. टाळया देतो. सलील विचारतो–

'प्रतिभाताईंना कशासाठी भेटणार ?'

मी माझे कारण सांगतो–गुड–गुड–गुड.

'सुबोधला का भेटत नाही ?'

'जरूर भेटेन. सुबोध इंटरेस्टिंग प्राणी आहे.'

'इन व्हॉट वे ?' उलटतपासणीच्या आविर्भावात सलील.

'इन हॉट वे' शांतपणे मी. मग घेरावची चर्चा निघते–

आम्ही एकमेकांची मते अगदी भुक्कड आहेत असे एकमेकांना बजावून सांगतो–मोठी खडाजंगी होते. मी शेवटी वैतागाने म्हणतो–

'लुक–सलील ! ख्रिस्त्यांत जसा बाप्तिस्मा असतो तसा आता तुम्ही साम्यवादी सुरू करा–म्हणजे साम्यवादी कोण हे ओळखणे सोपे जाईल. नाहीतर तुमचा हा जागतिक तंटा कधीच संपणार नाही. ज्या डिफरन्सिएशनमध्ये बाह्य खूण नसते ते

डिफरन्सिएशन कालांतराने खलास होते.'

'असं म्हणतोस? मग बिगर साम्यवाद्यांना बाप्तिस्मा दिला तर ते अधिक आटोपशीर होईल.' सलील मोठ्याने हसत म्हणतो.

सलील व मी यांच्यांत नंतर अनेकवार चर्चा झाली. आम्ही जानी दोस्त झालो. त्याने माझी सी. पी. एम. मिनिस्टर्सची गाठ घालून दिली. सुबोधबाबूंची गाठ घालून दिली. त्यांच्या पार्टी ऑफिसात मी एक संध्याकाळ घालवली. अखेरपर्यंत सलीलने माझ्यासाठी शक्य ते सर्व केले.

त्याच्याबाबत मला सर्वप्रथम जे जाणवले ते त्याचे सळसळते तारुण्य. शारीरिक आणि बौद्धिक. इतर बंगाली प्राण्यांप्रमाणे त्याच्या नजरेत बावरलेपणा नव्हता. एकएक काम ठाशीवपणे करीत तो वावरत होता. सहजपणे—सलीलसारखे अनेक तरुण जर कलकत्त्यात असतील तर बाहेरच्या प्रांतांनी बंगालची फारशी काळजी करण्याचे कारण नाही!

या व्यक्तिगत ओळखीच्या तरुणांच्या वागणुकीतून बंगाली तरुणांविषयी मला काही आडाखे मांडता येतात. हे आडाखे मी लॉरेटाकडून तपासून घेतले आहेत.

सर्वसामान्य बंगाली तरुणाला साम्यवादाविषयी खास असे काही आकर्षण नाही. त्याच्या बौद्धिक कसरतीस आवश्यक असे एक अवजार एवढ्याच दृष्टीने तो साम्यवादाकडे बघतो. त्याला ओढ आहे ती काही तरी तात्त्विक अचिव्हमेंटची! बंगाल हा आशियाचा फ्रेंड, फिलॉसॉफर अँड गाईड व्हावा हे त्याचे स्वप्न आहे!

हे सप्तरंगी स्वप्न सोडले तर बंगाली तरुणांत आणि अन्य तरुणांत फार फरक नाही. तोही चांगले कपडे घालतो—कॉलेजला बुट्टी मारतो—पोरींची छेडछाड करतो—कॉफी हौसात बसून तासन्‌तास शब्दांच्या अब्दांत घालवतो!

पण एवढेच! लॉरेटाच्या शब्दांत सांगावयाचे तर बंगाली तरुणाची झेप आणि त्याची कुवत यांत फार अंतर आहे. हे अंतर त्याच्या व्यक्तिमत्त्वाला ठायी ठायी आव्हान देते.

हे आव्हान पेलणे त्याच्या आवाक्याबाहेरचे काम आहे. म्हणून तो काहीतरी एस्केप शोधतो—स्टूडंट मुव्हमेंट, नक्षलवाद, वगैरे वगैरे. या चळवळींच्या प्रसारांत त्या तत्त्वज्ञानाच्या चांगलेपणाचा भाग फार थोडा आहे. मात्र याने एक होत आहे. अभ्यास करून प्रदीर्घपणे एखादी करीयर चोखाळणे याला बंगालमध्ये काही अर्थ राहिला नाही. एखाद्या राजकीय पक्षाची पताका घ्यावी, कॉलेजात धमाल उडवावी, परीक्षेच्या वेळी राजकीय पुढारी प्रश्नपत्रिका अगोदर आणून देतातच आणि नाही दिली तरी काही बिघडत नाही.

उत्तरे शोधण्यापेक्षा प्रश्न उभे करण्याचा धंदा सध्या जास्त तेजीत आहे. राजकारण, शिक्षण, नोकरी, सेक्स या प्रत्येक क्षेत्रांत एस्टॅब्लिशमेंटला आव्हान देणे हे सर्वांत सोपे!

ही आव्हाने पोकळ असली तरी त्यांची मूळ प्रकृती मात्र भरीव आहे हे मान्य करावयास हवे. आज प्रत्येक क्षेत्रांत 'स्टेटस को' दिसतो. कलकत्त्याच्या नागरी सेवासुविधांची स्थिती सुधारण्यासाठी तर कोणच्या' लेनिन–चे गेव्हाराची जरुरी नाही ? पण ते होत नाही. कलकत्त्याच्या सार्वजनिक सोयी एखाद्या आडगावी खेडेगावापेक्षा निकृष्ट आहेत. यामुळे होणारा मनस्ताप, गैरसोय, विस्कळितपणा, अनिश्चितपणा, सतत देणारा ताण यांचा बंगाली युवकाच्या मनोभूमिकेवर फार परिणाम झाला आहे. जर एक १०० कोटी रुपये खर्चून कलकत्ता शहरातील वाहतूक, पाणीपुरवठा, वीज, ड्रेनेजव्यवस्था, शाळा, इत्यादी सुधारल्या तर कलकत्त्यातील निम्मे प्रश्न व कटकटी कमी होतील.

हॉटेलात, थिएटरात, बँकेत, स्टेशनवर अनेक ठिकाणी मी बंगाली तरुणांची टोळकी पाहिली. त्यांच्यामधील संवाद ऐकले–पुण्याला टिळकरोडवर उभे राहून वेळ घालवणारे टोळके आणि रास बिहारी अव्हेन्यूवरचे टोळके यांत फारसा फरक नाही. दोहोत तीच सिनीक वृत्ती, कॅज्युएलनेस, फ्रस्ट्रेशन दिसून येते. दोन्हीकडे प्रत्यक्ष परिस्थिती विसरण्यासाठी क्षुद्र चाळे-दिशाहीनता दिसून येते.

पण रास बिहारी अव्हेन्यूवरील टोळक्यामध्ये एखादा फाटका तरुण असा असतो की जो बोलता बोलता एकदम अदृश्य होतो–कोठेतरी बाँब टाकून येतो. या फाटक्या तरुणांची मनस्थिती फार महत्त्वाची आहे.

कलकत्त्याहून लिहिलेल्या एका पत्रात मी बंगाली तरुणाचे वर्णन असे केले आहे 'रॅडिकल यट रॅम्बलिंग, पर्टबॅड् यट पर्ट अँड हायपर–सेन्सिटिव्ह यट हार्टलेस.'

शेवटची खास गोष्ट आहे. आज कलकत्ता शहरात हिंडताना अनेक माणसे अशी दिसतात की त्यांना तातडीने मदत दिली पाहिजे. अत्यंत हलाखी, हालअपेष्टा यांचे दर्शन कलकत्त्यात जेवढे होते तेवढे इतरत्र होत नाही. पण मला कोठेही बंगाली तरुण अशा एखाद्या व्यक्तीपाशी थबकलेला, त्या दृश्याने अस्वस्थ झालेला दिसला नाही. कॉफीचा कडवटपणा आणि चार मिनारचा भडकपणा यांखेरीज बंगाली तरुणाच्या मनोविश्वात आज काही नाही.

'शतरंज' मध्ये चिन्यांची नालस्ती केली म्हणून घेरावो करण्यासाठी कलकत्त्यात तरुण मिळू शकतात. पण रविंद्र सरोवर प्रकरणी निषेधाचा आवाज उठवण्यासाठी कोणी पुढे येत नाही!

बंगाली तरुणाच्या मनात शिरण्याचा रस्ता त्याच्या हृदयातून नसून डोक्यांतून आहे. येथे देखील फार मोठे आश्वासक असे काही दिसत नाही हे दुर्दैव. बुद्धीचे उदात्तीकरण तेव्हाच उपयुक्त होते की जेव्हा ती परंपरागत खोडे झिडकारून नवनवीन प्रांतात कठोरपणे संचार करते. आज गेल्या कित्येक दशकांत बंगालमध्ये एकही मूलभूत शोध लागलेला नाही हे आपल्या बुद्धिवादाचा तोरा मिरवणाऱ्या प्रांतास भूषणावह खास नाही !

मागील लेखात म्हटल्याप्रमाणे बंगाली तरुण हा सागरासारखा आहे. या सागराचा अंत लागणे कठीण आहे. त्याच्या अंतर्यामी वादळ आहे. कधी ते त्याच्या उदरात असते तर कधी अधरात ! त्याची गर्जना मोठी आहे पण तीमधून निश्चित संदेश मिळू शकत नाही. त्याची ओढ चंद्राकडे आहे पण किनाऱ्यापलीकडे त्याची लाट पोहोचू शकत नाही. सरोवराची आत्मकरुणा, सरितेची भीरुता आणि उपसागराचा परोपजीवीपणा यांचा तिहेरी शाप असलेला हा सागर आहे.


हा असा सागर आहे की जो लाटांच्या विभ्रमात अधिक गुंग असतो. मूलतः हा स्त्रीमनाचा आहे. स्त्रीच्या कह्यांत राहणारा आहे. विश्वातील आद्य स्त्री जी धरित्री तिचा पदर कधीही न सोडू शकणारा हा सागर समीराच्या आडदांडपणाकडे त्रयस्थपणे पाहत आहे. समीराच्या बंधहीनतेचे, विश्वव्यापित्वाचे आकर्षण आणि स्वतःच्या किनाऱ्याची दाहक जाणीव अशा कात्रीत हा सागर सापडला आहे.

सरोवर, सरिता आणि सागर यांपैकी कोणीही समीराच्या प्रभावातून सुटू शकत नाही. समीर हा विश्वाचा फकिरी अमीर आहे.

अशा या समीराचे तांडव आज पश्चिम बंगालमध्ये सुरू आहे. भलेभले ताडवृक्ष या मूलहीन समीराने उडविले आहेत. आपल्या विजयात मश्गुल असतानादेखील समीराचे असे बेत चालू आहेत की, सर्व आकाराचे आणि प्रकाराचे सलिल एका सोसाट्यात वर खेचावे आणि सगळा गाळसाळ फेकून द्यावा; मगर मच्छांची ससेहोलपट करावी आणि मग सलीलाला आपली पातळी गाठू द्यावी. जी समान असेल,

समीर सामर्थ्यवान आहे—पण त्याचा जोर जमिनीशी चालत नाही. पाणी समान पातळीवर राहते ते जमीन समान पातळीची असेल तर ! हे करण्याचे सामर्थ्य समीरात आहे काय ?

(क्रमशः)



# आलीस तशी परत जा–

अनिल वसंत बळेल.



प्राणवायूचा प्रयोग चालला होता. मागच्या पीरियडला 'थिअरी' समजावून दिली होती. आज होते प्रॅक्टिकल. प्रयोगशाळेतील सर्व साधने सज्ज ठेवण्यास आधीच सांगून ठेवले होते. सर्व विद्यार्थिनींना प्रयोगाची कल्पना देऊन झाली होती. जन्माला आल्याबरोबर आवश्यक असणारा आणि कळायला लागल्यापासून प्रत्येक इयत्तेत घोकलेल्या ह्या वायूचा प्रयोग प्रत्येक वेळेस नव्या उत्साहाने करावासा वाटतो. इतर प्रयोगांच्या वेळेस येणारा कंटाळा, 'काय तेच तेच' वाटणे ह्याचे बाबत असत नाही. ह्यात खरोखरच प्राण आहे. पण आजपर्यंतचा हा अनुभव खोटा ठरू पाहत होता. आज प्रयोगात अजिबात लक्ष लागत नव्हते. सारे लक्ष तिच्याकड लागले होते आणि तिचे तरी कुठे प्रयोगात लक्ष होते? दुसऱ्या कोणाच्या लक्षांत नसले आले तरी ते माझ्या केव्हाच आले होते.

साऱ्या मुली प्रयोग करीत होत्या आणि ती प्रयोग करते आहे, असे दाखवत होती. एकेकीचा प्रयोग कसा काय चालला आहे बघत बघत, चुका दाखवीत दाखवीत, सूचना देत देत, हे असं नाही असे म्हणत म्हणत मी तिच्या टेबलापाशी येऊन उभा राहिलो. साधने कशी वापरावीत त्याची नव्याने सूचना देत मी हळू आवाजात विचारले, "माझ्या प्रश्नाचे उत्तर?"

"होकारार्थी" तीही तितक्याच हळू आवाजात उत्तरली.

स्नेहा माझ्या बायकोच्या नात्यातली

आमच्या लग्नातच तिची ओळख झाली. तडतडीसारखी इकडून तिकडे करत होती. अन् बोलतही होती तशीच. तेव्हाच ह्याच स्नेहाशी स्नेह करावा असे मला वाटून गेले. लग्नानंतरच्या नव्या थाटामाटात आम्ही जेथे जेथे गेलो त्यात स्नेहाच्या घराचीही वर्णी होतीच. प्रथम पत्नीबरोबर गेलो आणि मग वारंवार प्रसंगाप्रसंगाने जाऊ लागलो. तिच्याशी, तिच्या घरातल्यांशी संबंध वाढले. त्यांच्याही मनात आपुलकी निर्माण झाली. अन् यंदा तर काय स्नेहा आमच्या कॉलेजात दाखल झाली.

आधीच मला तिच्याबद्दल आकर्षण होते. मी नाना कारणे हुडकून काढत होतो न तिच्या घरी जात होतो. बोलण्याची एकही संधी गमावत नव्हतो. आता ती माझी विद्यार्थिनी झाली होती. चालून आली होती. हुकमी कारणाने एकीकडे आमच्या भेटी वाढल्या होत्या तर दुसरीकडे तिच्या आई–वडिलांनी मला वेठीला धरले होते. तिच्यासाठी 'स्थळ' शोधण्याबद्दल! त्यांनी जरी तिला कॉलेजात घातले होते तरी होता होईल तो तिला उजवून टाकण्याचा त्यांचा विचार होता. माझ्या मते हा अविचार होता तरी त्यांनी सोपविलेली कामगिरी मनावर घेणे भाग होते. इष्ट होते.

मला जास्त कष्ट घ्यावे लागलेच नाहीत. ही तडतडी तेव्हाच चमकून गेली. योग लगेच जमून आला आणि आम्ही पुढील तयारीला लागलो. तिच्या घरातल्यांनी खरेदीची बरीचशी भिस्त माझ्यावर सोपविली होती. काल आम्ही दोघंच बाहेर पडलो होतो. तिच्या मनासारखी खरेदी झाल्यावर मी तिला हॉटेलात घेऊन गेलो. तिच्या आवडीचे पदार्थ खाऊ घातले अन् माझ्या मनचे बोलून घेतले. बोलता बोलता हळूवार स्पर्शाने तसे विचारले, "मी बोलावीन तेव्हां येशील ना?"

आजचे 'हो' हे कालच्याच प्रश्नाचे उत्तर होते.

तिचे लग्न थाटामाटात पार पडले. मीही अगदी मेढ्यासारखे मिरवून घेतले. जणू काय माझ्याच घरातले कार्य! पण मनातल्या मनात मी दुःखी होतो. अन् माझेच मन मला खाऊ लागेल होते. टोचत होते, बोचत होते. आपण काय वचन घेऊन बसलो? केले ते बरोबर की चूक? ह्या विचाराने मी बेचैन झालो होतो. म्हणून वचन घेऊनही तिला बोलाविण्यास माझे मन तयार होईना. त्यावर दुसरे मन बंड करून उठले. नीतीच्या कल्पना झुगारून देऊ लागले. पूर्वापार चालत आलेल्या कल्पना बेंगरूळ म्हणू लागले. शेवटी असेच होते तर प्रथम तिला फिरविलीस तरी कशाला? तिच्यासाठी खर्च का केलास? इतर विद्यार्थिनींसारखा तिच्याशी का नाही वागलास? अभ्यासातून तिचे लक्ष का उडविलेस? तिच्या लग्नात वावरलास तो केवळ तिच्यासाठीच ना? अन् तिच्याकडून वचन घेऊन आपला विचार तिच्या मनात सोडलास तो तरी का? का? का?

अखेर दुसऱ्या मनाचा विजय झाला. पत्नी माहेरी गेल्यावर मी तिला घरी बोलाविले.

ती आली. ती येताच माझे मन उचंबळून आले. दारातून आत येत मी तिला विचारले, " तू आलीस ? खरचं तू आलीस ? ". पण— पण—

ती ' ती ' नव्हती. माझी पूर्वीची स्नहा ही नव्हे. ही नवोढा होती. दागिन्यांनी मढविलेली होती. माझ्या अंगाला तिचा नव्हे तर तिच्या दागिन्यांचा स्पर्श होत होता. गळयात मंगळसूत्र होते. हातात हिरव्या अन् सोन्याच्या बांगडया होत्या. पायात तोडे होते. पूर्वी लुसलुशीत लागणाऱ्या कानाच्या पाळया भरल्या होत्या. पूर्वी ही कुंकू लावीत नव्हती. आता ललाटी गुंजेएवढे कुंकू होते. लांबसडक बोटाच्या स्पर्शात अंगठीचा अडथळा होता. ही ' ती ' नव्हे. ही आपली नव्हे. तिची बोळवण केली पाहिजे. दुसऱ्या मनावर पहिल्या मनाने कब्जा मिळविला. अन् तिचा हात सोडीत मी तिला म्हटले, " जा. तू जा. आलीस तशी परत जा. परत येऊ नकोस. कधीच येऊ नकोस." ■■



# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे २



# पुस्तके

## शिक्षण व व्यवसाय

**अ. श्री. भडकमकर**

शैक्षणिक क्षेत्रातील सर्व स्तरांवर आज शैक्षणिक संस्थांतून काम करणाऱ्या आणि शैक्षणिक प्रक्रियेशी संबंधित असलेल्या सर्व घटकांना एका विचित्र औदासीन्याने झपाटलेले दिसते. शाळा कॉलेजांची संख्या वाढते आहे. दरवर्षी फार मोठ्या संख्येने प्रशिक्षित शिक्षक प्रशिक्षण घेऊन प्रशिक्षण केंद्रातून बाहेर पडत आहेत. तरीही खेडो-पाड्यातून, प्रशिक्षण न झालेल्या आणि आपल्या पदवी शिक्षणाशी संबंधित नसलेले विषय शिकवणाऱ्या शिक्षकांची फार मोठी संख्या आहे. त्याहूनही मोठी संख्या माध्यमिक आणि उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळावा म्हणून एकसारखी दार ठोठावत आहे. त्यासाठीही 'काळाबाजार' सुरू झाला आहे. आणि हे सर्व असताना जीव-नाच्या या मध्यवर्ती आणि मूलगामी संस्कार-स्थली आत्मविश्वासाचा आणि चैत-न्याचा प्रचंड अभाव निर्माण झाला आहे.

या सर्वांचे कारण योग्य जागी योग्य व्यक्ती न जाणे म्हणजेच व्यवसायाचे संतु-लन न होणे आणि शिक्षण का व कोणते घ्यावे यासंबंधी अचूक मार्गदर्शन नसणे हे होय. 'भावी जीवनाची दिशा ठरविण्यासाठी विद्यार्थ्यांकरिता चांगल्या व कार्यक्षम-व्यवसाय-मार्गदर्शन-यंत्रणेची सोय प्रत्येक शिक्षण संस्थेत असावी' हा विचार मान्य होत असून ठिकठिकाणी शिक्षण व व्यवसाय-मार्गदर्शन केंद्रे उपलब्ध होत आहेत. अमरावती येथील अशा एका केंद्राचे संचालक श्री. पु. रा. पारनेरकर यांनी शिक्षण व व्यवसायमार्गदर्शन यांचा परस्परसंबंध आणि व्यावहारिक महत्त्व पटवून देणारे आणि व्यवसायमार्गदर्शनाची शास्त्रीय दृष्टिकोणातून चिकित्सा करणारे 'शिक्षण व व्यवसाय विषयक मार्गदर्शन' हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध केले आहे.

**शिक्षण व व्यवसाय-विषयक मार्गदर्शन. लेखक—पु. रा. पारनेरकर**
**किंमत रु. ५. नीळकंठ प्रकाशन, पृष्ठे २०८**

'शिक्षण म्हणजे ज्ञान देणे' किंवा शिक्षण म्हणजे 'संस्कृतिसंवर्धनाचे' साधन हा विचार आता झपाट्याने बदलत चाललेल्या आधुनिक परिस्थितीच्या संदर्भात अपुरा ठरत असून 'शिक्षण म्हणजे जीवन-विकास' ही कल्पना आता बऱ्हंशी स्वीकारली गेली आहे. विद्यार्थ्यांचा शारिरीक, भावनिक, सामाजिक व व्यक्तित्व विकास लक्षात घेऊन त्यांना योग्य अशा शिक्षणाची व्यवस्था व्हायला हवी. विद्यार्थ्यांचे कल, त्यांच्या सवयी, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांच्यामध्ये दिसणारी वैयक्तिक भिन्नता, या सर्वांवर 'अध्ययनप्रक्रिया' अवलंबून असल्याने या क्रियेच्या यशस्वीतेसाठी आवश्यक असे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन व्हावयास हवे. आणि योग्य ते जीवनाभियोजन आणि सामाजिकतेचे शिक्षण त्यांना दिले गेले पाहिजे.

पाश्चिमात्य देशात या विषयावर एकसारखे संशोधन चालू असून भरपूर वाङमयही उपलब्ध आहे. आपल्याकडे मात्र तुलनेने हा विषय नवा आहे. आणि विशेषतः प्रादेशिक भाषेतील वाङमयाची त्रुटी फार जाणवते. ही उणीव या पुस्तकाने काही प्रमाणात भरून काढली आहे. 'व्यवसाय मार्गदर्शन म्हणजे काय ?' 'शिक्षण-प्रक्रिया म्हणजे काय ?' मार्गदर्शन कुठे, केव्हा व कसे होते, मार्गदर्शनापूर्वी कोणती प्राथमिक तयारी करावी लागते, हा विषयच मुळी कसा तयार झाला, मार्गदर्शन चळवळीचा इतिहास व संघटन कसे झाले, व्यवसाय निवडताना विद्यार्थ्याने, त्याच्या पालकाने आणि शिक्षकानेही कोणती पथ्ये पाळली पाहिजेत, त्यासाठी कोणकोणत्या कसोट्या असतात, हा विषय मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय सिद्धांताशी कसा व कोठपर्यंत संबंधित आहे, व्यवसायमार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकाला कोणती महिती मिळविणे आवश्यक आहे, त्यासाठी मुलाखत हा प्रकार कसा उपयोगी पडतो, ही पद्धत नोकरीसाठी होणाऱ्या मुलाखतीहून वेगळी कशी आहे, सामूहिक मार्गदर्शन कोणत्या रीतीने करता येते, मुलाखतीचे १ : नोकरी मिळवण्याच्या दृष्टीने, २ : निदान कर-




ण्याच्या दृष्टीने, ३ : माहितीपूर्ण, ४ : शासकीय, ५. संशोधनात्मक, ६ : मार्गदर्शनात्मक असे अनेक प्रकार सांगून मार्गदर्शनात्मक मुलाखतीचे स्वरूप कोणते, अशा अनेक प्रश्नांची सुबोध आणि सविस्तर चर्चा श्री. पारनेरकर यांनी केली आहे. त्या विवेचनामागे त्यांची दोन तपांची तपस्या उभी असल्याने व ह्या विवेचनाला चिंतन आणि स्वानुभव यांची जोड मिळाल्यामुळे ही सर्व माहिती तपशीलवजा आणि तात्त्विक अशी झाली नसून अत्यंत व्यावहारिक आणि वस्तुनिष्ठ अशीच वाटते. यामुळे श्री. पारनेरकर म्हणतात त्याप्रमाणे भारतीय युवकांमध्ये निदान महाराष्ट्रीय युवकांमध्ये 'दीर्घोद्योग, ज्ञानलालसा व ध्येयनिष्ठा' निर्माण होण्यासाठी त्यांच्यामध्ये सुप्तावस्थेत असलेली 'भावी भारताच्या भाग्योदयाची शक्तिबीजे' निर्माण होण्यास या पुस्तकाचा काही प्रमाणात निश्चित हातभार लागणार आहे.

या एकूण पुस्तकाचे तीन भाग पडतात. पहिल्या भागात शिक्षण आणि व्यवसाय मार्गदर्शन यांच्या परस्परसंबंधाचे तात्त्विक, मानसशास्त्रीय आणि सामाजिक उपयुक्ततेच्या दृष्टीने स्पष्टीकरण केले आहे. दुसऱ्या भागात पाश्चिमात्य राष्ट्रांत या विषयांचा चाललेला अभ्यास व मार्गदर्शन, चळवळीचा इतिहास व संघटन यांचे विवेचन आले असून तिसऱ्या भागात व्यवसाय-मार्गदर्शनाच्या क्षेत्रात स्वातंत्र्योत्तर काळात कोणते प्रयत्न चालले आहेत याची तपशीलवार माहिती सांगून पुस्तकाच्या शेवटी राज्यपातळीवरील व्यावसायिक मार्गर्शन करणाऱ्या संस्थांचे व प्रशिक्षण केंद्रांचे पत्ते दिले आहेत.

शेवटी जोडलेली काही परिशिष्टेही अत्यंत उपयुक्त आहेत. उदा. व्यवसायात्मक माहितीची प्रकाशने मिळविण्याच्या दृष्टीने दिलेले पत्ते विद्यापीठाशी संबद्ध असलेले व नसलेले अभ्यासक्रम, भारतातील काही महत्त्वाचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम, शिष्यवृत्त्या, आर्थिक सहाय्य, कर्ज वगैरे मिळवण्याबातत दिलेले पत्ते, काही मार्गदर्शनात्मक नियतकलिकांची सूची व काही मार्गदर्शक तक्ते इ. सर्व माहिती केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर त्यांच्या पालकांना एवढेच नव्हे तर शिक्षणक्षेत्रात वावरणाऱ्या सर्वांना मार्गदर्शक व पूरक ठरण्याजोगी आहे.

याचा अर्थ हे पुस्तक म्हणजे 'शिक्षण व व्यवसाय-विषयक मार्गदर्शन' यांवरील शेवटचा शब्द आहे असे नाही. पुस्तकात आलेले विवेचन व्यावसायिक क्षेत्रात बदलत जाणाऱ्या वेगवान परिस्थितीपुढे काही ठिकाणी तात्पुरते व जुजबी ठरण्याचाही संभव आहे. शिक्षण व समाजव्यवस्था या संदर्भात प्रत्येक देशाची काही विशिष्ट धारणा लक्षात घ्यावी लागते. परकीय अभ्यासक्षेत्रातील व पाश्चात्य विद्यार्थ्यांच्या संशोधनावरील माहिती भारतीय व महाराष्ट्रीय विद्यार्थिवर्गाबाबत तेच निष्कर्ष काढू शकेल असे नाही. म्हणून संशोधनास या क्षेत्रात अद्यापि बराच वाव आहे. परंतु या विषयाचे स्वतंत्र 'अस्तित्व' जाणविण्याची ताकद पारनेरकरांच्या या पुस्तकात आहे हे मात्र प्रांजलपणे नमूद केले पाहिजे. ■■



सातव्या पायदळ तुकडीची नाम-का-चूपर्यंत अकाली हालचाल घडवून आणतेवेळी कोअर कमांडर जनरल कौल यांनी असे संदिग्ध आवाहन दिले होते की, युद्धाच्या तयारीसाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या सामग्रीचे साठे त्यांना शक्य होईल त्याप्रमाणे शक्य तितक्या लवकर आघाडीवर केले जातील. हे आश्वासन जनरल कौल २० ऑक्टोपरपर्यंत – ज्या दिवशी चीनने भारतावर प्रत्यक्ष आक्रमण केले त्या दिवसापर्यंत – पूर्ण करू शकले नाहीत. असे आश्वासन देणे ही त्यांची लष्करी दृष्टया फार मोठी चूक होती.

शस्त्रास्त्रांची आणि दारूगोळयाची सोय केली गेली नसतानाच नुसतीच पायदळ तुकडयांची जमवाजमव करण्यात काय अर्थ होता ? ७ वी पायदळ तुकडी पुढे गेली तेव्हा या तुकडीतल्या जवानांजवळ साधे गरम कपडे नव्हते, त्यांच्याजवळ फक्त माणशी ३ दिवस पुरेल इतपत अन्न होते. लढाई ३ दिवसांत संपते ? त्यांना जादा अन्न मिळू शकेल असे साठे केलेले नव्हते. त्यांच्याजवळ पुरेसा दारूगोळा आणि तोफा नव्हत्या. तोफगोळे अचूक फेकण्यासाठी तयारी नव्हती. जवानांना स्वतःसाठी लागणाऱ्या साहित्याच्या पिशव्या सोडल्या (Kits) तर जवानांजवळ दुसरे काहीही नव्हते. याचा सरळ अर्थ असा होता की, लढाईसाठी आवश्यक त्या इतर गोष्टींचा पुरवठा होऊ शकला नाही तर आपल्या बटालियनची युद्धक्षमता कुचकामी होती. वर दिलेल्या पुष्कळशा वस्तू – कपडे, दारूगोळा, शस्त्रास्त्र इत्यादी खुद्द लुंपू या ठिकाणी उपलब्ध नव्हत्या. पाठीमागे त्या वस्तू विमानातून खाली टाकल्या जातील या आशेकडे आपण डोळे लावून बसलो होतो. वस्तुतः सांगधरपेक्षा लुंपू हे ठिकाण विमानातून रसद खाली टाकण्याच्या दृष्टीने कितीतरी मोठे

**लेखक–ब्रिगेडियर जे. पी. दळवी**
**अनुवाद–अॅडव्होकेट माधव कानिटकर**
**लेखांक–१९**

आणि चांगले होते.

सांगधर या ठिकाणी पोचल्याबरोबर जवानांना सर्व प्रकारच्या वस्तूंचा पुरवठा केला जाऊ शकेल अशी बेगमी आपण करून ठेवली नव्हती. या वेळेपर्यंत सांगधर हे ठिकाण 'ड्रॉपिंग झोन' म्हणून चांगले नाही हे सिद्ध झाले होते. विमानातून सांगधर या ठिकाणी खाली टाकल्या जात असणाऱ्या पिशव्या भलत्याच ठिकाणी जाऊन पडत होत्या. रसद फुकट जात होती. हा प्रकार दररोज घडत होता. खुद्द सांगधर या ठिकाणी 'पडणारी' रसद मनुष्यशक्ती कमी असल्यामुळे आपण पूर्णपणे गोळा करू शकत नव्हतो. वस्तुतः लष्करी दृष्ट्या शहाणपणाचा मार्ग हा होता की, आपल्याकडे हमाल किती आहेत, जवानांची प्रवासाची तयारी पूर्णपणे झालेली आहे की नाही, याचा अंदाज घेऊन या प्रमाणांत जवानांची पुढे जाण्याची गती ठरवायला हवी होती! जवान पुढे! तयारी मागे! पुष्कळदा एखादा माणूस आपल्याला धोक्याच्या ठिकाणी पाठविण्यापूर्वी उगाच आश्वासन देतो की, 'घाबरू नको! तू पुढे हो, मी आलोच!' म्हणजे समजावे हा येत नाही हे नक्की. आता पुढे जायचे की नाही? याचा नीट विचार करूनच पुढे गेले पाहिजे. प्राप्त परिस्थितीत इतक्या जवानांना, ते लढण्यासाठी जात असताना, त्यांना नुसते जगवण्यासाठी (लढण्यासाठी नव्हे!) आवश्यक त्या वस्तूंचा साठा अल्पावधीत करणे हे काम कामगारांना बोनस वाटण्याइतके सोपे नव्हते. सरकार जवानांवर मेहेरबानी करणार नव्हते तर सरकारचे ते कर्तव्य होते. अडचणींचे अवाढव्य डोंगर मार्गात उभे असताना इतक्या घाईने पुढे जाण्याची काय जरुरी होती? हेच त्या वेळी काही कळत नव्हते. जनरल उमराव यांचे हेच म्हणणे होते. पण त्यांचे ऐकतो कोण? त्यांचे हुकूम रद्द करून नव्या सूत्रधाराने 'लवकर पुढे जा! सामान मागून पाठवतो!' हा 'नवा' हुकूम दिला होता. लष्करी दूरदर्शीपणाकडे जनरल कौलनी असे दुर्लक्ष का केले? जनरल कौलनी १९१४ मध्ये ब्रिटिश एक्सपिडियन्सी फोर्सचे कमांडर इन चीफ सर जॉन फ्रेंच यांच्या तोंडचा 'आपण आधी पुढे जाऊ या, आणि कुठे जायचे ते नंतर ठरवू या!' या धर्तीचा निर्णय का घेतला? लष्करी शिस्त मोडून जनरल कौलनी ब्रिगेड मेजरला परस्पर हुकूम का

दिला ? जनरल कौल आघाडीवर आले तेच मुळी चिन्यांना हुसकून देण्याचा दिवस— D-Day — निश्चित करून आणि चिन्यांशी कशी झटापट करायची याबद्दल पूर्वग्रह मनात धरून. भारताची ब्रिगेड एवढीच ओळख ज्या कमकुवत ब्रिगेडची पटवता आली असती अशी ब्रिगेड — की जी वरवर पाहता तयारीनिशी आलेल्या बलदंड चिनी ब्रिगेडला आव्हान देण्यासाठी निघाली होती — जनरल कौलनी उतावळेपणाने, बेफिकीरीने आणि अवास्तव कल्पनेने चिन्यांवर का सोडली याचे एकच स्पष्टीकरण देता येईल. त्या वेळी जनरल कौलनी असा आव आणला होता की, 4th कोअर आक्रमक पवित्रा घेऊन नेत्रदीपक यश मिळवील हे नक्की! लढाईतल्या शौर्याचा कळस कसा गाठायचा ? या प्रश्नाला जनरल कौल हे एक उत्तर ठरणार होते ! चिनी आक्रमणाविरुद्ध कोलाहल करणाऱ्या, खवळलेल्या भारतीय जनतेला शांत करण्यासाठी आणि त्या जनतेचा भारत सरकारवरचा विश्वास टिकवून धरण्यासाठी जरनल कौल उंच उंच थाग-ला प्रदेशात विजयी घोडदौड करण्याची आशा बाळगून होते. जणू काही वाटेत चिनी त्यांना कुठे अडवणार नव्हतेच. आले जनरल कौल की हलले चिनी मागे ! अशी त्यांची गैरसमजूत होती. यात जनरल कौल यांनाच फक्त दोष देता येत नाही. आपल्या एकूण मोहेमेच्या योजनेचा पायाच मुळी ' राजकारण ' हा होता. जनरल कौल यांचा दोष एवढाच की विरोध न करता त्यांनी ही सरकारी योजना स्वीकारली. आणि दादागिरी करून ती अमलात आणण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. यावरून एकच गोष्ट स्पष्ट होते, की जनरल कौल यांची अशी कल्पना होती की, आपण चिन्यांसमोर जाऊन उड्या मारल्या आणि त्यांना सुया टोचल्या तरी ते आपले फारसे वाकडे करणार नाहीत. जनरल कौल यांनी तयारी नसताना चिन्यांना हुसकून देण्याची ही कठीण कामगिरी का स्वीकारली असावी याला दुसरेही एक कारण आहे. आयुष्यात आपल्याच विचित्र स्वभावामुळे किंवा अक्षम्य चुकांमुळे आपण अप्रिय झालेलो आहोत अशी खात्री पटली की आपल्या ' विरोधकांना ' (की ज्यांची इच्छा तुमचं चांगलं व्हावं एवढीच असते ! ) आपण काहीतरी भव्य आणि दिव्य, उच्च आणि उदात्त वगैरे वगैरे करून दाखवावं अशी इच्छा माणसाच्या मनात उत्पन्न होते. भारतीय लष्करात जनरल कौल यांची लष्करी कारकीर्दच धोक्यात आली होती. ' एक वादग्रस्त व्यक्तिमत्त्व ' असाच त्यांचा लष्करात लौकिक होता. जनरल कौलनी स्वत:च्याच गुणांनी (?) त्यांच्याबद्दल हा समज उत्पन्न केला होता. त्यांच्या बद्दलच्या या ' वातावरणाची ' त्यांना स्वत:ला जाणीव झाली असावी, साहजिकच त्यांच्या तथाकथित शत्रूंचा आवाज बंद करून टाकण्यासाठी काहीतरी भव्य आणि दिव्य (खरोखरच दिव्य ! ) करून दाखवणं त्यांना भाग होतं. जनरल कौलचा आशावाद इतका जबरदस्त होता की काही विचारू नका ! आशावादाचा त्यांचा हा रोग बरा होण्याच्या पलीकडचा होता. असाध्य

होता–नेपोलियनच्या शब्दकोशात जसा अशक्य हा शब्द नव्हता. जनरल कौल याचा स्वभावदेखील असाच की 'आपल्यालादेखील काही त्रास होऊ शकेल' हा विचार त्यांच्या मनात चुकूनदेखील येत नसे. आपल्या मार्गातल्या अडचणीकडे काणा डोळा करणं, नाखुषीने कां होईना पण मिळतील त्या आणि तेवढ्याच पायदळ तुकड्यांनिशी मोहिमेसाठी निघणं याचं स्पष्टीकरण दुसरं कोणतं देता येईल ? प्रत्येकजण आपण कसे चुकत नाही याचं समर्थन करीतच असतो. म्हणूनच अशक्य असलेल्या गोष्टी करायला निघालेले जनरल कौल त्या अशक्य कोटीला म्हणत होते 'डिफिकल्टीज !' जनरल कौल यांची वाक्ये कशी आहेत ते पाहा. ते म्हणतात की "चिन्यांना हुसकून देण्याच्या अशक्य कोटीतल्या कामाच्या बाबतीत भारत सरकारशी भांडण करायचं नाही. (to 'bicker' over the impossibility) असं मी ठरवलं." या आणि अशा वाक्यांनी जनरल कौल यांची मनोवृत्ती स्पष्ट होते. भारत सरकारने त्यांच्यावर लष्करी अधिकारी म्हणून सोपविलेली कामगिरी जर का लष्करी दृष्ट्या अशक्य होती तर मग सरकारशी कां भांडायचं नाही ? सरकारशी तर भांडायचं नाही, आणि लढाई हरल्यानंतर मग जनतेला साळसूदपणे सांगायचं की नाहीतरी ती कामगिरी अशक्यच होती ! दोन्हींकडून आपल्या पोळीवर तूप ! सरकारही खूष, जनताही खूष ! देशाचं काय होईल ते होईल. त्याची 'जबाबदारी' कुणावर, याचा विचार नंतर करायचा ! जनरल कौलना हे ठाऊक असायला हवं होतं की पक्की विट तयार करायची असती तरी भट्टीत घालायला पेंढा लागतो. पेंढ्याशिवाय विटा तयार करता येत नाहीत. मग चिन्यांचा पक्का बंदोबस्त करण्यासाठी काय काय लागेल ? जनरल कौल स्वतःशीदेखील अप्रामाणिक होते. थाग-ला प्रकरण त्यांच्या मनाला लागून राहिले नाही. परिणामांचा विचार न करता फक्त ड्यूटी बजावण्याच्या या त्यांच्या मनोवृत्तीमुळे सुरवातीपासूनच ते विनाशाकडे वाटचाल करीत गेले. मला हे मान्य आहे, की ज्या वेळी धाडस करून वेगाने आपलं सैन्य पुढे न्यायचं असतं त्या वेळी कमांडरला त्याच्या हाताखालच्या कमांडर्सच्या मागे असा धोशा लावावा लागतो की "काहीही युक्त्या–प्रयुक्त्या करून घोडदौडीने आघाडी मार ! पण त्याचबरोबर हेही तितकेच खरं की असं धाडसी नेतृत्व आणि मार्गातली कठोर सत्यं यांचा समन्वय हवा. आणि तुकड्यांची पुढे जाण्याची गती त्या प्रमाणात हवी. घोडासुद्धा अविचाराने घोडदौड मारीत नसावा ! हिमालयाच्या परिसरातले चढउतार, तिथलं हवामान, अतिश्रमाने थकलेले जवान ही परिस्थिती एका बाजूला, तर थाग-ला प्रदेशात 'केव्हा एकदा भारताचे जवान हिमालय पर्वत ओलांडून धापा टाकीत आपल्या टप्प्यात येताहेत' याची फक्त वाट बघत बसलेल्या सुसज्ज चिनी फौजा ही परिस्थिती दुसऱ्या बाजूला, या दोन्हींकडच्या परिस्थितीचा विचार करून मगच पुढे जाण्याची गती आणि परिस्थिती यांचा तोल संभाळला गेला

नायी. त्यामुळे धाडस या शब्दाचा अर्थ बेपर्वाई असा झाला. अर्थाचा अनर्थ झाला. युद्धसज्ज चिनी फौजांना तोंड देण्यासाठी आपले जय्यत तयारीत असलेले जवान दंड थोपटीत त्यांच्या पुढ्यात आणणे ही गोष्ट वेगळी आणि अपुऱ्या तयारीनिशी दारूगोळ्याशिवाय जवानांना पुढे जा ! असा हुकूम देणे ही गोष्ट वेगळी. दुसरी गोष्ट सोपी होती ती केली गेली.

थाग-ला प्रदेशात धूर्तपणे सैन्याची व्यूह रचना करून आपली शांतपणे वाट बघत बसलेल्या चिन्यांच्या जाळ्यात ७व्या पायदळ तुकडीला अडकवण्याची जबाबदारी जनरल कौल यांच्यावरच पडते. जनरल कौल यांच्यावरचा हा जाहीर आरोप सौम्य शब्दात सांगणे शक्य नाही. कारण हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे की एका मोहिमेची सूत्रे फक्त एकाच कमांडरकडे असतात. एक मोहीम आणि दोन कमांडर्स अशी परिस्थिती नसते. जनरल कौल यांचे नशीब फळफळले असते आणि जर का ही मोहीम यशस्वी झाली असती तर गौरव त्यांचाच झाला असता. आणि त्यात अयोग्य असे काहीही झाले नसते. पण हे जसे आहे तसेच हेही आहे, की यश मिळविण्यासाठी म्हणून ७व्या पायदळ तुकडीची हालचाल त्यांनीच घडवून आणली आणि म्हणूनच पराभवाचे खापर त्यांच्याच डोक्यावर फुटते. जनरल कौल यांचा मुखभंग भारतीय जवानांनी केलेला नाही, तो चिन्यांनी केलेला आहे. १० ऑक्टोबरला त्यांनी केलेल्या सैन्याच्या रचनेचा चिन्यांनी तत्काळ आणि जबरदस्त बदला घेतल्यामुळे त्यांची निराशा झाली. उघडउघड अशक्य असलेली कामगिरी स्वीकारून त्यात अपयश आल्यानंतर मग राजकीय मंडळींना दोष लागणं आणि मी ती कामगिरी स्वीकारण्यापूर्वीच ' इतरांनी ' त्याबाबत चुकीची योजना तयार केली होती अशा वाक्यांचा आश्रय घेणे, याने कुणाचेही भले होणार नाही. ' तू कितीही पराक्रमी असलास तरी परमेश्वरापेक्षा तू लहान आहेस ! ' हा धडा जनरल कौल शिकले. वाईट एवढेच वाटत की या सगळ्या प्रकरणात भारताचे दुःखद नुकसान झाले.

आपल्याकडे हा असा सैरभैर कारभार चालू होता त्याच वेळी तिकडे चिनी त्यांची एक सबंध डिव्हिजन थाग-ला प्रदेशात आणीत होते. हेतू त्यांचा आता लपून राहिला नव्हता. आशिया खंडातल्या आपल्या लोकांना मानापमानाची चाड असते. भारत सरकार लढाईतून आता मागे पाय घेणे शक्य नाही. अशी चिन्यांची सकारण खात्री पटली होती. कारण भारत सरकार भावनेच्या इतके आहारी गेले होते, की आता भारताने मागे यायचे ठरवले असते तर भारतसरकारला जगात तोंड दाखवायला जागा राहिली नसती. म्हणूनच ३ ऑक्टोबरला चिन्यांनी जाहीर केलं की " सरहद्दीची रेषा म्हणून मॅकमोहन रेषेला चीन सरकारने कधीची मान्यता दिलेली नव्हती. मॅकमोहन रेषा कधीच रद्दबातल झालेली आहे. "

चीनच्या या अधिकृत जाहीर घोषणचा एकूण लष्करी परिस्थितीवर चांगलाच

परिणाम झाला. वातावरणात गांभीर्य आले, कारण इथून पुढे कुठल्याही क्षणी चिनी त्यांच्या दृष्टीने त्यांचा असलेल्या नेफा विभागात आत घुसून लढाई सुरू करायला मोकळे होते. इथून पुढे मॅकमोहन रेषा ही त्यांच्या दृष्टीने सरहद्दीची रेषा नव्हती आणि नेमके हेच त्यांनी २० ऑक्टोबरला केले. थाग-ला प्रदेशात चिनी ज्या ठिकाणापर्यंत घुसले होते तिथेच ते थांबतील असा इथून पुढे भरंवसा नव्हता. आणि असे असून भारत सरकारने काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. नाम-का–चू प्रदेशात भारतीय लष्कराची जमवाजमव करण्याचे प्रयत्न मात्र चालूच होते. या वेळी भारतसरकार कसे आणि कुठल्या पेचात पडले आहे याच अत्यंत सुंदर आणि भेदक वर्णन एका परदेशी वृत्तपत्रप्रतिनिधीने केले आहे. लंडन टाईम्सच्या ५ ऑक्टोबरच्या अंकात हा प्रतिनिधी म्हणतो, 'भारतीय प्रदेशात घुसलेल्या चिन्यांना, कमीतकमी बळाचा वापर करून चिनी हद्दीत मागे रेटवून देऊ शकू, अशी भारत सरकारची सुरुवातीची कल्पना होती. असे म्हणतात की चिन्यांचा हा प्रचंड कळप मागे हाकलता येणे शक्य नाही, याची जाणीव उशिराने का होईना, पण भारतसरकारला झाली आणि मग भारतीय लष्कराला पाचारण करण्यात येऊन, त्याला असा हुकूम देण्यात आला, की आवश्यक त्या सर्व ताकदीनिशी चिन्यांना मागे हटवा. इंडियन आर्मीची प्रशंसा ठरणारे एकमेव स्पष्टीकरण असेच देता येईल, की भारत सरकारातल्या लोकनियुक्त प्रतिनिधींपेक्षा इंडियन आर्मीला या कामगिरीची व्याप्ती आणि परिणाम यांचे ज्ञान अधिक आहे.'

आता पुन्हा एकदा मूळ पदावर येतो. ! GOC जनरल प्रसाद यांच्या हुकमाप्रमाणे मी, माझे कमांडिंग ऑफिसर्स आणि माझा स्टाफ यांच्यासह ४ ऑक्टोबरला लुंपू सोडून 'पुढे' निघालो हा आपला मूळ विषय होता. ५ ऑक्टोबरची माहिती मी तुम्हांला दिली. ६ ऑक्टोबरला कार्पोला खिंडीच्या पायथ्याशी जाऊन पोचण्यासाठी आम्ही निघालो. हाथुंगला खिंडीवरून जाणाऱ्या मार्गापेक्षाही हा मार्ग फारच कठीण होता. वाटेतले चढउतार भयानक होते तर हवामान शरीर गोठवून टाकू शकेल इतके थंड होते. तिथल्या हवामानाची सवय नसताना, अंगावर पुरेसे उबदार कपडे नसताना, पाठीवर ८० पौंड वजनाचे ओझे लादून जवानांना १६००० फूट उंचीवरच्या प्रदेशात दळणवळण करायला सांगणे म्हणजे त्यांच्या सहनशीलतेचा अंत बघण्यासारखे होते. ६ ऑक्टोबरला सकाळी ८ वाजता नेहमीप्रमाणे आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रावरच्या बातम्या ऐकण्यासाठी म्हणून आम्ही वाटेत थांबलो. दिल्लीतल्या ताज्या घडामोडींशी संपर्क ठेवणे हा आमचा नेहमीचा शिरस्ता होता. बातम्या सुरू झाल्या 'आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रावरून आम्ही बातम्या देत आहोत...अती उंच प्रदेशात कामगिरी करीत असलेल्या जवानांना खास जादा भत्ता देण्यात यावा असा निर्णय भारत सरकारने घेतलेला आहे...?' ही मागणी जवान गेली कित्येक वर्षे करीत होते आणि भारत सरकार

फडतूस सबबी सांगून अर्थखात्यामार्फत त्या मागणीमध्ये कोलदांडा घालीत होते. नेफामध्ये आमचे वास्तव्य असतेवेळी तर आपले जवान या मागण्यांच्या बाबतीत निराश झाले होते. आपण आपली भत्ता वाढवा अशी मागणी करायची, मिळणार काही नाही हे ठाऊकच आहे, अशी भावना जवानांत निर्माण झाली होती. एप्रिल १९६२ मध्ये त्या वेळचे अॅडज्युटंट जनरल (नंतर 'चीफ') पी. पी. कुमारमंगलम यांनी तावांगला भेट दिली होती. त्यांनी आम्हांला सांगितले की 'नजीकच्या भविष्य काळात तरी भारत सरकारचे अर्थखाते आपल्या मागण्या मंजूर करील की नाही याबद्दल मी साशंक आहे. कारण अर्थखात्याने या मागण्या-बाबत आगणित प्रश्न उपस्थित करून हा भत्ता मंजूर केला गेलाच तर त्यावर कुणाकुणाचा हक्क पोचेल, कोण कोण व्यक्ती या भत्त्यावर लायकीप्रमाणे हक्क सांगू शकतील इत्यादी इत्यादी चौकशा चालू केल्या आहेत!' एकूण काय? तर हा प्रश्न सरकारच्या 'विचाराधीन' होता! आणि जनरल कौल यांची नेमणूक होऊन दोन दिवस पूर्ण व्हायच्या आत एक चमत्कार झाला! भारत सरकारने भत्ता मंजूर केला. कुठली कळ फिरली असेल ते वेगळे सांगायला नको. भारत सरकारच्या या निर्णयावर भारतीय लष्करात उपहासात्मक टीका झाली. हा निर्णय दुसरे तिसरे काही नसून नाइलाज म्हणून आयत्या वेळी प्रत्येकाच्या हातावर चार चार दाणे टेकवण्याचा प्रकार आहे असा एकूण सूर होता. नाइलाज म्हणून नाक मुठीत धरून मंजूर केलेल्या मागण्या आणि मागण्या यथायोग्य आणि न्याय्य आहेत म्हणून त्यांना ताबडतोब मंजुरी देणे यातला फरक भारत सरकारला केव्हा कळणार आहे ईश्वर जाणे! या 'बातमी'ने जितकी चांगली कामगिरी बजावली तितकीच वाईटही कामगिरी बजावली. कारण ह्या जादा भत्त्याचा आनंद लुटा-यला (!) बरेचसे जवान जिवंतच राहिले नाहीत! भारत-चीन युद्धात ते कामी आले. तुमच्या सारख्यांच्या बाबतीत दैव देते आणि कर्म नेते! पण जवानांच्या बाबतीत मात्र कर्म देते आणि दैव नेते! आणीबाणीचा प्रसंग जवळ आलेला असताना खास आणि जादा भत्ता मंजूर होणे आणि तो घेणे ही गोष्ट शरमेची होती. एवढेच कशाला? एकच चूक दोनदा करणे हे भारत सरकारचे वैशिष्ट्य ठरले. १९६५ मध्ये भारत-पाकीस्तान युद्ध सुरू झाल्यानंतर (नंतर! आधी नाही!) भारत सरकारने असं जाहीर केले की जवानांच्या पेन्शनच्या रकमेत वाढ करण्यात आलेली आहे! भारतीय लष्करातले जवान म्हणजे काय भाडोत्री शिपाई वाटतात भारत सरकारला? आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी भारतीय जवानाला जास्त पैशाची लालूच दाखवण्याची जरुरी नसते. जवानांची अपेक्षाही नसते.

कार्पोला खिंड ही एक अत्यंत भयानक दरी आहे. नुसते वरून खाली पाहिलेत तरी छातीत वारा शिरेल! वाटेत उभे कडे आहेत आणि गुळगुळीत दगडगोटे

पायघड्या घालाव्यात तसे पसरलेले आहेत. शिवाय वाटेत चालत असताना वरून केव्हा कुठला धोंडा डोक्यावर कोसळून पडेल याचा नेम नाही, ही भीती पावला. पावलागणीक होती. केव्हा कोण धडपडेल, आणि कुणाच्या पायाचा घोटा केव्हा सरकेल याचा नेम नव्हता. अशा या मार्गातून वर चढत चढत जाताना आमच्या पाठींचे कणे ढिले झाले. शिखरावर जायला आम्हांला ३ तास लागले. ज्यांच्या हातांत वायरलेस सेट्स किंवा ब्रेन गन अशा जड वस्तू होत्या त्यांचे तर फारच हाल झाले. ही खिंड अगदी अरुंद आहे, शिखरावर तर रस्त्याची रुंदी जेमतेम १५ फूट असेल नसेल. सांगधर या ठिकाणी आम्ही संध्याकाळी ४ ला पोचलो. आणि तिथेच ७ व्या पायदळ तुकडीची नाम-का-चू पर्यंत हालचाल करण्यात येणार आहे ही बातमी आम्हांला प्रथमच समजली. रात्री घुबड दिसावे किंवा मध्यरात्री कुत्री रडावीत म्हणजे तुम्हांला जसे वाटते तसेच मला आणि माझ्या कमांडिंग ऑफिसर्संना ही बातमी ऐकून वाटले. आम्ही मनात म्हटले हा शकुन चांगला नाही. काही तरी वाईट घडणार हे नक्की. १६००० फूट उंचीवरून प्रवास करण्यासाठी लागणारे उबदार कपडे जवानांजवळ नव्हते. एवढे हाल सोसून जवान सांगधरपर्यंत येऊन पोचले तरीदेखील खुद्द सांगधर हे ठिकाण १४,५०० फूट उंचीवर आहे आणि तिथले हवामानदेखील अंगावर काटा उभा राहील इतके थंड आहे. वाटेत कुठेही आसरा नव्हता. खुद्द सांगधरमध्ये जवानांची राहण्याची सोय केली नव्हती की अन्न शिजवण्यासाठी सरपण नव्हते. पर्वतमय प्रदेशात आगेकूच करीत असताना जवानांचा एक जथाच फक्त आधी पुढे पाठवणे आवश्यक असते. असे पुढे गेलेले थोडे जवान पाठीमागून येणाऱ्या जवानांच्या सर्व सोयी करून ठेवून त्यांच्या स्वागतासाठी तयार असतात. पण इथे काय ? कुठल्याही आवश्यक सोयींची व्यवस्था नसताना 'सगळ्यांनी एकदम पुढे जा !' कमीत कमी २–३ रात्री १४,५०० फूट उंचीवर जवानांनी उघड्यावर तळ देऊन कुडकुडत काढल्या. जनरल उमराव कुठलीही हालचाल करण्यापूर्वी माझे मत विचारीत असत. माझा सल्ला न घेताच जनरल कौल जवानांना धोला प्रदेशात जायला सांगतील, असे मला स्वप्नातदेखील कधी वाटलें नव्हते. उलट मी तर असे समजत होतो, की इथली परिस्थिती प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिल्यानंतर कदाचित जनरल कौल 'चिन्यांना हुसकून देण्याची' भाषा सोडून देतील !

...सरतेशेवटी पुढे घडलेल्या घटनांनी आमच्या दबलेल्या मानसिक दुःखाला मोकळे केले. अनेक जवानांना त्या अती थंड हवामानाची सवय नसल्यामुळे त्यांना फुप्फुसाचे रोग जडले; काही सर्दीनि हैराण झाले तर काहींना इतर बाधा झाल्या. सांगधरमध्ये अनेक जवान यामुळेच मेले. आले तेव्हाच ते थकून आलेले होते. त्यांना खायला पुरेसे अन्न मिळत नव्हते. थंडीपासून संरक्षण करू शकतील असे कपडे त्यांच्याजवळ नव्हते. आपल्याच कर्माची आणि हुकमाची ती फळे होती, हे लक्षात

न घेता जनरल कौल स्वतः या घटनांबद्दल शोक व्यक्त करतात !

तशा त्या थंडीवाऱ्यात आम्ही एक रात्र दुसऱ्या एका धनगराच्या झोपडीत घालवली. आम्हांला धाप लागली होती. श्वासोच्छ्वास नीट करता येत नव्हता. माझे डोके ठणकत होते आणि अंग लाकडासारखे ताठ झाले होते. उभ्या आयुष्यात मी कधी इतका दुर्बल झालेला नव्हतो. असे वाटत होते की, जवळ येऊन ठेपलेले अरिष्ट टाळणं आता आपल्या हातात नाही.

सांगधर येथे ती रात्र काढल्यानंतर आम्ही 'धोला या ठिकाणी' जाण्यासाठी निघालो. धोला या ठिकाणी जाऊन आम्हांला जनरल कौल आणि जनरल प्रसाद यांची भेट घ्यायची होती. जनरल कौल आणि जनरल प्रसाद यांनी झिमिथांग (Ziminthaung) ते सर्खिम (Serkhim) हा प्रवास हेलिकॉप्टरने केला होता आणि सर्खिमपासून पुढे हाथुंगला खिंडीवरून ते पायीच प्रवास करीत होते. त्या दोघांना निदान सर्खिमपर्यंत तरी हेलिकॉप्टरने येता यावं म्हणून माझ्या एंजीनियर फील्ड कंपनीच्या मेजर गोपाल यांनी एक खास विमानतळ सर्खिम या ठिकाणी बांधून काढला होता. ५ ऑक्टोबरला लुंपूहून निघालेल्या जनरल कौलनी त्याच दिवशी संध्याकाळी ४॥ वाजता मेजर गोपालना बोलवून घेऊन सर्खिमजवळच्या एका दलदलीच्या जागी 'उद्या संध्याकाळी ५॥ पर्यंत विमानतळ बांधून काढ !' असा हुकूम दिला. पेट्रोमॅक्सच्या बत्त्या आणि वादळी वाऱ्यातदेखील विझू शकणार नाहीत असे दिवे घेऊन मेजर गोपाल संध्याकाळी ७ ला निघाले आणि सबंध रात्र जागून त्यांनी ही कामगिरी बजावली !

६ ऑक्टोबरला लेफ्टनंट–कर्नल मिश्रा CO/९ पंजाब यांनी जनरल कौल यांची भेट घेतली. पूल क्रमांक १ कडे चालत जात असताना त्या दोघांची 'थाग-ला प्रदेशाची उंची किती असावी ?' या विषयावर आपसात उत्साहाने थट्टामस्करी चालली होती. जनरल कौलनी या प्रेमळ (! ) संवादाला सुरुवात केली– "मिश्रा! थाग-ला प्रदेशाची उंची किती असेल ? तुमच्या मते सांगा हं !"

"असेल, १२,००० फूट तरी असेल !"

"अरे, १२,००० फूट असेल कशी ? त्यातून ५,००० फूट कमी कर ! माझ्या मते ती उंची ७,००० फूट होईल !"

"असं म्हणता ? मग उरलेले ७,००० फूटसुद्धा कमी करतो ! म्हणजे थाग-ला प्रदेश समुद्र सपाटीवरच येईल !"

...उंचीबद्दलचा संवाद आता संपला होता ! जनरल कौल आता हवामानाकडे वळले. "इथलं तपमान किती असेल, मिश्रा ?"

"७० डिग्री असावं !"

"काय बोलता ? ७० डिग्री कुठून असेल ? शक्यच नाही ! मला तर असं कळालंय की, तुम्ही लोक प्रत्येक गोष्ट जास्त करून सांगता. कारण, तुम्हांला कामं

करायला नको आहेत !. थोडं उंचावर असलं तरी थाग-ला अखेर पठार आहे !"

पूल क्रमांक १ आणि २ जवळ पंजाबी फौजी भाईंना जनरल कौल भेटले. त्यांचे नीतिधैर्य आणि लढाईच्या तयारीची जागा पाहून जनरल कौल खूष झाले ! साहजिक आहे. या जवानांना त्यांची ' जागा ' घेण्यासाठी २१ दिवसांचा अवधी मिळाला होता. शिवाय लढाईसाठी आवश्यक असलेल्या सर्व साधनांचा पुरवठा त्यांना केला होता.

तारीख ७, ८ आणि ९ ऑक्टोबरच्या ३ दिवसांत घडलेल्या घटनांचा साकल्याने विचार करणेच इष्ट ठरेल. कारण, हे दिवस असे होते की, ज्या ३ दिवसांत कौलसाहेब मोहिमेची योजना तयार करीत होते आणि लुंपूहून धोलाकडे येत असलेल्या २ बटालियन्सची वाट पाहत होते !

७ ऑक्टोबरला दुपारी २॥ वाजता मी जनरल कौलना भेटलो. त्यांच्या बरोबर त्या वेळी त्याचे विश्वासू स्टाफ ऑफिसर लेफ्टनंट-कर्नल संजीवराव होते. जनरल कौलनी त्यानंतर धोला पोस्ट कमांडर आणि स्थानिक इंटेलिजन्स ब्यूरो ऑफिसर यांची भेट घेतली. जास्त दगदग न करून घेता त्यांनी जाहीर केले की, ' चिन्यांना हुसकून देण्याची कामगिरी पार पाडण्यासाठी भारत सरकारने त्यांची खास निवड करून नेमणूक केली आहे !' त्या दिवसाची दुपार त्यांनी थाग-ला प्रदेशाची भौगोलिक परिस्थिती, चिन्यांची व्यूहरचना आणि ताकद यांचा अभ्यास करण्यात घालवली. जनरल कौल आणि जनरल प्रसाद यांना मी आपल्या दोन बटालियन्सच्या वाटचालीची प्रगती, आपल्या असंख्य उणिवा, आपण काही साठे करून ठेवले आहेत की नाही आणि दडपणाखाली त्यांनी पुढे जाणाऱ्या केलेल्या हालचालींमुळे त्यांची खरी परिस्थिती, यांची साद्यंत माहिती दिली. मला सांगायला चमत्कारिक वाटते की जनरल कौल यांनी पायदळ तुकड्यांची हालचाल सुरू केल्यानंतर त्यांची आणि माझी ती पहिलीच भेट होती. त्याच दिवशी संध्याकाळी जनरल कौल यांनी हेड क्वार्टर ईस्टर्न कमांडला पुढीलप्रमाणे इशारे दिले :

१ : जवानांना विमानातून टाकल्या जाणाऱ्या दारूगोळा आणि गरम कपडे या वस्तूंपैकी बरीचशी रसद भलत्याच ठिकाणी पडते, की जिथून ती परत मिळविता येत नाही.

२ : २/ राजपूत आणि १।९ गुरखाज यांच्याकडे फक्त ३ दिवस पुरेल इतपतच अन्न शिल्लक आहे. आपल्या तोफा आणि दारूगोळा अजून लुंपू ते थाग-ला या मार्गातच आहेत. आघाडीवरच्या जवानांपर्यंत अजून ही सामग्री पोचलेली नाही. आपला प्रत्येक जवान अंदाजे प्रत्येकी ५० फैरी झाडू शकेल इतपत दारूगोळा प्रत्येकाजवळ आहे.

३ : गरम कपडे जवळ नसल्यामुळे या दोन बटालियन्सचे जवान १५,००० फूट उंचीवर उन्हाळ्यात वापरण्याचे कपडे थंडीत वापरून उघड्यावर रात्र काढीत

आहेत. त्यांच्याकडे प्रत्येकी फक्त १ ब्लँकेट आहे. (आपल्याकडे बुटांचादेखील तुटवडा होता.)

४ : आपल्याकडे आधीच हमाल कमी आहेत. तशातच रसद योग्य त्या ठिकाणी पडत नसल्यामुळे आपल्या तयारीवर त्याचा विपरीत परिणाम होतो आहे.

५ : बॉर्डर रोडस् ऑर्गनायझेशनकडून मी सक्तीने भरती करून घेतलेले हमाल मिळायला अजून वेळ लागेल. कारण सुमारे २०० मैल अंतरावर ते हमाल विखुरलेले आहेत.

६ : विमानातून रसद खाली टाकणे सुलभ व्हावे म्हणून जादा विमानांची व्यवस्था करा.

७ : हुकमाप्रमाणे मी (म्हणजे जनरल कौल) चिन्यांना हुसकून देण्यासाठी शक्य ती पावले उचलीत आहे.

८ : सुरवातीला जरी आपण एखाद्या विशिष्ट ठिकाणाचा कबजा घेऊ शकलो तरी उत्तम साधनांनी सुसज्ज असलेले चिनी सैनिक आपल्याला त्या ठिकाणापासून हुसकून देऊ शकतील !

जनरल कौल यांचे हे इशारे पाहून मला असे वाटले की, कटु सत्य सांगून जनरल कौल सरकारच्या हृदयाला पाझर फोडताहेत. आतातरी चिन्यांना हुसकून देण्याच्या निर्णयात भारत सरकार बदल करील असे वाटत होते. जनरल कौलनी माझी अशी गैरसमजूत करून दिली की, मी सांगितलेल्या 'चिन्यांना हुसकून देण्याच्या' कामात आड येणाऱ्या अडचणी त्यांना पटल्या आहेत.

जनरल कौल यांचा निरोप घेण्यापूर्वी मी माझे 'साहेब' जनरल प्रसाद यांना विचारले की, "आणखी दोन बटालियन्स आघाडीवर येऊ घातलेल्या आहेत. सांगधरला त्या दोन बटालियन्स आल्यानंतर पुढची योजना काय आहे याची मला कल्पना द्या. कारण त्या बटालियन्सना कमांडर या नात्याने मला हुकूम द्यायचे आहेत." अर्थात अन्न–वस्त्र–निवाऱ्याशिवाय ते जवान सांगधर या ठिकाणी फार काळ राहू शकणार नव्हतेच. जनरल प्रसाद यांनी कबूल केलं की, "खरे सांगायचे तर पुढचे प्लॅन्स काय आहेत याची मला स्वत:लाच कल्पना नाही. कारण इथून पुढे मोहिमेची सूत्रे जनरल कौल यांच्या हातात आहेत." याचा अर्थ Goc 4th डिव्हिजनजवळ त्यांचे स्वत:चे असे प्लॅन्स काहीच नव्हते. जनरल कौल ओढीत नेत असलेल्या वा गाडीतले ते फक्त एक पॅसेंजर होते. गाडी नेईल तिकडे जायचे.

७, ८ आणि ९ ऑक्टोबर या ३ दिवसांत निर्माण केल्या गेलेल्या सूर्यप्रकाशाइतक्या स्वच्छ परिस्थितीवर मळभ आणण्यासाठी जनरल कौल यांनी २ महत्त्वाच्या गोष्टी सांगण्याचे टाळून ३ अजब शोध लावले आहेत. हे करीत असताना त्यांनी जनरल सेन, उमराव आणि मी–आम्हांला तिघांना त्यात गोवलेले आहे.

पहिला अजब शोध घोला प्रदेशात चौकी बांधण्याच्या आपण घेतलेल्या निर्णया-

बाबत आहे. जनरल कौल लिहितात की, "अनेक दृष्टींनी विचार करता घोला प्रदेश हा आक्रमक किंवा बचावाचा पवित्रा घेण्याच्या दृष्टीने सर्वथैव अयोग्य होता. लेफ्टनंट जनरल सेन किंवा ब्रिगेडियर जे. पी. दळवी यांनी या ठिकाणची निवड करायला नको होती अशी माझी पहिली प्रतिक्रिया होती !"

आपल्या अफलातून विधानाचा समर्थन करण्यासाठी म्हणून त्यांनी पुढील कारणे दिली आहेत :

१. घोला या ठिकाणी जाऊन पोचण्याचा मार्ग असमाधानकारक आणि विकट होता. आपल्याकडे पुरेशी दळणवळणाची साधने नव्हती. म्हणून तिथे जाऊन पोचणे केवळ असाध्य होते.

२. आपल्या कुठल्याही नजीकच्या दोन चौक्या आणि शत्रुपक्षाकडची ठाणी यांची पाहणी केली असता हे सहज लक्षात येत होते, की गोळीबार करण्याची ठिकाणे या दृष्टीने ही मांडणी आणि रचना अगदीच सामान्य आहे. जशी हवी असायला पाहिजे तशी नाही.

३. दळणवळणाच्या साधनांच्या तुटवड्यामुळे आपल्याला आपल्या जवानांची प्रचंड संख्येने जमवाजमव करणे शक्य नव्हते.

४. वेडापिसा झालेला चिनी सैनिकांचा लोंढा आपल्या समोरच खळाळत होता. आपल्या मार्गात ही परिस्थिती म्हणजे एक अडथळाच होता.

जनरल कौल पुढे असे सांगतात की, "घोला प्रदेशातून चिन्यांना हुसकून देण्याची कामगिरी भारत सरकारने जनरल सेन यांच्यावर सोपविली असती तरीदेखील त्यांना भारत सरकारला, इथली भौगोलिक परिस्थिती, डावपेचाच्या मार्गातल्या अडचणी आणि इतर अनंत अडचणी यांची माहिती पुरवून चिन्यांना हुसकून देणे कसं अशक्य आहे हे पटवून द्यावे लागले असते. किंवा ही कामगिरी पार पाडण्यासाठी त्यांच्या स्वतःच्याच हितासाठी अधिक चांगली रचना करावी लागली असती."

जनरल कौल पुढे असे म्हणतात की–

"थांग-ला रीज प्रदेशात आपल्या नाकासमोर चिनी अत्यंत चांगली व्यूहरचना करून ठाण मांडून बसलेले आहेत हे स्पष्ट दिसत होते. त्यांची संख्या आणि युद्धसामग्री आपल्यापेक्षा कितीतरी पटींनी चांगली होती. त्याउलट आपल्या फौजा शस्त्रास्त्रे, युद्धसरंजाम आणि अन्नपुरवठा या सर्वच बाबतींत कमकुवत होत्या. लढण्यासाठी म्हणून ज्या जागी आपण आपले जवान उभे करून ठेवले होते त्या जागा म्हणजे चिन्यांसाठी निर्माण केलेले भयानक सापळे होते ! या जागा आधाडीची सूत्रे मी स्वीकारण्यापूर्वीच इतरांनी निवडल्या होत्या. आपली प्रत्येक हालचाल चिनी वरून न्याहाळत होते."

जनरल कौल यांनी हा दुसरा अजब शोध लावला आहे. त्यांच्या मते त्यांनी

आघाडीची सूत्रे हाती घेण्यापूर्वीच 'इतरांनी' (?) मोहिमेची योजना तयार केलेली होती. जनरल कौल लिहितात, "७ व्या पायदळ तुकडीचे कमांडर, ब्रिगेडियर दळवी यांनी २८ सप्टेंबर १९६२ लाच 4th इनफंट्री डिव्हिजनला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात दळवींनी असे म्हटले होते की सर्वप्रथम सांगले (Tsangley) या ठिकाणी पाय घट्ट रोवण्यात यश मिळाल्यानंतर चिन्यांवर थोला च्या डाव्या बाजूने हल्ला करता येणे शक्य आहे."

माझ्या अहवालातल्या या योजनेचा जनरल कौल यांनी आणखी एकदा उल्लेख केला आहे. या वेळेला जनरल कौल म्हणतात "सेंग-जाँग (Tseng-Jong) या आपल्याच हद्दीत नाम-का-चू नदीच्या उत्तरेकडे असलेल्या ठिकाणी आपली जवळजवळ एक कंपनी पाठवावी या, मी आघाडीची सूत्रे हाती घेण्यापूर्वीच ब्रिगेडियर दळवींनी आखलेल्या योजनेला मान्यता दिली !"

माझ्या योजनेला जनरल कौलनी का मान्यता दिली याला त्यांनी पूढीलप्रमाणे कारणे दिली आहेत :

१ : एकतर सांगले आपल्या कबज्यातच होते आणि दुसरे म्हणजे मी आघाडीवर येण्यापूर्वीच (!) आपले जवान नाम-का-चू नदीच्या उत्तरेकडे गेले होते.

२ : नाम-का-चू नदीवरच्या लाकडी ओंडक्याच्या पुलाजवळ असलेल्या आपल्या उपस्थितीला धोका उत्पन्न होण्याची शक्यता निर्माण झाली होती. कारण चिन्हे अशी दिसत होती की सेंग-जाँग ह्या ठिकाणावर जर आपण अगोदर कब्जा केला नाही तर चिनी करतील !

३ : आघाडीची सूत्रे मी स्वीकारण्यापूर्वी (!) ६ दिवस अगोदर, म्हणजे २८ सप्टेंबर १९६२ ला सादर केलेल्या अहवालात असे म्हटले होते की 'त्यांचे जवान नाम–का–चू नदीपार करून सेंग–जाँगवर कबजा करू शकतील.' आता तुमच्या लक्षात येईल की हा हुकूम माझा होता असे सुचवले जाते ते खरे नव्हे ! मी जवानांना पुढे जाण्यापासून परावृत्त करू शकलो असतो पण आघाडीवर जाऊन बघतो तो काय ? ब्रिगेडियर दळवी यांच्या हुकमाप्रमाणे आपल्या एका कंपनीने नदीपार करून सेंग-जाँगचा रस्ता धरला होता.

जनरल कौल यांनी तिसरी सबब अशी सांगितली आहे की, "त्याच वेळी नाइलाज म्हणून ब्रिगेडियर दळवी यांना मला हे सांगणे भाग पडले की चिन्यांनी निवडलेल्या जागांशी तुलना करता पूल क्रमांक ४ जवळ आपण घेतलेला संरक्षक पवित्रा सदोष आहे."

एवढे सगळे सांगून आपला बचाव करण्याच्या मरीस पडलेले जनरल कौल यांनी आपल्या 'अनटोल्ड स्टोरी' या पुस्तकात काही महत्त्वाच्या गोष्टी सांगण्याचे टाळले आहे त्या गोष्टींकडे आता तुमचे लक्ष वेधतो.

१ : ५ ऑक्टोबरला २–राजपूत आणि १–९ गुरखाज या तुकड्यांना लुंपूपासून

पुढे जाण्याचा आदेश दिल्यानंतर त्यांना ८ आणि ९ ऑक्टोबरला सांगधर सोडून धोला प्रदेशापर्यंत पुढे जाण्याचा हुकूम जनरल कौल यांनीच दिला होता. (ब्रिगेडियर दळवीने नाही !)

२ : ९ ऑक्टोबरला ? राजपूत या तुकडीला असा हुकूम दिला की धोला सोडून आणखी पुढे जा. (!) Yumtsola या ठिकाणापर्यंत पुढे जाऊन चिन्यांच्या मागे जाऊन बैठक मारा.

जनरल कौल यांच्यापूर्वी आघाडीवर येऊन गेलेल्या आणि आघाडीवर त्यांच्या हाताखाली कामगिरी बजावीत असलेल्या लष्करी अधिकाऱ्यांच्या लायकीबाबत प्रतिकूल मत होऊ शकेल, अशी विपरीत टीका जनरल कौल यांना का करावीशी वाटली ? स्वतःचा बचाव करण्यासाठी ! धोला हे ठिकाण जनरल कौल यांच्या एकूण मोहिमेचा पाया होते. त्यांना असे सुचवायचे आहे की या पराभवाला ते जबाबदार नाहीत ! स्वतःची कातडी बचावण्यासाठी त्यांनी असा आव आणलाय की ' काय करणार ? आघाडीची सूत्रे मी स्वीकारण्यापूर्वीच ब्रिगेड कमांडरने धोलासारख्या सदोष ठिकाणांची निवड केली होती. आघाडीवर परिस्थितीच अशी निर्माण झाली होती. घटना अशा घडत होत्या—की त्या माझ्या काबूत नव्हत्या. की मी त्या थांबवू शकत नव्हतो. नाइलाज म्हणून मला त्यांना मान्यता द्यावी लागली. कारण बर्फ पडायला सुरुवात होऊन आपल्या मोहिमेला अडथळा निर्माण होण्यापूर्वीच चिन्यांना हुसकून दे असा भारत सरकारचा मला सक्त हुकूम होता; आणि मी आघाडीवर येण्यापूर्वीच काही हालचाली अशा घडल्या होत्या की जिथून मागे येता येणे शक्यच नव्हते.

वस्तुतः धोला या ठिकाणाच्या निवडीबद्दल मी स्वतःच उपहासात्मक टीका केली होती. आणि ती माझीच विधाने जनरल कौल माझ्याविरुद्ध वापरताहेत ! एवढेच नव्हे तर आपल्या ३० सप्टेंबरच्या पत्रात जनरल उमरावसिंग यांनी माझ्या ह्या सर्वश्रुत विधानांचा समावेश केला होता.

खरी गोष्ट अशी आहे की धोला या ठिकाणाची निवड कुठल्याही प्रकारे चिन्यांशी लढाई करण्याच्या दृष्टिकोणातून झाली नव्हती. मला सांगायला खेद होतो, की चिन्यांना हुसकून देण्यासाठी नाम—का—चू पर्यंत पुढे जाण्याच्या घाईत जनरल कौलना आपले सुरुवातीचे हेतू आणि युद्धाची पार्श्वभूमी यांचा अभ्यास करायला वेळ मिळाला नाही. आपली सबंध ब्रिगेड धोक्याच्या आणि अयोग्य ठिकाणी नेण्याचा हुकूम देण्यापूर्वी जनरल कौलना माझ्याशी झालेल्या भेटीच्या संधीचा उपयोग करून घेता आला नाही. ५ ऑक्टोबरला लुंपू या ठिकाणच्या भेटीत जर का जनरल कौलनी या बाबतीत माझ्याशी चर्चा केली असती तर आपल्या योजनेतले मुख्य मुद्दे आणि धोला या ठिकाणाची लष्करी दृष्टचा अयोग्य निवड याची माहिती मी त्यांना दिली असती. युद्धाची पार्श्वभूमी आणि आपले सुरुवा-

तीचे डावपेच यांची माहिती जनरल कौलना कोणीच दिली नसेल, यावर विश्वास बसू शकत नाही. धोला हे ठिकाण सोडवून घेण्याचा सुरुवातीचा आपला हेतू मर्यादित होता. हेतू हा होता, की चिन्यांना असे वाटू नये की त्यांना घाबरून आम्ही धोला हे ठिकाण सोडून दिले. अजून लढाई अशी सुरू झाली नव्हती. तरीदेखील धोलावर पुन्हा कबजा करून 'आम्ही तुम्हाला घाबरत नाही! बघा धोला कुणाच्या कबजात आहे ते!' हे चिन्यांना दाखवणे एवढाच फक्त हेतू होता आणि म्हणूनच धोला या ठिकाणी असलेल्या जवानांना नीट रसद मिळावी म्हणून तिथल्या आसाम रायफल्सच्या मागेच राहण्यासाठी एक कंपनी पुढे पाठवली होती. जनरल कौल यांना हे ठाऊक असायला हवे होते, की 'चिन्यांना आणखी पुढे येऊ देऊ नका!' असा ७ व्या पायदळ तुकडीला हुकूम होता. एखाद्या ठिकाणी अपघात झाल्यानंतर पुढचे सोपस्कार करण्यापूर्वी त्या ठिकाणी एक कॉन्स्टेबल नुसता उभा करून ठेवतात. कशासाठी? पोलीस बिलीस कुणी नाही आहे या संधीचा फायदा घेऊन रिकामटेकड्या उत्सुक बघ्या लोकांनी तिथे गर्दी करून ढवळाढवळ करू नये म्हणून! ९ पंजाब ही आपली तुकडी बॉर्डरवर हे पोलीसाचे काम करीत होती. धोला आपण सोडून दिले असते तर? 'तिथे कुणीच दिसत नाही आहे! चला! आणखी पुढे जाऊन धोला कबजात घेऊन टाकू!' असा विचार चिन्यांनी केला असता. आणि खरे सांगायचे तर १३–१४ सप्टेंबरला झालेल्या मीटिंगनंतर आर्मी चीफच्या सांगण्यावरून आर्मी कमांडरने स्वतःच ९ पंजाब या तुकडीची हालचाल घडवून आणली होती. भारतीय प्रदेशात थाग-ला प्रदेशातल्या उंच ठिकाणापर्यंत चिनी घुसले होते तिथे त्यांनी चांगलेच बस्तान बसवले होते. तो प्रदेश आपण गमावून बसलो होतो आता लष्करी डावपेचाच्या आणि तयारीच्या दृष्टीने महत्त्वाची असलेले ठिकाणे होती. सांगधर आणि हाथुंगलाचे पठार. मात्र राजकीय दृष्ट्या धोला हे ठिकाण महत्त्वाचे होते. धोला सोडून देण्याची कल्पनासुद्धा सहन होण्यासारखी नव्हती. कारण धोला सोडून देणे याचा अर्थ भारताची आणखी २ मैल भूमी चिन्यांना बहाल करून टाकण्यासारखे होते. धोला या ठिकाणाला महत्त्व इतपतच होते की, तिथे चौकी बांधून चिन्यांना एवढे सुचवायचे की, 'आतापर्यंत इथे कुणीच नसल्यामुळे थागला मध्ये सहज घुसलात. आता धोलाच्या पुढे असे तुम्हाला मोकाट घुसता येणार नाही. कारण आता आम्ही आहोत. धोलापर्यंतची जमीन भारताची जमीन आहे, कारण धोला आमच्या कबज्यात आहे!

धोला या ठिकाणच्या लष्करी दृष्ट्या आरोग्यतेची पांडित्यपूर्ण चर्चा एवढ्याच साठी जनरल कौल करताहेत की, सरतेशेवटी नाम-का-चूच्या परिसरात आपल्या ७ व्या पायदळ तुकडीचा असा कसा धुव्वा उडाला, या प्रश्नाचे सरळ सरळ उत्तर त्यांना टाळायचे आहे. कारण त्याचा सरळ जबाब त्यांना असाच द्यावा लागेल की त्यांच्याच चुकीच्या हुकमामुळे उडाला. कसे ते सांगतो :

जनरल कौल यांच्या हाती आघाडीची सूत्रे जाण्यापूर्वी नाम-का-चू नदीच्या परिसरात आपली फक्त एक बटालियन होती. बाकीची ब्रिगेड मागे लुंपू या ठिकाणी होती. माझा सुरुवातीचा २८ सप्टेंबरचा आराखडा जरी अमलात आणला गेला असता तरी आपल्या दोन बटालियन्स धोलाकडे जाण्याऐवजी सांगधरवरून सांगलेकडे गेल्या असत्या. मग ते धोलाकडे का गेले ? कुणी हुकूम दिला त्यांना ? जनरल कौलने ! त्यांनी स्वतःच या मोहिमेसाठी धोला या चुकीच्या ठिकाणाची निवड केली. राजपूत आणि गुरखा तुकड्या लुंपू सोडून धोलाकडे जाण्याचा हुकूम दिला होता तो जनरल कौलनेच !

जनरल कौल यांच्या मते धोला हे ठिकाण जर लढाई करण्याच्या दृष्टीने अयोग्य होते तर, 'ते ठिकाण सोडून द्या ! आणि मी सांगतो त्या दुसऱ्या चांगल्या ठिकाणी जा !' असाच हुकूम त्यांनी जवानांना द्यायला हवा होता. कारण ७ ऑक्टोबरला जनरल कौल यांनी स्वतःच धोला या ठिकाणाची परिस्थिती पाहिली होती. मग ? ज्या 'अयोग्य' ठिकाणी फक्त एक कंपनीच होती. तिथे सबंध ब्रिगेड जनरल कौलनी का पाठवली ?

आपल्या 'Chinese Invasion of NEFA' या पुस्तकात मेजर एस. आर. जोहरी म्हणतात, 'त्यानंतर डिव्हिजनल कमांडर समवेत कोअर कमांडर धोला प्रदेशात ४ दिवसांपेक्षा अधिक दिवस हजर होते. धोला या ठिकाणाची संरक्षक व्यवस्था आपल्याला पसंत नसल्याचे सांगणे हा कोअर कमांडरचा नेहमीचा परिपाठ होता. तरीदेखील धोला सोडून देऊन दुसऱ्या कुठल्या तरी चांगल्या ठिकाणी जाण्याच्या दृष्टीने त्यांनी अक्षरशः काहीच हालचाल केली नाही. असेही असण्याची शक्यता आहे की, धोलाच्या मानाने चांगले ठरावे असे दुसरे कुठलेही ठिकाण तिथे नव्हतेच. ७ व्या पायदळ तुकडीला धोलाचे संरक्षण करणे आणि धोला कबजात ठेवणे भाग पडले. केवळ लष्करी डावपेचांच्या दृष्टीने धोला हे ठिकाण सदोष आहे म्हणून त्याचे संरक्षण न करता ते सोडून देणे शक्यच नव्हते. लष्करी दृष्ट्या अयोग्य आणि सदोष असूनदेखील धोला लढवण्यात इतर अनेक महत्त्वाची कारणे होती. आणि ती अशी होती की धोलाचे संरक्षण केल्याशिवाय गत्यंतर नाही, आणि त्यातले प्रमुख कारण हे होते की आपण धोला सोडून दिले असते तर पुराचे पाणी उतरत्या जागेवरून गावात शिरावे तसे चिनी धोलापर्यंत आत शिरले असते !' किती अचूक निदान आणि विधान आहे मेजर जोहरींचे !

वस्तुस्थिती अशी आहे की आपली योजना आणि मोहीम काहीही करून पार पाडण्याच्या दृष्टीने धोला हे जनरल कौलांना सगळ्यात जवळचे आणि शक्यतितक्या लवकर जाऊन पोचण्याचे ठिकाण म्हणून सोयीस्कर वाटले. १० ऑक्टोबरपर्यंत जर का काहीतरी करामत करून दाखवायची असेल तर साँगले–सेंग जाँग ह्या लांबच्या रस्त्याकडे दुर्लक्ष करणे त्यांना भाग होतं. त्याला ते कारणही

देऊ शकत होते की सांगले–सेंग जांग या मार्गात अनंत अडचणी आहेत. त्या मार्गात जवानांनां अन्न मिळण्याचीदेखील मारामार ! शिवाय या मार्गाने जायला कमीतकमी ८ ते १० दिवस जास्त लागले असते.' आणि एवढे करून कुठलीही कामगिरी जवानांवर सोपविण्यापूर्वी त्यांना जरा विश्रांती देणं भाग पडलं असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर १० ऑक्टोबरपर्यंतची जी कामगिरी त्यांच्यावर सरकारने सोपवली होती ती ७ व्या पायदळ तुकडीची घोला प्रदेशात जमवाजमव केल्याशिवाय ते पार पाडू शकतच नव्हते. आणि म्हणूनच जनरल सेन सारख्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याच्या कारकीर्दीला हकनाक कलंक लागून त्यांची किमत कमी करणे–या पद्धतीने त्यांच्या कामगिरीची मोजदाद करणे–हे जरूरीपेक्षा जास्त गैरवाजवी ठरेल.

आता आपण जनरल कौल यांच्या 'मी आघाडीची सूत्रे हाती घेण्यापूर्वीच काही योजना आखल्या गेल्या होत्या' या पालुपदाकडे वळू. एक लक्षात घेण्यासारखे आहे की याच योजना ८ ऑक्टोबर पर्यंत त्यांच्यावर बंधीकारक होत्या. त्यांना त्या मान्य होत्या असे ते कबूल करतात. मग अचानक त्यांच्या नेतृत्वाच्या पोटात गोळा येऊन त्यांना त्यांच्या शब्दात फक्त 'बघ्याची' भूमिका का घ्यावी लागली ? ही योजना का नामशेष झाली त्याची अनेक कारणे आतापर्यंत उघड झालेली आहेत. २८ सप्टेंबर पर्यंत आपल्या ताकदीची तपासणी करण्याची काहीतरी आशा होती. ८ ऑक्टोबरला तीही आशा नाहीशी झाली. जर का २८ सप्टेंबर ६२ पर्यंत नाम का–चू नदी ओलांडून जाण्याची योजना त्यांना मान्य होती तर ती योजना अमलात आणायला १० दिवस उशीर का झाला ? ८ ऑक्टोबरपर्यंत ही योजना का अमलात आणली गेली नाही ? सेंग–जांगपर्यंत पुढे जाण्याच्या मार्गात आड येईल असा बदल करून सांगले पासून घोला पर्यंत तुकड्या नेण्याचा बदल का करण्यांत आला ?

खरी वस्तुस्थिती अशी आहे की आपली कुठल्याही प्रकारची योजनाच नव्हती. निश्चित हुकूम नव्हते. कुणी कुठे जायचे हे ७–८ ऑक्टोबरपर्यंत कुणालाच ठाऊक नव्हते. आम्ही फक्त आता जनरल कौल येतील, आघाडीची पाहाणी करतील परिस्थितीचा अंदाज घेऊन पुढचा हुकूम देतील – आणि तो काय हुकूम असेल याची वाट पाहात होतो !

त्याप्रमाणे नाम–का–चू नदी ओलांडून जाण्याच्या एकतर्फी निर्णयाचा जनरल कौल यांना अंदाज असला पाहिजे. ऑक्टोबरच्या दुपारपर्यंत ते आमच्या बरोबर होते. जनरल कौल लिहितात "थोड्याशा उशीराने का होईना पण नजीकच्या भविष्य काळात निर्माण होणाऱ्या मोहिमेच्या हालचाली आणि परिस्थितीबाबत त्यांनी चर्चा केली."

पहिलेत कसे वाक्य आहे ते ? वाचून बऽऽरे वाटते ! काय चर्चा केली? कुणाबरोबर केली ? कधी केली ? या चर्चेत काय ठरले हे जनरल कौल यांनी सांगितले

नाही ! नाम–का–चू नदी ही आता भारत चीन यांची तात्पुरती सरहद्द ठरली होती. नदीच्या अल्याडपल्याड उभय राष्ट्रांचे सैनिक सज्ज होऊन उभे होते. खरी सरहद्द लढाईनंतरच ठरणार होती. अशा परिस्थितीत नाम–का–चू नदीच्या पलिकडे वादग्रस्त टापूत आपली एक कंपनी जाणार आहे–आणि तेदेखील चिनी समोर उभे ठाकलेले असताना–याची साधी चर्चादेखील जनरल कौलांनी केली नव्हती या म्हणण्यात कितपत तथ्य आहे ? जनरल कौल यांचे हे म्हणणं तर्कशास्त्राला सोडून आहे. जनरल कौलांनी चर्चेत आम्हांला असे विचारले नसेल का की तुमची पुढची योजना काय आहे ? आणि त्यांनी तसे विचारले असतं तर आम्ही त्यांना आमच्या योजना सांगितल्या नसत्या का ? तेसुद्धा आमचेच होते. ब्रिगेड म्हणजे एकमेकांच्या अंगावर ओरडणाऱ्या येडपट लोकांचा कळप नव्हे !

'मी आघाडीवर येण्यापूर्वीच काही योजना अमलात आणायला सुरवात झाली होती!' ह्या जनरल कौल यांच्या विधानाची मेजर जोहरी यांनी मोडतोड करून ते धुळीस मिळविले आहे. काय लिहितात मेजर जोहरी आपल्या पुस्तकात ? (क्रमशः)

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi
Thacker & Co. © with the Original Publisher

## आदमी तेरा रंग कैसा...

अमेरिकेतला निग्रोंचा प्रश्न कदाचित कायमचा निकालात निघेल. काळा आणि गोरा हा भेदच जगाच्या पाठीवर उरणार नाही. माणसाचा रंग त्याला पाहिजे तसा बदलणे उद्या विज्ञानाला शक्य होणार आहे. माणसाच्या डोळ्यांना, केसांना, कातडीला रंग कशामुळे मिळतो हे विज्ञानाने शोधून काढले आहे. आपल्या शरीरात 'टायरोसिन' नावाचे एक अॅमिनो अॅसिड आहे. 'टायरोसिन' प्राणवायूबरोबर संयोग पावले की, 'मेलॅनिन' नावाचा एक काळा पदार्थ आपल्या शरीरात तयार होतो. शरीरात किती 'मेलॅनिन' आहे यावर शरीराचा रंग ठरतो. काळ्या आणि गोऱ्या लोकांत रासायनिक दृष्ट्या फक्त एकच फरक आहे. त्यांच्या शरीरात वेगळ्या प्रमाणात मेलॅनिन साठवलेले आहे. आता टायरोसिन व प्राणवायू यांचा संयोग झाल्याने मेलॅनीन बनलेले आहे. पुन्हा टायरोसिन व प्राणवायू यांचा संयोग बनणे हे शरीरातील एक रासायनिक सहाय्यकावर (enzyme) अवलंबून आहे. उद्या आपण एखादा नवा रासायनिक पदार्थ शोधून काढू शकू की, जो पदार्थ या रासायनिक सहाय्यकाची, कार्यशक्ती कमी वा जास्त करू शकेल, पर्यायाने शरीरात बनणाऱ्या 'मेलॅनीन' वर आपण नियंत्रण ठेवू शकू....

...म्हणजे उद्या तुम्ही डॉक्टरांकडे गेल्यावर डॉक्टर तुम्हांला वेगवेगळ्या रंगांचे नमुने दाखवतील. तुम्ही त्यातील पाहिजे तो रंग तुमच्या शरीरासाठी निवडू शकाल !

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



श्री. गो. जोशी, सायनाचार्य

१२ जुलै ते १८ जुलै, १९६९

**मेष** : गेल्या १५।२० दिवसांपासून तुमची प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. या आठवड्यात तिची गती वाढेल. अंगीकृत कार्यांत अपेक्षेबाहेर यश पदरी पडेल.

या आठवड्यापासून तुमची धावपळ धडपड खूपच वाढेल, अनेक रेंगाळलेली कामे निपटून काढावी लागतील. व्यावसायिक जबाबदाऱ्या वाढायला लागतील.

सांपत्तिक लाभाचे प्रमाण माफकच असले तरी प्रतिष्ठा, स्वास्थ्य, अपेक्षेबाहेर अधिक लाभेल. स्थावराचा प्रश्न सुटेल, अनेकांच्या सहकार्याने नव्या व्यवसाय धंद्याची योजना आखली जाईल, प्रवासही वरचेवर घडेल. नोकरीधंद्याचे प्रयत्न यशस्वी ठरू लागतील. दि. १५ ते १७ या काली आपले बरेच प्रश्न सुटावेत.

**वृषभ** : सूर्य आपल्या पराक्रमस्थानी येत आहे (१६ जुलै) आणि गुरुहर्षल सारखा अनन्यसाधारण यश देणारा योग आपल्या पंचमस्थानी घडून येत आहे. असे योग दर १४।१४ वर्षांनीच अंतरिक्षांत घडून येत असतात आणि म्हणूनच कित्येक वर्षे लक्षात राहील असे महत्त्वाचे कार्य करून जातात.

आपला अनिष्ट काल आता आपण विसरू शकता. साडेसातीची धास्ती बाळगण्याचे तर मुळीच कारण नाही.

सांपत्तिक पेच सुटू लागतील, अनपेक्षित स्वरूपाचे धनलाभही घडून येणे अशक्य नाही. यांत्रिक उद्योग धंद्यात तर फार मोठी क्रांती घडवून आणण्याचे तुमचे विचार याच कालापासून आकार घेऊ लागतील.

दि. १५ ते १८ विशेष लाभाचा व प्रगतीचा काल.

**मिथुन** : आजवर सूर्य तुमच्या राशीत होता. सूर्यात काही चांगले गुणधर्म असतीलही पण अनिष्टताही त्यांच्यात वरीच साठवलेली असते याचा प्रत्यय गेल्या महिन्याभरांत आपणास आलाच असेल. १६ जुलैला सूर्याचे राश्यंतर घडेल—आणि

तुमच्या मनावरील ताण एकदम कमी होईल. अनारोग्याची विवंचना मिटेल, सांपत्तिक चिंता दूर होण्याची लक्षणे दिसायला लागतील.

१४ जुलैची अमावास्या होऊन जाताच आपणांस सर्वत्र प्रसन्नता दिसू लागेल, आपली सारी रेंगाळलेली कामे गती घेऊ लागतील.

नोकरी-धंद्यांचे स्वरूप बदलावे असे वाटू लागेल. आणि तसे बदलणे परिणामी हितावह ठरावे.

दि. १६ ते १८ या काली आपल्या व्यवहारांत अनेक अनुकूल घटना घडून याव्यात.

**कर्क** : १६ जुलैला सूर्याचे राश्यंतर घडताच आपल्या मार्गातील बऱ्याच अडचणी दूर व्हायला लागतील. सूर्य-गुरू शुभयोगामुळे आपले प्रयत्न अपेक्षेबाहेर यशस्वी ठरायला लागतील. स्थावराच्या व्यवहारांत चांगलेच यश मिळवाल. स्थानांतराच्या आणि व्यवसायांत बदल घडवून आणणाऱ्या आपल्या स्थगित योजना या आठवड्यापासून आकार घेऊ लागतील.

कर्तृत्वाला उत्थान मिळेल, प्रयत्नाची शिकस्त करून हवे ते मिळवून दाखवाल. नवे कार्यक्षेत्र मिळविण्याच्या दृष्टीने आजवर जे प्रयत्न केलेत ते यशस्वी होण्याची लक्षणे याच आठवड्यापासून दिसायला लागतील.

दि. १५ ते १८ या कालापासून अनेक योजना यशस्वी ठरू लागतील.

**सिंह** : तुमच्यासारख्या प्रयत्नवादी माणसांना अनिष्ट ग्रहांची बाधा फारशी होत नाही हे जरी खरे असले तरी गेल्या २१४ महिन्यांत आपली बरीचशी कामे रेंगाळलेली आहेत. ती सारी कामे आता गती घेऊ लागतील. प्रगतीला पोषक अशा अनेक घटना या आठवड्यापासून घडून यायला लागतील.

२० जुलैला गुरू हर्शल यांची आशात्मक युती आपल्या धनस्थानी घडून येणार आहे. त्या कालाच्या आसपास तुमच्या सांपत्तिक स्थितीत फार मोठी क्रांती घडून येण्याची शक्यता फारच मोठी आहे.

असे महत्त्वाचे योग अंतरिक्षात ८४ वर्षांनीच घडून येत असतात.

दि. १५ ते १७ विशेष अनुकूल काल जाणवेल.

**कन्या** : तुमच्या कन्या राशीत घडून येणारा गुरू हर्शल योग तुमच्या विचारांत क्रांती घडवून आणील. नव्या कल्पना, अभिनव योजना जगापुढे ठेवल्या जातील आणि त्या यशस्वी करून दाखवल्या जातील.

असे योग फक्त ८४ वर्षांनीच घडून येत असतात. आपल्या हयातीत फक्त एकदाच घडून येणारा योग आपली सारी हयात उजळून काढील.

अनपेक्षितपणे नोकरी-धंद्यांत घवघवीत यश मिळेल, सामाजिक प्रतिष्ठा खूपच

उंचावेल, नोकरीत एकदम चार पावलें पुढे जाल. या वेळी जे जे घडेल ते ते अलौकिक, अनन्यसाधारण असेच असेल.

दि. १५ ते १८ या कालाची नोंद ठेवा.

**तूळ :** बुध भाग्यस्थानी आलेला आहेच शुक्रही तिकडे यायला निघालेला आहे. ही ग्रहस्थिती अपेक्षासाफल्याची जाणवेल.

हा साराच आठवडा आपणांस अनेक बाबतींत अपेक्षेबाहेर यश देणारा जाणवेल. हे दिवस फारच घाईगर्दीचे जाणवतील. आपल्या साऱ्या स्थगित कार्यांना गती मिळू लागेल. नव्या कार्यक्षेत्रांत आपण स्थिरस्थावर व्हाल. नवे जिवाभावाचे मित्र लाभतील. कला-साहित्य-क्रीडा-क्षेत्रांतही उंची वाढू लागेल. सांपत्तिक बाजूही सुधारण्याची लक्षणे दिसायला लागतील. नवा कार्यक्रम हाती घ्याल आणि तो यशस्वी करून दाखवाल. दि. १३, १६, १८ या कालात अपेक्षित सर्व काही घडेल.

**वृश्चिक :** लाभस्थानी गुरु-हर्शलयुती असा सर्वोत्तम लाभाचा योग पुन्हा तुमच्या हयातीत होणे नाही. अशाच स्वरूपाचा योग ८४ वर्षांनंतरच इ. स. २०५३ सालीच फक्त होईल. म्हणूनच मला आपणांस असे आवर्जून सांगावेसे वाटते की, सांपत्तिक-संसारिक-व्यावसायिक जीवनांत जे जे काही घडावे असे वाटते ते ते सारे आगामी ३–४ महिन्यांच्या कालावधीतच घडून येईल.

नोकरीधंद्यांत अनपेक्षितपणे उत्थापन मिळेल. प्रगतीच्या नव्या वाटाकडे पावले पडायला लागतील, आपल्या अंगीकृत व्यवसायांत असे काही नेत्रदीपक यश लाभेल की, तुमच्या साऱ्या समाजाच्या नजरा तुम्हांकडे रोखल्या जातील. अनपेक्षितपण मोठा लाभ होण्याचीही शक्यता आहे.

दि. १५ ते १८ या कालाचे महत्त्व फार मोठे आहे.

**धनु :** अनिष्ट ग्रहस्थितीचे स्वरूप पालटू लागल्यासारखे जाणवू लागल्यासारख जाणवू लागेल. अजूनही काही दिवस मंगळ व्ययात आणि सूर्य अष्टमात असल्यामुळे सर्वच गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडतील असे मात्र नाही.

आजवर सर्वत्र निराशा, उदासीनता दिसत असे. आता थोडेफार आशादायक वातावरण दिसू लागेल इतकेच. फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका. नवीन काही करण्याचे विचार मनात आणू नका.

नोकरीधंद्यांत सदैव जुळतेमिळते घेण्यावाचून गत्यंतर नाही. वेळप्रसंगी माघारही घ्यावी लागेल.

पैशा-आडक्याच्या व्यवहारांत फारच दक्षता बाळगा. लोकांच्या आभिवचनावर फारसे विसंबून राहू नका.

दि. १६ ते १८ येथून अनुकूल व प्रसन्न वातावरण दिसू लागेल.

**मकर :** भाग्यात गुरु-हर्शलयुती हा योग तुमच्या भाग्याला उधाण आणील, तुमच्या चारित्र्याची उंची वाढवील. तुमच्या सबंध हयातीत इतका सर्वोत्तम ग्रह-योग चुकूनहि कधी लाभणार नाही. सुदैवाने इ. स. २०५३ हे वर्ष आपणांस पांहावयास मिळाले. तरच अशा असामान्य योगाचा पुन्हा लाभ होण्याची शक्यता.

तुमच्या आजवरच्या साऱ्या असफल आशा-आकांक्षा आगामी २-३ महिन्यांच्या कालावधीत सफल होतील असे या ग्रहयोगाचे तुम्हांस आवर्जून सांगणे आहे.

नोकरीधंद्यांत विलक्षण क्रांती घडेल. अनपेक्षित स्वरूपाचे लाभही पदरी पडणे शक्य आहे. मंगल कार्याचे एकाएकी ठरेल. साहित्य, कला, क्रीडा अशा क्षेत्रांशी संबंध असणाऱ्यांना तर ही एक महान पर्वणीच लाभल्यासारखे वाटेल.

जुलैचा सारा पंधरावडा साऱ्या अपेक्षा सफल करणारा जाणवेल.

**कुंभ :** या आठवड्यापासून अनेक ग्रहांची आपणांस सहानुभूती लाभू लागेल. त्यामुळे आपण कुठेही गेलात, काहीही केलेत तरी आपला अपेक्षाभंग होणार नाही.

नोकरीधंद्यांत निश्चितपणे पुढे पाऊल पडेल. राजकीय क्षेत्रांत आघाडीवर राहण्याची संधी लाभेल. यांत्रिक-तांत्रिक व्यवसायधंद्यांशी आपला संबंध असेल तर आपणांस ही एक महान संधी लाभत आहे असे वाटू लागेल. नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील. नव्या वातावरणात पूर्णत्वाने एकरूप व्हाल. जवाबदाऱ्यांचे ओझे उचलावे लागेल.

दि. १४ ते १७ अनुकूल कालमानाचे दिवस.

**मीन :** तुमच्या बाबतीत आता कोणत्याही ग्रहाची अडचण येणार नाही. प्रत्यक ग्रह आपापल्या परीने तुमच्यासाठी झटतच आहे अशी जाणीव व्हायला लागेल.

शेती, रासायनिक द्रव्ये, सौंदर्यप्रसाधने, चित्रकला, इत्यादी क्षेत्रांत तुम्हांला अनेक लाभाचे योग दिसू लागतील.

साहित्य, कला ही तर तुमची खास क्षेत्रे, त्यांत असे यश मिळवून दाखवाल की, आजवरचा अपयशाचा डाग धुवून जाईल. आता साडेसाती आहे नाही सारखीच.

दि. १३, १५, १८ विशेष अनुकूल दिवस. ■■

## मुंबई समाचार ( पान ६ वरून )

पाहता, शासन व सत्ताधारी व्यक्ती किंवा पक्षच, अशा तऱ्हेच्या प्रादेशिक असंतोषाच्या मुळाशी असतात. आंध्रांत आज नेमके हे घडले आहे. 'तेलंगणा' बाबत ब्रह्मानंद रेड्डींचा राजिनामा, हा केवळ त्यांच्याच नव्हे, तर त्यांच्या आधीच्या मुख्य-मंत्र्यांच्या, शासनाच्या व सत्तापिपासू व्यक्तींच्या राजकारणाचा परिपाक आहे. ह्या साऱ्यांनी आंध्राकडे ज्यादा लक्ष पुरवुन, तेलंगणाला भिकेला लावले ही वस्तुस्थिती आहे. त्यांतूनच आज तेलंगण जागा झाला, पेटला आणि खुद्द दिल्लीला त्याने गदा-गदा हलवले. आज हीच परिस्थिती बव्हंशी बाकीच्या राज्यांतूनही आहे. मंत्रि-मंडळात ज्या भागाचे वर्चस्व त्या भागात साऱ्या विकास योजना, तिथे सतत प्रगतीची घोडदौड आणि इतरत्र मात्र सारे भकास ! तेलंगण, पंजाब, विदर्भ सारखे प्रश्न कंटाळून कंटाळून लोकांनी रस्त्यावर आणले, तरीदेखील शासनाचे डोळे उघडत नाहीत हे खरोखरच दुर्दैव होय. तेलंगणाचे हे भूत, आज महाराष्ट्राच्या दाराशी उभे आहे. परवा महाराष्ट्र विधानसभेत ह्या संबंधीचा स्पष्ट इशारा आ. आठल्ये गुरुजी, आ. सावंत आदींनी दिला. मुंबईत 'कोकणसेने'चा अवतारही झाला आहे. 'डांग गेला, उंबरगाव गेले. कऱ्हाडी-वऱ्हाडी नेत्यांचे काय गेले?' 'कऱ्हाडचा विकास, कोकण भकास' वगैरे घोषणा मुंबईत झळकू लागल्या आहेतच. जॅक सिक्केरांच्या नेतृत्वाखाली, गोवा, कोकण व किनारपट्टीची मिळून स्वतंत्र 'सागरी प्रांता'ची चळवळ उभारायला एक गट संधी शोधतोच आहे. पण अद्यापही शासन आपल्याच धुंदीत आहे, हेच खरे !

महाराष्ट्रात, कोकण इतका दुर्लक्षित प्रदेश दुसरा नसावा ! कोकण रेल्वे, कोकणातली बंदरे, तिथला मासेमारीचा धंदा, रत्नागिरीचा ॲल्युमिनियमचा कारखाना, तिथली औद्योगिक प्रगती, कृषिक्रांती, तिथल्या नद्यांवरचे धरणांचे-बंधाऱ्यांचे प्रश्न सारेच आज लोंबकळत पडले आहेत. थोडीथोडकी नव्हे, तर तब्बल वीस वर्षे ! आज निम्म्याहून अधिक कोकण मुंबईवर जगतो. मुंबई-पुणे, कराड-सातारा-सांगली, नासिक-मालेगाव, नगर-श्रीरामपूर, जळगाव-धुळे, वऱ्हाड वगैरे भागात ज्या विकास योजना, औद्योगीकरणाच्या, शेती सुधारण्याच्या योजना राबवल्या जातात, त्याच्या एक चतुर्थांश देखील योजना कोकणात राबवल्या जात नाहीत, हे सत्य आहे. कदाचित कोकण, स्वत:च्या विकासाबाबत जागृत नाही किंवा अराजकाची भाषा बोलत नाही म्हणून कोकणच्या नशिबी ही उपेक्षा आली असावी. पण कोकणची ही उपेक्षा आता लक्षात येऊ लागली आहे, इतकेच नव्हे तर कोकणचा तेलंगण करण्याची भाषा बोलली जाऊ लागली आहे. कोकणी, बावीस वर्षे वाट पाहून, अगतिकपणे भडकले तर दोष त्यांचा नाही, शासनाचा आहे. दाराशी उभे ठाकलेले हे संकट

महाराष्ट्राच्या नेतृत्वाने ओढवून घेतलेले संकट आहे. त्यानेच ते वेळीच निस्तरले पाहिजे.

कोकणासारखाच दुर्लक्षिला गेलेला महाराष्ट्रातला आणखी एक भाग म्हणजे सोलापूर ! ह्याचे एकमेव कारण, म्हणजे महाराष्ट्र-म्हैसूरच्या सरहद्दीवर उभ्या असलेल्या ह्या प्रदेशाला, कऱ्हाड-वऱ्हाड सारखे नेतृत्व अद्याप मिळालेले नाही. किंवा अन्याय होतो, म्हणून कोल्हापूरप्रमाणे, त्याने काँग्रेसविरुद्ध बंडही पुकारलेले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळातही औद्योगिक दृष्ट्या भरभराटलेले हे शहर. पण ह्या 'महापालिका' असलेल्या शहराची अवस्था आज एखाद्या भल्यामोठ्या खेड्यासारखी झाली आहे. नवीन उद्योगधंद्यांची तर गोष्टच सोडा, पण एके काळी गाजलेल्या इथल्या गिरण्याही आज कमालीच्या भयानक अवस्थेत आहेत. सोलापूरच्या मागाहून 'औद्योगिक क्षेत्रे' म्हणून पुढे आलेली कोल्हापूर, नासिक, सांगली, कराड वगैरे शहरे आज सोलापूरच्या कितीतरी पुढे गेलेली आहेत. असे म्हणतात, सोलापूरला आलेले इंजिनियरींग महाविद्यालयाचे सारे सामान रातोरात कराडला हलवले गेले. बिचारे सोलापूरकर ! एंजीनियरिंग महाविद्यालयाची वाटच पाहत बसले ! जी गत सोलापूरच्या औद्योगिक शैक्षणिक उपेक्षेची, तीच गत, सोलापूर जिल्ह्याला वरदान ठरू शकेल असे सांगितल्या जाणाऱ्या 'भीमा योजने'ची ! ह्या योजनेचे किती किती आराखडे झले कुणाला ठाऊक. कितीदा कामाला सुरुवात होऊन काम बंद झाले देव जाणे. हिच्यानंतर आखल्या गेलेल्या कितीतरी योजना हिच्याआधी पूर्ण झाल्या. ह्या उपेक्षिल्या गेलेल्या प्रदेशाचा म्हैसूरमधून फुटून निघून स्वतंत्र कर्नाटकच्या घोषणा देणाऱ्यांना पाठिंबा न मिळाला तरच नवल ! सोलापूर आणि कोकण एवढ्या विस्ताराने चर्चिण्याचे कारण एवढच, की शासन पक्षपाती धोरण स्वीकारून लोकांना तेलंगणी उडी घ्यायला कसे भाग पाडते ते दाखवणे ! हे पक्षपात सर्वत्र चालू आहेत. तेलंगण, सत्ताधाऱ्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालू शकला व त्यामुळे इतर राज्यांतल्या उपेक्षित प्रदेशांवरचा अन्याय दूर व्हायला मदत झाली तरच ब्रह्मनंद रेड्डींच्या राजिनाम्याने काही शिकवले असे म्हणता येईल !

# आम्ही स्वतंत्र आहोत ?

१५ ऑगस्ट, १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० साली प्रजासत्ताक राजवट आली आणि असे असूनही, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तब्बल एकवीस वर्षांनी मी आज हा प्रश्न विचारीत आहे. मध्यंतरीच्या काळातही अनेकदा हा प्रश्न अनेक राष्ट्रवाद्यांनी, राजकीय पुढाऱ्यांनी विचारला आणि आजही हा प्रश्न पुन्हा विचारला जाणार आहे, विचारला जाणे आवश्यक आहे.

अमेरिकन शांति-सैनिक, पी. एल्. ४८०, बोकारो-भिलाईच्या अटी, चीनची चाचेगिरी, अमेरिका–रशिया–पाकिस्तानची दादागिरी, लंडन (कच्छ–प्रकरण) व ताश्कंद (१९६५ भारत–पाक संघर्ष) करारातील दडपण, कै. शास्त्रींच्या अमेरिका-भेटीची तहकूबी, त्यांचाच लंडन विमानतळावरचा अपमान, रुपयांची अवमूल्यन ह्या प्रत्येक वेळी अनेकांच्या मनात ह्या शंकेने घर केले असेल ह्याविषयी मला तरी संदेह नाही. आमचे स्वातंत्र्य दिखाऊ आहे, बेगडी आहे. करते–करविते धनी वेगळेच आहेत हेच ह्या प्रश्नांनी वेळोवेळी सिद्ध नाही का केले ?

भारताच्या अस्मितेवर असाच एक जबरदस्त टोला परवा जागतिक बँकेने दिला. भारताने आपल्या शेजारी राष्ट्रांबरोबर कोणते व्यवहार करावेत ह्याचे नियंत्रण 'जागतिक बँक' करणार असाच जणू ह्या नवीन पवित्र्याचा रोख आहे. भारत आपल्या शेजारी छोटया राष्ट्रांना व इतर काही भारतापेक्षाही अप्रगत राष्ट्रांना, त्या राष्ट्रांच्या उत्कर्षासाठी काही मदत देऊ करीत आहे. तांत्रिक व आर्थिक सहकार्य देऊन काही ठिकाणी भारताच्या मदतीने औद्योगिक प्रकल्प उभेही राहिले आहेत. ह्या राष्ट्रांना भारताने अशी मदत देणे जागतिक बँकेला मान्य नाही व तिने तसे भारत सरकारला कळवूनही टाकले आहे. एवढेच नव्हे तर भारताकडून अशी मदत स्वीकारू नये असेही त्या त्या राष्ट्रांना जागतिक बँकेने कळवले आहे. आणि ह्याचे कारण दिले आहे : 'भारत हे स्वतःच एक ऋणको राष्ट्र आहे !!' धनको राष्ट्राकडून कर्ज घ्यायचे, आणि त्याच्याच जोरावर इतर राष्ट्रांशी अप्रगत राष्ट्रांमध्ये ऋणको राष्ट्राने स्पर्धा करावी हे जागतिक बँकेला मान्य नाही आणि म्हणूनच जागतिक बँकेची भारताला ही समज ! अर्थात ही नुसतीच आर्थिक कोंडी नाही, तर तिच्यामागे राजकीय उद्दिष्ट असण्याचा दाट संभव आहे ! अनेक राष्ट्रांच्या व जागतिक बँकेच्या कर्जांच्या प्रचंडओझ्याखाली दबल्या गेलेल्या भारतावर, राजकीय दबाव आणण्यात अनैसर्गिक असे तरी त्या राष्ट्रांना का वाटावं ? आश्रितांनी तरी, हे दबाव येणार नाहीत असे का मानावे ? आणि म्हणूनच वेळोवेळी असे अनेक प्रसंग येतात. की ज्यामुळे अनेकांना वाटते, अनेकांच्या मनात शंका येतात 'आम्ही खरोखरच स्वतंत्र आहोत ? आम्ही काय करावे हे दुसऱ्याने सागावे ? ' ■■

# राक्षसाचा पराभव

अनंत भावे

फार फार वर्षांपूर्वी एका बेटावर एक जादुगार राहात असे. त्याचे नाव होते हंसराज. स्वभावाने सत्प्रवृत्त असल्याने काळ्या चेटकाच्या नादी तो कधीच लागला नाही. पांढऱ्या चेटूकविद्येत मात्र तो अगदी पारंगत होता. तुम्ही म्हणाल ही काळ्या-पांढऱ्या चेटकांची काय भानगड आहे ! त्याचे असे आहे की चेटकाचे दोन प्रकार आहेत. एक काळे चेटूक आणि दुसरे पांढरे चेटूक. काळ्या चेटुकामुळे अनिष्ट, विनाशकारी गोष्टी होतात. पांढऱ्या चेटकामुळे इष्ट आणि विधायक गोष्टी होतात. उदाहरणार्थ काळ्या चेटुकाने माणसाचा कुत्रा करणे, आकाशातून सुयांचा पाऊस पाडणे, झाडाची गोड फळे विषारी करणे, समुद्रात चक्री वादळ उत्पन्न करणे असली कामे केली जातात. तर पांढऱ्या चेटकाने माणसाला पंख मिळणे, आकाशातून द्राक्षांचा पाऊस पडणे, विषारी झाडाची फळे अमृतमधुर करणे, समुद्रातील वादळ एकदम शांत करणे असली कामे केली जातात. आपला हा हंसराज प्रवीण होता तो अशा पाढऱ्या चेटूकविद्येत.

एकदा त्याने त्याच्या बेटावर सैतानाने सोडलेला महारोग मोठ्या शिताफीने बाटलीत पकडला आणि ती बाटली सैतानाला मिळणार नाही असा बंदोबस्त केला. त्यामुळे सैतान फार संतापला. एक तर त्याची पुष्कळ माणसे खाण्याची इच्छा तशीच राहिली आणि दुसरे म्हणजे त्याच्या काळ्या चेटूकविद्येचा हंसराजाच्या पांढऱ्या चेटूकविद्येपुढे पराभव झाला होता. त्यामुळे हंसराजाचा सूड घेण्याचा निश्चय त्याने केला.

एका महाभयंकर राक्षसाला त्याने हंसराजाचे पारिपत्य करण्याची आज्ञा केली. राक्षसाने अर्थातच मोठ्या आनंदाने ही कामगिरी स्वीकारली. कारण कामगिरी यशस्वी झाल्यास सैतानाकडून मोठे बक्षीस मिळण्याची आशा होती; आणि आपण यशस्वी होणारच अशी राक्षसाची खात्री होती.



राक्षस तडक कामगिरीवर निघाला. त्याने हंसराजाला त्रास द्यायला सुरुवात केली. कधी त्याच्या गुहेतील सामग्रीच मोडूनतोडून टाक, कधी त्याची गुहाच हवेत भिरकावून दे, कधी त्याच्या गुहेभोवती वणवाच पेटव, कधी समुद्राला महाभरती आणून त्याची गुहा जलमय करून टाक, असे अनेक उत्पात राक्षसाने आरंभले. खुद्द हंसराजाला मात्र तो काहीही करू शकला नाही. तरीदेखील राक्षसाच्या कृत्यामुळे हंसराज जेरीला आला.

त्याने राक्षसाला कुपीत पकडण्याचा प्रयत्न केला; पण राक्षस भलताच चपळ होता. त्याने राक्षसाला समुद्राच्या तळाशी बुडवण्याचा प्रयत्न केला; पण राक्षस माशासारखा तरैया होता. त्याने राक्षसाला हवेत गरगर फिरता ठेवण्याचा प्रयत्न केला; पण राक्षसाला उडण्याची कला अवगत होती.

पांढरी चेटूकशक्ती जेव्हा पुरी पडेना तेव्हा युक्तीने राक्षसाला चकवावे असा विचार हंसराजाने केला. कारण, त्याला एक सिद्धान्त माहीत होता. कितीही मोठा, बलाढ्य शत्रू असला तरी त्याचेदेखील एखादे मर्मस्थान असतेच. हत्ती झाला तरी मर्मस्थान हेरणारी मुंगी त्याचा पराभव करतेच की नाही ?

एके दिवशी तो राक्षसाला म्हणाला, " या तुझ्या कामगिरीमुळं तू

थकला असशील फार. जरा विश्रांती घे. "

" विश्रांती ? विश्रांती मला काय करायची ? मी असा सहज दमतो आहे थोडाच ! "

" पण तुझ्या प्रयत्नांचा काही उपयोग होणार नाही. अजून पुष्कळ वर्षं जगणार आहे मी. मला हवा तसा जगणार आहे. तुझ्या अशा परावलंबी जगण्याचा विचार करू लागलो की मला फार वाईट वाटतं."

" माझी काळजी नको करू तू. हे काम मला करायलाच पाहिजे. मग त्याला कितीही वर्षं नव्हे युगं लागली तरी हरकत नाही. सैतानाची आज्ञाच आहे तशी. "

" पण या असल्या कामगिरीतून सुटण्याचा काहीच उपाय नाही असं कसं असेल ? "

" नाही. तसा कोणताही उपाय नाही इथं. नाही म्हणायला तसा एक उपाय आहे. पण–"

" मी म्हणालो नव्हतो तसा काही उपाय असणार म्हणून ! कोणता तो उपाय ? "

" मला करता येणार नाही असं अवघड काम तू मला सांगितलंस तर सैतानाच्या तावडीतून माझी सुटका होईल. म्हणजे काम पुरं होई-पर्यंत मला तेच काम करावं लागेल. काम झालं की पुन्हा मी सैतानाचा. पण मला करता येणार नाही असं काम कुठलं असायला ? कोणतंही काम मी चुटकीसरशी करतो. "

" हो ना. मी बापडा तुलाही करता येणार नाही असं अवघड काम काय सांगणार ! पण मी आपला प्रयत्न करून बघतो. गंमत तर येईल थोडी. तेवढाच नेहमीच्या कामात विरंगुळा तुला. "

" ठीक आहे. सांग मला काम. "

हंसराजाने विचार करून एक अवघड काम राक्षसाला सांगितले. तो म्हणाला, " आमच्या या बेटावरच्या नदीला धरण बांध पण जपून हां. पाणी फार खोल आहे. "

संध्याकाळपर्यंत हंसराजाला चांगला निवांतपणा मिळाला. पण संध्याकाळी राक्षस आला आणि 'धरण बांधले' अशी अद्भुत वार्ता त्याने सांगितली.

हंसराज म्हणाला, "मला वाटलं होतं तुला कधीच धरण बांधता येणार नाही. पण माझी फजितीच झाली. मी यापेक्षा अवघड काम तुला सांगावयाला पाहिजे होतं."

"ठीक आहे. आणखी एकदा प्रयत्न करून पाहा." राक्षस डौलाने म्हणाला. राक्षस बेसावधपणे हळूहळू आपण होऊनच हंसराजाच्या जाळ्यात फसत चालला होता.

हंसराजाने दूरवर दिसणाऱ्या अतिउंच पर्वताकडे बोट दाखवून म्हटले, "तो प्रचंड पर्वत पाहिलास ! त्याच्या तीन सारख्या टेकड्या करून त्या माझ्या गुहेभोवती मांडून ठेव."

हंसराजाचे वाक्य संपताच राक्षस कामाला लागला आणि बऱ्याच दिवसांनंतर हंसराजाला रात्रीची शांत झोप लागली. पण सकाळी उठून पाहतो तो गुहेभोवती, सोंगट्या मांडून ठेवाव्या तशा तीन टेकड्या उभ्या. त्याची आश्चर्यचकित अवस्था पाहून राक्षस खदाखदा हसू लागला. त्याच्या हसण्याचे प्रतिध्वनी त्या टेकड्यांतून उमटले आणि हंसराजाच्या कानावर आदळले. तो भानावर आला. म्हणाला, "छे छे तुझी ताकद विलक्षण दिसते. मला वाटतं आपल्याला हा खेळ नाही खेळता येणार. त्यापेक्षा–"

"अरे असा निराश काय होतोस ? जरा डोकं चालव आणि अगदी एखाद अवघड काम सांग या राक्षसाला, पाहू या तरी तुझ्या डोक्याची करामत." राक्षस गर्विष्ठपणाने म्हणाला.

"बरं आहे, पण तू म्हणतोस म्हणूनच हां. एरवी मला काही त्यात फारसा अर्थ दिसत नाही."

"असू दे रे. सांग तुझं काम."

"एवढा तुझा हट्ट असेल तर असं कर. हो समुद्रकिनाऱ्यावर सुंदर वाळू पसरली आहे ना – तिची लांबलचक दोरी वळून दे मला."

"आत्ता देतो." असे म्हणून राक्षस निघाला खरा; पण तो पुन्हा कधीच 'काम झाले' असे सांगायला परत आला नाही.

समुद्रावर गेलात तर अजून त्या राक्षसाचे दोरी वळण्याचे काम चाललेले दिसेल तुम्हांला. खुद्द राक्षस बिचारा अर्थातच दिसत नाही; पण काम करताना थकून त्याने टाकलेले निःश्वास तुम्हांला सहज ऐकू येतात.

(आधारित)

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी संगम प्रेस. प्रा. लि., १७ ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649



" नाही, नाही, राजा ! मुंबईकरांसाठी 'पाणी योजना' 'पाणी योजना' म्हणून पेपरमधून नेहमी येते ती ही नव्हे काही ! "